लांनीं ती गुप्त मसलत हेंच निमित्त साधून त्यांवर तोहमत ठेवून त्यांची चौकशी करविली. त्यांना पकडवून टौअरांत कैदेंत ठेवलें. तेथें एसेक्सानें आत्महत्या केली. रस्सेल आणि सिड्नी ह्या उभयतांना देहांतशासन झालें. लार्ड रस्सेल हा फार दिलदार स्वभावाचा पुरुष असून, त्यावर त्याच्या दोस्तांचें फार प्रेम होतें. त्यांनीं त्याला पळून जाण्यासाठीं मदत करण्याचा प्रयत्न केला. मान्मथानें मला त्याच्या बाजूस उभा करून माझी चौकशी व्हावी म्हणून देखील सांगितलें, आणि लेडी रस्सेल (रस्सेलची बायको) हिनें, त्याच्यावरील दोषाच्या निराकरणाबद्दल भाषण करण्यास त्याला मदत करण्यासाठीं कोडतांत चाललेल्या हकीकतीचीं टिपणें घेतलीं. परंतु त्या काळीं राजे आपल्या मर्जीस येईल त्यांला न्यायाधीश नेमीत, आणि न्यायाधीशांच्या कामांवरून काढीत, ह्यास्तव, सरकारसंबंधाच्या चौकशांत न्याय होण्याचा थोडाच योग असे. रस्सेल आणि सिड्नी ह्या उभयतांवर गुन्हा लागू करून त्यांना सजा केली, आणि ते आपल्या पक्षाच्या कार्जीं शौर्यानें प्राणास मुकले.

रस्सेल आणि सिड्नी ह्यांस देहांतशासन होतें.

आतां टोरीपक्षाच्या लोकांना सर्व गोष्टी पाहिजे होत्या तशा झाल्या. यॉर्कचा ड्यूक हा मागल्या कांहीं दिवसांपासून स्कार्ट्लंडांतील दुर्दैवी कावेनान्टर्स ह्यांच्या पाठीस लागलेला होता. तो आतां परत आला, आणि त्याला पुनः लार्ड हाइ आड्मिरल (अरमाराचा सर्वश्रेष्ठ अधिपति) केलें, आणि टेस्ट आक्टाप्रमाणें प्रतिज्ञा न करतां त्याला कौन्सिलांत बसण्याची परवानगी मिळाली. पुष्कळ शहरांनीं व्हुइग्स लोकांना आश्रय दिला होता, त्या शहरांच्या सनदा काढून घेतल्या, आणि प्रमुख व्हुइग्सांपैकीं

कांहींकांवर खटले करून त्यांना दंड केले. **चार्लसानें आरेन्जच्या वुइलियमाला** आश्रय देऊं नये ह्यासाठीं लांच म्हणून **लूईक**-डून त्याला पुनः पेनशन मिळूं लागलें; आणि आतां त्याची ९००० शिपायांची खडी कायम नौकरीस ठेवलेली फौज **इंग्लंडांत** असून तीशिवाय सहा पलटणी परदेशीं होत्या, म्हणून त्याला आपण निर्भय आहों असें वाटूं लागलें. धर्मोपदेशकही **"पास्सिव्ह ओबिडियन्स,"** म्हणजे सहनवृत्तीनें राजाज्ञा परिपालन, हें प्रजेचें कर्तव्य आहे, असें सर्वत्र शिकवूं लागले, आणि **चार्लसची** सर्वस्वतंत्र राजा होण्याची इच्छा बहुतेक सुफल झालेली दिसूं लागली, इतक्यांत मृत्यु मध्यें आड आला. १६८५ त फेब्रुअरीच्या २ ऱ्या तारिखेस त्याला गिरकी आली, आणि पुढें थोड्या दिवसांनीं तो मरण पावला. तो मृत्युशय्येवर असतां, **यॉर्कचा ड्यूक** ह्यानें त्याकडे गुप्तपणें एक **रोमन क्याथलिक**पंथी मंक (जोगी) आणला, त्यापासून त्यानें **रोमच्या धर्मा**प्रमाणें अंतकाळचे सर्व संस्कार करून घेतले. नंतर आपल्या दरबारी पुरुषांना व बिशप्सांना आंत बोलावून आपल्या जुन्या थट्टेखोर किंवा विनोदी प्रकारानें " मी मरण्याला असमंजसपणानें इतका उशीर लावला " असें बोलून त्यानें त्यांची त्याकरितां माफी मागितली, आणि त्याची एक प्रीतिपात्र **नेल्ल ग्विन्न** नांवाची नटी होती तिच्याविषयीं तो एक कृपेचा शब्द बोलला. १६८५ त फेब्रुअरीच्या ६ व्या तारिखेस तो "**मेरि मॉनर्क** " (चयनी किंवा रंगेल राजा) गमावला.

पास्सिव्ह ओबिडियन्स नांवाचें मत.

प्रकरण २०.

राज्यक्रांति

दुसरा जेम्स, १६८५–१६८९.
|
वुइलियम आणि मेरी, १६८९–१७०२.
(मेरी मरण पावली, १६९४.)

एका राजाचे अभिप्राय, आशय, किंवा हेतु, खरोखर चांगले असून, तो, केवळ दुराग्रह, आणि वचनांविषयीं बेइमानी, ह्या दुर्गुणांनीं एका साऱ्या राष्ट्रांतील लोकांना आपणाविरुद्ध चार वर्षांत कसें उलटवून घेतो, इतकेंच **दुसऱ्या जेम्सा**च्या कारकीर्दीपासून तात्पर्य प्रदर्शित होतें. मागल्या कारकीर्दीत **पार्लमेंटानें**, गादीला त्याचे पाय बिलकुल लागूं नयेत म्हणून, प्रयत्न केला होता, तथापि जेव्हां, **चार्लसा**च्या मृत्यूनंतर, "मी कायद्यानें स्थापित झालेला **धर्म** आणि **राज्यपद्धति** ह्यांचा संभाळ करीन," अशी त्यानें चौघांत उघडपणें प्रतिज्ञा केली, तेव्हां हरएक माणूस समाधान पावलेलें दिसलें, आणि तो राजा झाला असा डांगोरा पिटला. खरी गोष्ट म्हटली म्हणजे ही होती कीं, तो नवा राजा जरी **क्याथलिक** होता, तरी, **इंग्लिश** कायद्यांप्रमाणें मी अमल करीन असें जेव्हां त्यानें वचन दिलें, तेव्हां तो तें रक्षण करील असें बहुतेक लोकांना साहजिक वाटलें. वचनाप्रमाणें वर्तावें, असाच पहिल्यानें त्याचा इरादा असावा असा संभव दिसतो. परंतु तो खलेल, संकुचित मनाचा, पुरुष असून, स्वमताभिमानी, आणि स्वैर किंवा यथेच्छ वागणारा होता. कोणत्याही वादाच्या गोष्टींत त्याला फक्त आपला पक्ष तेवढा दिसे, म्हणून तो स्वतंत्र लोकांवर अमल करण्याला बिलकूल लायक नव्हता.

तो रोमन क्याथलिक होता ही गोष्ट आबालवृद्धाला माहीत होती, आणि जर फक्त निवांतपणें तो आपला धर्म आचरीत राहता, अथवा इंग्लंडांतील इतर क्याथलिक्सांना आपल्या धर्मानुसार वागण्याविषयीं पार्लमेंटाकडून मोकळीक देवविण्याकरितां तो यत्न देखील करता, तर आपल्या सर्व प्रजाजनांना सुखी करण्याच्या कामीं त्याच्या हातून मोठा कार्यभाग झाला असता.

दुसऱ्या जेम्साचे स्वभावधर्म आणि उद्देश.

परंतु वर सांगितलेल्या दोन गोष्टींहून फारच ज्यास्ती करण्याचा त्याचा इरादा होता. राज्यांतील मुख्य मुख्य सरकारी हुद्द्यांवर क्याथलिक्सांना नेमतां यावें म्हणून टेस्ट आक्ट, म्हणजे कसणीचा कायदा, रद्द करावा, आपल्याला आड येणाऱ्या लोकांना कैदेंत टाकण्याची मनाई करणारा हेबियस कॉर्पस आक्ट रद्द करावा, आणि नंतर ह्याप्रकारें आपल्याभोंवतीं आपल्या मित्रांचा मेळा जमवून, सारें इंग्लंड पुनः रोमन क्याथलिक धर्मांत न्यावें, इतक्या गोष्टी त्याच्या मनांत करावयाच्या होत्या. परंतु, जी इंग्लिश राज्यव्यवस्था जान राजानें माग्ना कार्टावर सही केल्या दिवसापासून सुदृढ होत आलेली होती, तिचा समूळ नाश केल्यावांचून त्या गोष्टी करतां यावयाच्या नाहींत, हें त्याच्या लक्ष्यांत येईना. तो एकदा स्पेन देशच्या वकीलाला म्हणाला, “मी जिंकीन तर सारें जिंकीन, नाहीं तर सारेंच गमावीन,” आणि आपण वागतों त्या रीतीनें, सारें खचीत गमावणार होतें, हें लक्ष्यांत येण्यापुरतें त्याला ज्ञानच नव्हतें.

त्याला राज्याभिषेक होण्यापूर्वी देखील, त्यानें, आपल्या खासगी देवळाचे दरवाजे उघडे ठेवून, मास, म्हणजे क्याथलिकपंथी देवळांत प्रभुभोजननामक संस्कारपूर्वक उपासना करतात ती, प्र-

सिद्ध रीतीनें करण्याविषयीं हुकूम केला. धर्मोपदेशकांनीं **क्याथलिक**धर्माविरुद्ध उपदेश करितां कामा नये असें त्यानें बिशप्सांना सांगितलें, आणि ज्या लोकांना, **टेस्ट आक्टा**प्रमाणें शपथा घेतल्या नव्हत्या, म्हणून कैदेंत टाकलें होतें, त्या सर्वांना कैदेंतून सोडावें असा त्यानें हुकूम केला. हें शेवटचें कृत्य स्वतंत्रतया पाहतां चांगलें होतें. त्या समयीं **क्वेकर**पंथी **पेन्न**, हा **इंग्लंड**मध्यें होता, आणि **जेम्सा**पाशीं त्याचें वजन भारी होतें. त्यानें त्याला तें कृत्य करण्याविषयीं आग्रह केला, आणि १२०० **क्वेकर**पंथी लोक, त्यांच्या दुप्पट **क्याथलिक्स** लोकांशिवाय, तुरुंगांतून सुटून बाहेर आले. परंतु त्या कृत्यावरून एक गोष्ट स्पष्ट झाली, ती ही कीं, **पार्लमेंट**चा, किंवा न्यायाधीशांचा देखील, सल्ला घेतल्यावांचून वागावयाचें असा **जेम्सा**चा इरादा होता, आणि पुढें त्यानें लवकरच दुसऱ्या एका कामांत तशीच वागणूक केली. राजाला नियत उत्पन्न लावून दिलें होतें तें त्याच्या हयातीपुरतेंच होतें. म्हणून, **चार्लस** फेब्रूअरींत वारला तेव्हां, तें बंद झालें, आणि **पार्लमेंट** मे महिन्यापर्यंत भरलें नाहीं. आतां जर तीन महिनेपर्यंत जकाती वसूल करणें बंद केलें असतें तर व्यापार पासला पडला असता, ह्यास्तव **लार्ड गिल्डफर्ड** नांवाचा त्या समयीं एक प्रधान होता, त्यानें, **पार्लमेंट** भरे तोंपर्यंत जकाती वसूल कराव्या परंतु त्यांचें उत्पन्न येईल तें वेगळें अमानत ठेवावें, असें सुचविलें. परंतु **जेम्सा**नें, आपली सत्ता स्थापण्याचा निश्चय करून, **चार्लसा**ला देत आल्याप्रमाणें तें उत्पन्न सरळ आपणाला द्यावें, असा हुकूम केला.

दुसऱ्या जेम्साचीं ऐच्छिक कृत्यें.

नवीन **पार्लमेंटा**साठीं निवडणुकी व्हावयाच्या त्यांचा इतका

काळजीनें बंदोबस्त ठेवला होता कीं, **कामन्सांच्या सभेचे** नवीन सभासद बहुतेक राजाच्या तरफेचे होते, आणि वीस लक्ष पौंडइतकें उत्पन्न त्याच्या हयातीपर्यंत त्याला द्यावें, ह्या गोष्टीला त्या सभेची संमति कांहीं अडचण न येतां पडली. त्या समयीं नुकतेंच एक बंड उत्पन्न झालें होतें, ह्या कारणानें त्या सभेचे सभासद मुद्दाम आपली राजनिष्ठा प्रदर्शित करण्याविषयीं उद्युक्त होते. **राइ हौस**च्या **कटा**नंतर जे **व्हुइग्स** लोक **हालंडांत** पळून गेलेले होते, त्यांपैकीं पुष्कळांनीं, **चार्लस** वारल्यावर, **मान्मथाला**, समुद्रावरून **इंग्लंडांत** जाऊन **क्याथलिक**पंथी नवीन राजा होणार त्याच्याविरुद्ध लोकांना चिथवून उठवावें, अशी टुमणी लावली. **मान्मथ** त्या वेळीं निवांतपणें **ब्रस्सेल्स** एथें राहत असे. त्याला तेथून हालण्याची इच्छा नव्हती, परंतु अतिशय आग्रह करून त्यांनीं त्याचें मन वळविलें. शेवटीं असें ठरलें कीं, **आर्गिल्लचा अर्ल** (हा हालंडांतच आश्रय करून होता), ह्यानें समुद्रावरून **स्काट्लंडांत** जाऊन तेथील **काव्हेनांटर्स** लोकांना बोलावून जमवावें, तोंच **मान्मथानें इंग्लंडच्या** पश्चिमेकडे जावें.

हयातीपर्यंत देण्याविषयीं संमति पडते तें उत्पन्न.

मान्मथाचें बंड, तारीख ११ जून १६८५.

आर्गिल्ल हा मेच्या २ र्‍या तारिखेस **स्काट्लंडांत** अगोदर पोहोंचला, तेव्हां त्याचें **काम्बेल्स** उपनांवाचें सारें कुळगोत त्याच्याभोंवतीं जमलें. परंतु **हालंडाहून** त्याच्याबरोबर जे पुढारी लोक आले होते, ते त्याच्या बातबेतांत फारच ढवळाढवळ करूं लागले. राजाच्या सैन्यानें तो येत आहे अशी खबर ऐकली होती, आणि त्याला अडवायाला त्यांची तयारी होती. तशांत, त्या का-

व्हेनांटर्सपैकीं पुष्कळ लोक बंड करून उठण्याला भीत होते. शेवटीं आर्गिलची फौज उधळून गेली, आणि त्याला धरून कैदकरून एडिंबरो एथें पाठविलें, आणि १६८५ त जूनच्या ३० व्या तारिखेस, त्याला तेथें देहांतशासन केलें. त्यानें शेवटपर्यंत दुसऱ्या लोकांविरुद्ध साक्ष देणार नाहीं म्हणून शौर्यानें साफ सांगितलें. कामन्सांच्या सभागृहाच्या सदरेच्या पुढच्या खोलींत एक तसबीर आहे, तिचें नांव, "आर्गिलची शेवटची निद्रा" असें आहे. एका काव्हेनांट-लार्डानें (काव्हेनांट नांवच्या कटापैकीं बड्या लोकानें) त्या अर्लोचा पक्ष सोडून दिलेला होता. त्या लार्डाला, तो शेवटपर्यंत इमानी असलेला अर्ल, देहांतशासन होण्यापूर्वी एक तास, हातीं पायीं बिड्या असून दिलदुनया खातरेंत नसून कसा स्वस्थपणानें गाढ निजलेला दिसला, हें त्या तसबिरीत हुबहू दाखविलें आहे.

आर्गिलचा सारा बेत फसतो, आणि त्याचा मृत्यु, १६८५.

त्या बंडांत सामील असलेल्या सर्व लोकांना कडक शिक्षा केल्या, आणि पुष्कळांना गुलामगिरीकरितां विकले. डन्नॉट्टर नांवाच्या किल्ल्यांत, त्या "रानवट व्हुइग्सांना," जहाजांवर चढवून अमेरिकेंत पाठविण्यापूर्वी, ज्या तळघरांत कोंडून ठेवलेलें होतें तें तळघर अद्यापि दाखवितात.

मान्मथची पहिल्यानें आर्गिलापेक्षां विशेष सरशी झाली. तो पश्चिमेकडील कौन्टींमध्यें फार लोकप्रिय होता, आणि १६८५ त जूनच्या ११ व्या तारिखेस डार्सेटशायरांतील लाइम नांवाच्या बंदरांत तो समुद्रावरून जाऊन जमिनीवर उतरतांच, लोक "मान्मथ मान्मथ" म्हणून मोठ्यानें आरोळ्या ठोकीत त्याच्या निशाणाभोंवतीं जमले. तो तेथून एक्झीटर एथें पोहोंचेपर्यंत

त्याच्या जवळ १५०० लोक जमले, आणि **टांटन** नांवच्या शहरांत, रस्त्यांतून दोहों बाजूंनीं निशाणें आणि फुलांच्या माळा लावलेल्या होत्या त्यांखालून, त्यानें मोठ्या जयाच्या थाटानें प्रवेश केला, इतक्यांत तरुण मुलींचा एक थवा पुढें आला, आणि त्यांनीं त्याला एक **बायबल** आणि एक तरवार नजर केली. परंतु त्याला फक्त कनिष्ठ वर्गांतले लोक मिळाले. गृहस्थ व धर्मोपदेशक हे सर्व राजाला अनुकूळ होते, किंवा, जर कोणा **प्राटेस्टंटा**ला हात घालणेंच असेल तर तो **आरेन्ज**ची **राणी मेरी** आणि तिचा पति ह्या दोघांनींच घालणें योग्य आहे, इतरांनीं हात घालतां कामा नये, असा त्यांचा विचार ठरलेला होता. शिवाय, **मान्मथानें** आपल्या जाहीरनाम्यांत मी केवळ स्वतंत्र **पार्लमेंटाची** स्थापना करण्यासाठीं आलों आहें असें म्हटलेलें होतें, असें असतां त्यानें **टांटन** एथील बाजाराच्या जागीं आपण राजा झालों असा डांगोरा पिटवूं दिला, ह्यावरून पुष्कळांना राग आला.

मान्मथ राजा झाला म्हणून डांगोरा पिटला, तारीख २० जून.

दरम्यानच्या वेळांत राजाचें सैन्य **लूइ डूरास, लार्ड फेव्हर्शम,** नांवाच्या एका **फ्रेंच** जातीच्या सरदाराच्या हुकमतीखालीं त्याच्या विरुद्ध त्वरेनें चाल करून येत होतें. तें जवळ येऊन पोहोंचतांच त्याला माघारें हटणें भाग पडलें, आणि नंतर १६८५ त जूलईच्या ५ व्या तारिखेस, **ब्रिज्जवॉटर**नजीक **सेज्जमूर** एथें त्याची त्या सैन्याशीं गांठ पडली. ती राजाची फौज, एका शेतांत व्यवस्थेनें रचना करून ठेवली होती, त्या शेताभोंवतीं **बस्सेक्स -हाइन** नांवाचा पाणी काढून लावण्यासाठीं खोल खंदक होता. त्या खंदकानें ती फौज सुरक्षित होती. **मान्मथला** त्या खंदकाची माहिती नव्हती. तो मध्यरात्रीनंतर एका तासानें शत्रूवर एकाएकीं हल्ला

करण्याच्या इराद्यानें आपली फौज घेऊन निघाला, आणि मध्यें दलदल होती तीवरून पार जाण्याला मार्ग शोधून काढून, त्यानें, राजाच्या फौजेचीं बाहेर शिपायांचीं ठाणीं ठेवलेलीं होतीं, त्यांची धांदल उडविली. परंतु त्या खंदकानें त्याचा पुढें जाण्याचा इलाज खुंटला, आणि त्या योगें त्या बाहेरच्या ठाण्यांतील शिपायांना सावरासावर करून पुनः पूर्वस्थितीवर येण्याला वेळ मिळाला. नंतर मोठ्या पहांटेस लढाई जुंपून त्याची ती शेतकरी, आणि दगडी कोळशांच्या खाणींत काम करणारे मजूर, ह्यांची फौज, जरी जिवावर उदार होऊन लढली, तरी शेवटीं तिची पुरी धुळधाणी होऊन फांकाफांक झाली. पुढें दोन दिवसांनीं **मान्मथ** भुकेनें अर्धमेला झालेला एका खंदकांत सांपडला. त्याला पकडून **लंडनास** नेलें. तेथें त्याला जूलईच्या १५ व्या तारिखेस देहांतशासन केलें. त्यानें पहिल्यानें माझा जीव वांचवा म्हणून दीनवाणी विनवणी केली, तथापि शेवटीं मरतांना तो शौर्यानें मेला. त्याच्या खिशांत, तुरुंगाचे दरवाजे खुले व्हावे, आणि रणांत त्याच्या जीवाला धोका येऊं नये म्हणून जवळ बाळगलेले ताईततोडगे सांपडले, त्यांवरून त्या काळांतील भाविक देवभोळेपणाचें विचित्र स्वरूप दृष्टीस येतें. ही **सेज्जमूरची** लढाई **इंग्लंडांत** झालेल्या महत्त्वाच्या लढायांपैकीं शेवटची होय. त्या लढाईत दोघे जगप्रसिद्ध पुरुष होते. (१) **चर्चिल्ल**, हा पुढें **मार्लबरोचा ड्यूक** हा किताब पावला, तो राजाच्या फौजेंत एक कपतान (सरदार) होता; आणि (२) **डानियल डिफो**, ह्यानें **राबिन्सन क्रूसो** नांवाची कादंबरी लिहिली, तो **मान्मथच्या** फौजेंत असून लढला.

सेज्जमूरची लढाई, तारीख ५ व ६ जून, १६८५.

तें बंड तर मोडलें, परंतु पाठोपाठ त्याचा निर्दयपणानें

सूड घेण्याचें काम चालू झालें. **कर्नल** (पलटणींतला एक वरिष्ठ अमलदार) **कर्क** नांवाचा एक पशुतुल्य क्रूर, अंतःकरणहीन, पुरुष होता, त्याला **ब्रिजवॉटर** एथील फौजेचें आधिपत्य देऊन ठेवलें होतें. त्याच्या हाताखालच्या शिपायांना व्याजोक्तीनें **"कर्क्स लांब्स,"** म्हणजे **कर्काचीं** कोंकरें, म्हणत, कारण त्यांच्या झेंड्यावर चिन्ह कोंकरूं हें असून, ते शिपाई अतिक्रूर आणि हिंसक होते. त्यांनीं **कर्कच्या** हुकुमानें, लढाईत पकडलेल्या कैद्यांचे थवेच्याथवे, भयानक क्रूरपणाच्या प्रकारानें फांशी दिले, आणि त्यांचीं प्रेतें राळींत टाकून जाळलीं.

कर्क्स लांब्स.

परंतु ह्याहूनही घोरकर्म तें अजून पुढें व्हावयाचें होतें. **कर्काहूनही**, शक्य असेल तर, रानवट, आणि क्रूर, असा **जेफ्रिझ** नांवाचा न्यायाधीश, दुसऱ्या चार न्यायाधीशांसह, बंडांत सामील असलेल्या लोकांची चौकशी करण्यासाठीं आला. त्या न्यायसभेच्या किंवा न्यायाच्या कोडताच्या बैठकांना पुढें निरंतर **"ब्लडि अस्साइझिझ"** (हिंसक न्यायाच्या कोडताच्या बैठका) असें म्हणूं लागले. त्या बैठकांत ३२० हून एकही कमी नाही इतके लोक फांशीं दिले, आणि ८४१ ना **वेस्ट इंडिझ** नांवाच्या बेटांत गुलामगिरीकरितां विकलें. **समर्सेटशायरांत** प्रत्येक खेड्यांत, आणि प्रत्येक रस्त्याच्या बाजूनें प्रेतें दृष्टीस पडत; आणि शाळेंत, किंवा देवळांत, जाणारीं मुलें ह्यांना कदाचित् आपल्या बापाचें किंवा भावाचें शिर दरवाज्यावर लटकविलेलें पाहण्याचा प्रसंग येई. **बिशप केन** ह्या सत्पुरुषानें आतां दया करा म्हणून **जेम्साची** पुष्कळ पायधरणी केली, परंतु ती सारी व्यर्थ गेली; त्या न्यायाच्या कोडतानें ज्या ज्या गोष्टी केल्या त्या सर्व **जेम्साला** पसंत वाटल्या. तशांत **जेफ्रिझ,**

थि ब्लडि अस्साइझिझ, सेप्टेंबर, १६८५.

मृत्यूला बळी देण्यासाठीं योजिलेल्या त्या हतभाग्य लोकांचा, अचकटविचकट भाषणांनीं आणि निर्दयपणाच्या थट्टामस्कऱ्यांनीं विटंबना करून, अपमान करी. **आलिस लाइल** नांवाच्या एका कुलीन बाईनें दोघां पळून आलेल्या माणसांना फक्त छपवून ठेवलें होतें, एवढ्याच गुन्ह्याबद्दल तिला फांशीं दिलें; आणि त्या न्यायाधीशाला गुप्त रीतीनें ज्या ज्या लोकांनीं मोठमोठ्या पैशाच्या रकमा लांच दिल्या त्यांना मात्र वांचविलें. राजाच्या मर्जीतल्या दरबारी लोकांना गुलामगिरीकरितां विकण्यासाठीं कैद्यांचे तांडेच्यातांडे दिले, आणि ज्या शाळेंत जाणाऱ्या मुलींनीं **मान्मथला बायबल** आणि तरवार नजर केली होती, त्या मुलींना माफी मिळवून देवविण्याबद्दल राणीच्या "प्रतिष्ठेच्या किंवा मानाच्या" दासींना पैशाची मोठी रकम मिळाली.

जेव्हां तें सूड घेण्याचें काम सर्व संपलें, तेव्हां **जेम्सानें जेफ्रिझाला**, बक्षीस दिलें पाहिजे अशा समजुतीनें, **लार्ड चान्सेलर** (पंडितराव) केलें, आणि त्या बंडाचें निमित्त करून पूर्वींची काईम फौज होती, तिला नवीन १०००० काईम फौज ठेवून भरती घातली. त्या फौजेवर, **टेस्ट आक्ट**प्रमाणें शपथा घेतल्या नव्हत्या अशा कित्येक **रोमन क्याथलिक्सांना** त्यानें अमलदार नेमलें. **लार्ड गिल्ड्फर्ड**, आणि **लार्ड हालिफाक्स** (हा प्रिव्हिकौन्सिलाचा अध्यक्ष होता), ह्या उभयतांनीं, आपण **पार्लमेंटाशीं** बेइमानीपणा करीत आहां असें **जेम्साला** सांगितलें. परंतु त्यानें ह्यापूर्वींच **फ्रान्सच्या** राजाकडून पेनशन मिळविण्याची तजवीज केलेली होती, आणि त्याजवळ बलाढ्य सैन्य होतें, त्यामुळें आपण निर्भय आहों असें त्याला वाटत होतें. त्यानें

जेम्स, क्याथलिकपंथी लोकांना लष्करी अमलदार नेमतो.

हालिफाक्साला फांटा दिला, आणि संडर्लंड नांवाचा एक उपकारशील दरबारांत वागणारा मनुष्य होता, त्याला त्यानें त्या हालिफाक्साच्या जागीं नेमलें; आणि पुढें जेव्हां लवकरच लार्ड गिल्ड्फर्ड वारला, तेव्हां, राजाच्या विशेषाधिकाराचा आवेशी पुरस्कर्ता, तो दुर्लौकिक झालेला जेफ्रिझ, ह्याच्या हातीं कौन्सिलांतील मुख्य सत्ता गेली.

ह्याच वेळीं चौदाव्या लूईनें नांटचें ईडिक्ट (नांट एथील राजशासन किंवा आज्ञापत्र) (३४६ वें पृष्ठ पहा), ह्या नांवाचें आज्ञापत्र रद्द केलें, आणि फ्रान्स देशांतून प्राटेस्टंट धर्म समूळ उपटून टाकण्याच्या उद्योगास तो लागला. सर्व ह्यूगेनोपंथी धर्माधिकाऱ्यांना देशपार केलें, परंतु तत्पंथी लोकांना देशत्याग करून जाण्याची मनाई केली, आणि त्यांपैकीं जे कोणी मासला, म्हणजे रोमन क्याथलिकपंथाला अनुसरून होणाऱ्या प्रभुभोजननामक संस्कारपूर्वक उपासनेला, जाणार नाहींत त्यांना फार भयंकर प्रकारानें छळण्याकरितां आणि ठार मारण्याकरितां त्यांच्यामध्यें तळ देऊन राहण्यासाठीं लष्करी स्वारांच्या पलटणी पाठविल्या. ह्या छळणुकींना, ड्रागून्स, म्हणजे स्वार, ह्यांच्याकडून करविल्या म्हणून, ड्रागोनेड्स असें नांव पडलें. त्या छळणुकी इतक्या लाजिरवाण्या आणि क्रूर होत्या कीं, सर्व प्रकारचे सावधगिरीनें बंदोबस्त ठेवले असून, २००००० हूनही ज्यास्तीच ह्यूगेनोस लोक फ्रान्सांतून हालंड, स्विट्झर्लंड, जर्मनी, आणि इंग्लंड, ह्या देशांत युक्तिप्रयुक्तीनें पळून गेले. ह्या पळून गेलेल्या लोकांपैकीं कांहीं धर्मसंबंधी खात्यांत, कांहीं फौजेंत, धंदा पत्करून राहिले, आणि लंडनांत तर स्पिटाल्फील्ड्झ नांवाच्या

ईडिक्ट आफ् नांट हें रद्द केलें, माहे आक्टोबर १६८५.

एका साऱ्या महल्यांत **ह्यूगनो**पंथी रेशमी कापड विणणाऱ्या कोष्टयांची वसाहत झाली. वस्तुतः त्या **ड्रागोनेड्स**नीं (स्वारांकडून छळणुकींनीं) **लूईनें** आपल्या प्रजाजनांपैकीं, अतिशय उद्योगी, कसबी, आणि सधन, अशा लोकांस परदेशांत हाकवून दिलें.

क्याथलिकपंथी राजानें **प्राटेस्टंट्सां**ची कांहीं आगळीक नसतां जी त्यांची छळणूक केली, तिनें साऱ्या **इंग्लिश** राष्ट्रांतील लोकांना भीतीची धडक बसून ते डचकले. परंतु **जेम्स** हा आपल्या प्रजेच्या वृत्तींविषयीं नेहमीप्रमाणें अंध असून, त्याला **लूईनें** केलेल्या कृतीनें फार आनंद झाला. जेव्हां **पार्लमेंट** भरलें, तेव्हां **कामन्सांनीं**, कायद्याविरुद्ध **क्याथलिक**पंथी लष्करी अमलदार त्यानें नेमले, म्हणून त्याला टपका दिला. परंतु तुमचा मजवर विश्वास नाहीं ही गोष्ट नीट नाहीं असें त्यांना सांगून त्यानें त्यांना फक्त कडकावून दपटशा दिला. **लार्ड्सांनीं, कामन्सांहून** धीट होऊन, त्याला स्वच्छ सांगितलें कीं, आपणाला आपल्या इच्छेनें **टेस्ट आक्ट** एका बाजूस ठेवतां येणार नाहीं, किंवा त्याचा त्याग करतां येणार नाहीं. म्हणून राजानें, पुढें त्या गोष्टीविषयीं घटवटना चालूं न देतां, १६८५ च्या डिसेंबरांत **पार्लमेंट** तकूब केलें. तें **पार्लमेंट** पुनः कधींही भरून बसलें नाहीं, परंतु वेळोवेळीं तकूब करून त्याचें त्यानें पुढें दोन वर्षांनीं विसर्जन केलें. त्या **पार्लमेंटाचे** सभासद आपला पुस्तपन्हा करण्याला तयार होतील तेव्हां त्यांना जमून बसूं देण्याचा त्याचा नेहमी मनोदय होता, परंतु तसला योग कधींच आला नाहीं.

पार्लमेंट, टेस्ट आक्ट मोडल्याबद्दल तकरार करतें, १६८५.

ह्या प्रकारें त्यानें सार्वजनिक अडथळा होणार तो अर्जी बंद केला, परंतु तो लोकांचीं तोंडें अगदीं बंद करूं शकला नाहीं.

लंडनांतील काफी-हौसिझ, म्हणजे कवाखाने किंवा काफीघरें, हीं आतां दररोज लोक एकत्र मिळण्याचीं मुख्य ठिकाणें झालीं होतीं. एका तुर्की व्यापाऱ्यानें क्रॉम्वेलच्या कारकीर्दीत पहिल्यानें एक कवाखाना स्थापला, आणि नंतर तसले कवाखाने सर्व शहरभर पसरले. प्रत्येक माणसाचा ह्या कवाखान्यांपैकीं एकादा आवडता कवाखाना, बसण्याचा अड्डा असे. त्यांत त्याचे अगत्याचे मित्र त्याला भेटत, आणि ते सर्व मिळून काफीचे घोट घेत असतां, आणि तमाखूचे झुरके मारून धुराचे लोट सोडीत असतां, गृहच्छिद्रें, अपवाद, विद्याग्रंथ, राजकारणें (सरकारची नीतनेत), किंवा धर्म, ह्यांसंबंधी विषयांची घटवटना करीत. कॉव्हेन्ट गार्डन (कॉव्हेन्ट नांवाचा बाग) ह्या बागेमध्यें असलेल्या वुइल्सच्या कवाखान्यासारखे लोकप्रिय कवाखाने, हीं स्थलें आपआपल्या पुरतीं बहुतकरून लहानशीं पार्लमेंटेंच बनलीं, आणि त्या कवाखान्यांचें वजन इतकें भारी वाढलें कीं, दुसऱ्या चार्लसानें १६७५ त ते बंद करण्याचा प्रयत्न केला होता; परंतु त्या संबंधानें इतका ओरडा झाला कीं, ते पुनः उघडण्याची परवानगी देणें भाग आलें आणि आतां त्या कवाखान्यांतून लोक जेम्स राजाच्या विचित्र वागणुकीविषयीं दररोज खल करूं लागले.

लंडनांतील काफी-हौसिझ, म्हणजे कवाखाने.

असें असतांही, जेम्स सार्वजनिक मताविषयीं फारच थोडी परवा करीत होता. पार्लमेंट तकूब होतांच आपणाला "पाउअर आफ् डिस्पेन्सेशन," म्हणजे कायद्याचा अतिक्रम करण्याचा अधिकार, किती आहे ह्याविषयीं त्यानें गुप्त रीतीनें सर्व न्यायाधीशांचें मत घेतलें. त्या न्यायाधीशांपैकीं चौघांनीं, पार्लमेंटा-

पाउअर आफ् डिस्पेन्सेशन.

वेगळा आपणाला त्या बाबतींत विलकूल अधिकार नाहीं, असें धीर करून त्याला सांगितलें. त्यांना त्यानें लागलाच फांटा दिला, आणि त्यांच्या जागीं त्यांच्याहून आपली आज्ञा मानतील असे न्यायाधीश नेमले. नंतर, त्यानें **सर एड्वर्ड हेल्स** नांवाचा एक **क्याथलिक** होता त्याला **डोव्हर**चा **गव्हर्नर** (सुभेदार) नेमलें होतें, त्यानें **टेस्ट आक्टा**प्रमाणें शपथ घेतली नव्हती म्हणून, त्यावर खटला करून त्याची चौकशी कोडतांत व्हावी अशी त्यानें युक्तीनें तजवीज केली. ती चौकशी होतांना, राजानें, शपथ घेण्याचें कारण नाहीं तीवांचून चालेल, असें मला सांगितलें होतें, अशी **हेल्सानें** तकरार केली. तेव्हां, न्यायाधीशांनीं राजाला पूर्वींच वचन दिलेलें होतें त्याप्रमाणें, अर्थात् त्यांनीं **हेल्स**ला अनुकूल असा ठराव केला.

हें प्रहसन किंवा उपहासपर नाटक झाल्यावर,. **जेम्सानें प्राटेस्टंट**पंथी धर्माधिकाऱ्यांना त्यांच्या वृत्तींवरून काढून त्यांच्या जागीं **क्याथलिक**पंथी धर्माधिकारी नेमण्याचा एकसारखा धडाका चालविला. त्यानें "क्लॉसेटिंग"ची, म्हणजे खलबत करण्याची, म्हणजे लोकांना आपल्या खासगी खोलींत नेऊन **टेस्ट आक्टा**विरुद्ध तुम्ही संमति द्याल काय म्हणून विचारण्याची, नवी चाल घातली. जर त्यांनीं नाहीं म्हणून सांगितलें, तर आपले हुद्दे किंवा जागा ह्यांवर पुढें लवकरच खास घोरपड येणार असें ते समजत असत. **जेम्साचे** मेहुणे हे टॅंकीचे राजभक्त असतांही ह्या खलबताच्या प्रकारानें त्यांचें नुकसान झालें. वडील, **लार्ड क्लारेंडन,** ह्याला **आयर्लंडां**तून माघारें बोलावून, त्याच्या जागीं **लार्ड टिर्कोनेल** नांवाचा एक **क्याथलिक** होता त्याला नेमलें. धाकटा, **लार्ड राचेस्टर,** ह्याला

क्याथलिक्स लोकांच्या सरकारी हुद्द्यांवर नेमणुका होतात.

खजिनदारीच्या हुद्द्यावरून बरतरफ केलें. **लार्ड हर्बर्ट** हा अरमाराचा **रीअर-आड्मिरल** (अरमाराकडील एका पदवीचा अमलदार) होता, त्यानें आपला हुद्दा गमावला, आणि **जेम्स** एथवर देखील लांब गेला कीं, आपल्या **प्रिव्हि कौन्सिलांत** (खासनिसबतीच्या मंत्रिमंडळांत) बसण्याकरितां चौघां **क्याथलिक**पंथी **लार्ड्सांना**, आणि आपल्या **जेझुइट**पंथी **फादर पीटर** नांवाच्या कान्फेस्सराला (ज्याजवळ पातकें कबूल करावयाचीं त्या गुरूला), त्यानें पाचारण केलें.

कोर्ट आफ् एक्लिझिआस्टिकल कमिशन, १६८६.

नंतर त्यानें एक धर्मप्रकरणसंबंधी कोडत स्थापलें, तें कांहींसें मागल्या **स्टार चेम्बर** नांवाच्या कोडतासारखें होतें. त्या नवीन कोडताचा **जेफ्रिझ** ह्याला मुख्य न्यायाधीश नेमलें. **लंडन**चा **बिशप कॉम्प्टन** ह्याच्या हाताखालच्या **डॉक्टर शार्प** नांवाच्या एका रेक्टरानें (धर्माधिकारी विशेष) एका समयीं खंडनमंडनपर धर्मोपदेश केला, तेव्हां त्याला कामावरून सस्पिंड (कांहीं दिवस दूर) करावें असा त्या **लंडन**च्या **बिशपा**ला हुकूम झाला, परंतु त्या हुकुमाप्रमाणें त्या रेक्टराला मी सस्पिंड करीत नाहीं म्हणून त्या **बिशपानें** सांगितलें, तेव्हां त्या कोडतानें त्या **बिशपा**लाच कामावरून सस्पिंड केलें.

आतां **व्हाइटहाल** एथें एक नवीन **क्याथलिक**पंथी खासगी देऊळ (भजनालय) राजाकरितां, आणि **लंडन** शहरांत तसलेंच एक परदेशीय वकीलांपैकीं एका वकीलाकरितां, बांधविलें. **क्याथलिक** धर्मांतर्गत वेगळाल्या पंथांचे **मंक्स** (जोगी) येऊन **लंडनांत** वस्ती करून राहूं लागले. आणि **साव्हॉय** नांवाच्या **लंडन**च्या भागांत **जेझुइट्सांनीं** (जेझुइट नांवाच्या एका

क्याथलिक पंथांतील जोग्यांनीं) एक मोठी शाळा स्थापली. लोक दिवसानुदिवस अधिकाधिक रागावूं लागले हें जेम्साच्या देखील ध्यानीं आलें. लंडन शहरांत दंगे झाले, आणि बंड होण्याचा संभवच राहूं नये, म्हणून लंडनावर दरारा राखण्यासाठीं हौन्स्लो एथें १३००० फौजेची नवी छावणी केली.

हौन्स्लो एथें फौजेची छावणी स्थापली.

नंतर नान्कान्फॉर्मिस्ट्स (देशांत स्थापलेल्या धर्माला अमान्य) लोकांनीं आपला पुरस्तपना करावा अशा आशेनें, जेम्सानें १६८७ त एप्रिलच्या ४ थ्या तारिखेस, दुसरा एक "डेक्लरेशन आफ् इन्डल्जेन्स" (मेहरबानीच्या देणगीचा जाहीरनामा) नांवाचा जाहीरनामा छापून प्रसिद्ध केला. त्यांत, क्याथलिक्स व डिस्सेन्टर्स (स्थापित धर्माला अमान्य लोक) ह्यांना इच्छेस येईल त्या प्रकारानें उपासना करण्याला, आणि टेस्ट आक्टाप्रमाणें कोणत्याही प्रकारची शपथ न घेतां सरकारी हुद्द्यांवर त्यांना राहण्याला, मोकळीक दिली आहे असें विदित केलें होतें. तेव्हां डिस्सेन्टर्स लोकांच्या एका लहानशा समुदायांत राजाचे दोस्त पुढारी होते, त्या समुदायानें त्या मेहरबानगीच्या देणगीचें फार कडाक्यानें अभिनंदन केलें. परंतु ती देणगी देण्यांत, आपल्या पक्षाच्या लोकांना सरकारी कामें मिळण्याचा मार्ग खुला करून द्यावा इतकाच राजाचा हेतु होता ही गोष्ट त्या पुढारी लोकांपैकीं विशेष विचारी होते त्यांच्या तत्काल लक्ष्यांत आली, म्हणून जी देणगी देण्याला राजाला कायदेशीर अधिकार नव्हता, ती देणगी त्यांनीं स्वीकारण्यास नाकारिलें.

डेक्लरेशन आफ् इन्डल्जेन्स, ता० ४ एप्रिल १६८७.

वस्तुतः, तो राजा इंग्लिशांच्या स्वातंत्र्याचीं स्टाटुटें (कायदे)

निर्दयपणानें मोडीत चालला होता. **पोप अकरावा इनोसेन्ट,** हा सुजन आणि शाहणा होता, त्यानें, सहनशीलता आणि नेमस्त-पणा धरण्याविषयीं त्याला बोधपर पत्रें लिहिलीं, परंतु तीं व्यर्थ गेलीं; लूईनें त्याला मागला पुढला विचार करून सावधपणानें वागावें म्हणून बोध केला तो व्यर्थ गेला; त्याच्या **क्याथलिक**धर्मी प्रजाजनांनीं देखील कायद्यांला अनुसरून अमल करावा म्हणून त्याला विनवण्या केल्या परंतु त्याही व्यर्थ गेल्या. सारांश, **जेम्साला फादर पीटर** ह्यानें अगदीं भारून टाकलें होतें, त्यामुळें त्याला वाटे कीं, मी ज्या प्रकारानें वागत आहें त्या प्रकारानें फक्त एकसारखा निश्चयानें वागत राहीन तर, मी लोकांच्या कल्याणासाठीं झटत आहें असें त्यांच्या लक्ष्यांत येऊन ते वश होतील.

जेम्स सर्व सांगीला बहिरा होतो.

आतां त्यानें युनिव्हर्सिट्यांत ढवळाढवळ मांडली. **डॉक्टर मास्से** नांवाचा एक **क्याथलिक** होता त्याला त्यानें **आक्सफर्ड** एथील **क्राइस्टचर्च** नांवाच्या **कालेजाचा डीन** (अधिकारी विशेष) नेमलें, **केंब्रिज** एथील **डाक्टर पेचेल** ह्याला, एका **मंकाला** (क्याथलिकपंथी जोगी ह्याला) डिग्री (पदवी) देण्याचें नाकारिल्याबद्दल सस्पिंड केलें, आणि **आक्सफर्ड** एथील **माग्डलेन** नांवाच्या **कालेजांतील फेलोझ** (पदवीचे सभासद) ह्यांना, ते **डॉक्टर पार्कर** नांवाच्या एका **क्याथलिकाला** आपला अध्यक्ष निवडीनात म्हणून, त्यानें त्या कालेजांतून घालवून दिलें. पुढें एका महिन्यानें त्यानें **पार्लमेंटचें विसर्जन केलें. तें पार्लमेंट** दोन वर्षेंपर्यंत कधींच भरलेलें

म्याग्डलेन नांवाच्या कालेजांतील फेलोझ ह्यांना घालवून दिलें, १६८७.

नव्हतें. नंतर नवीन पार्लमेंटाकरितां नवीन सभासदांच्या निवडणुकी व्हावयाच्या त्याकरितां तो तयारीस लागला. दरएक कौंटींतील **लार्ड लेफ्टेनन्ट्स** (अधिकारी विशेष), **डेप्युटि-लेफ्टेनन्ट्स** (दुयम किंवा नायब अधिकारी), आणि **जस्टिसिझ आफ् धि पीस** (स्वस्थता राखणारे मानाचे न्यायाधीश), ह्यांना, **टेस्ट आक्ट,** व गुन्हेगारांस शिक्षा करण्याच्या संबंधाचे कायदे, ह्यांविरुद्ध मत देण्याविषयीं कबूल करणाऱ्या गृहस्थांना पार्लमेंटाचे सभासद निवडण्याला तुम्ही लोकांना उत्तेजन द्याल किंवा नाहीं, म्हणून त्यानें विचारलें. त्या अधिकाऱ्यांपैकीं ज्यांनीं, आम्ही तसें उत्तेजन देणार नाहीं म्हणून सांगितलें, त्यांना कामांवरून काढून दुसरे लोक त्यांच्या जागीं नेमले. ह्या सर्व कृत्यांचा जणू कळस करण्यालाच **जेम्सानें, पोपाकडील नन्शिओ** ऊर्फ वकील आला, त्याचें दरबारांत मोठ्या थाटानें आगतस्वागत केलें.

दरएक कौंटींत नवे लार्ड-लेफ्टेनन्ट्स आणि दुसरे अधिकारी नेमण्यांत येतात.

आतां कांहीं तरी उद्योग न केला तर देश लवकरच जुलुमी राजाच्या हातीं जाईल, ही गोष्ट **इंग्लंडां**तील राज्यकारणी पुरुषांच्या लक्ष्यांत आली. म्हणून आपण येऊन **इंग्लंड**च्या हक्कांचें आणि स्वातंत्र्यांचें रक्षण कराल काय असें **आरेन्जच्या वुइलियमाला** विचारण्याकरितां गुप्त रीतीनें **हालंडास** त्यांनीं जासूद पाठविले. **वुइलियम** तसें करण्याला सर्वथा राजी होता, कारण तो, आणि **यूरोपां**तील इतर **प्राटेस्टंट** राजे, ह्यांना **चौदाव्या लूई**च्या (फ्रान्सच्या राजाच्या) दिवसानुदिवस वाढत चाललेल्या प्राबल्याविषयीं भारी भीति वाटूं लागली होती, आणि **लूइ** तर **जेम्साचा** दोस्त होता; शिवाय, त्या **प्राटेस्टंट**

आरेन्जच्या वुइलियमाला पहिल्या सूचना होतात, माहे मे १६८८.

राजांना, **इंग्लंड** हा देश बलाढ्य **प्राटेस्टंट** राहणें, हें फार महत्त्वाचें होतें. परंतु दोन गोष्टींनीं **वुइलियम** थबकून राहिला. त्या ह्या. (१) **इंग्लंडां**तील सर्व पक्षांचे लोक आपणाला हातभार देतील अशाविषयीं त्याला खातरी पाहिजे होती, (२) जोंपर्यंत **फ्रेंचां**ची फौज **नेदर्लॅंड्स**वर हल्ला करण्याची भीति दाखवीत होती तोंपर्यंत त्याला त्या देशांतून हालतां येईना. पुढें कांहीं महिन्यांनीं, त्याला वाटणाऱ्या अडचणी नाहींशा होऊन त्याचा मार्ग खुला झाला. १६८८ च्या सेप्टेंबरांत, **लूईनें जर्मनी**शीं युद्ध आरंभलें, त्यामुळें त्याला महामूर कामधंदा उत्पन्न झाला, आणि **वुइलियम** काळजींतून मुक्त झाला.

जेम्साच्या पुत्राचें जन्म, तारीख १० जून १६८८.

दरम्यानच्या वेळांत, **इंग्लंडांत** मोठ्या महत्त्वाच्या गोष्टी घडल्या होत्या. १६८८ त जूनच्या १० व्या तारिखेस, **राजा जेम्स** ह्याला एक पुत्र आणि वारस झाला. **मोडीनाची मेरी** ह्या नांवाच्या त्याच्या दुसऱ्या राणीला फार वर्षें मूल झालेलें नव्हतें त्यामुळें तिला पुत्र होईल असा कोणाचाच कधींही सुमार किंवा कयास नव्हता, आणि लोक **जेम्सा**च्या दुष्ट अमलाखालीं सोशीकपणानें राहिले होते ह्याचें कारण, त्याच्या मृत्यूनंतर, **आरेन्जची मेरी** सर्व बिघडलेल्या गोष्टी पुनः पूर्वीसारख्या नीट करील, अशी त्यांना आशा वाटत होती. आतां पुत्र झाल्यानें ही आशा नाहींशी झाली, आणि **जेम्स** आनंदांत असतां, सारें राष्ट्र हताश झालेलें होतें. राष्ट्रांतील लोक तो मुलगा राणीचाच हें देखील खरें मानीनात. ते म्हणूं लागले कीं, आम्हांवर **क्याथलिक** राजा ठकबाजीनें लादण्याकरितां तो मुलगा गुप्त रीतीनें बाहेरून राजमंदिरांत आणलेला होता, आणि पुष्कळ वर्षेंपर्यंत हा सामान्य समज किंवा ग्रह होऊन राहिला होता.

हा हतभाग्य मुलगा जन्मास येण्याच्या पूर्वी एक महिना, जेम्सानें "**डेक्लरेशन आफ् इन्डल्जेन्स**" नांवाचा जाहीरनामा पुनः छापून प्रसिद्ध केला, आणि सर्व धर्मोपदेशकांना, आपआपल्या देवळांतून पुढील दोन आदित्यवारीं उपासनेच्या समयीं तो लोकांना मोठ्यानें वाचून दाखवावा, असा हुकूम केला. आतां तो जाहीरनामा, एक तर, निःसंशय कायद्याविरुद्ध होता, आणि शिवाय, तो धर्माधिकाऱ्यांना अनीतीचा असा वाटत होता. म्हणून **कांटर्बरीचा आर्चबिशप, सान्क्रॉफ्ट,** ह्यासुद्धां सातां बिशप्सांनीं सह्या करून एक अर्ज दिला, त्यांत, तो जाहीरनामा वाचणें ही आपल्या अंतःकरणाविरुद्ध गोष्ट करणें असें धर्मोपदेशकांना बाटतें सबब ती करण्याविषयीं त्यांवर जुलूम करूं नये, अशी त्यांनीं राजाला विनंति केली होती. तो अर्ज पाहतांच राजाला फार राग आला, आणि नेमलेल्या आदित्यवारीं क्वचित् कोणीं एकाद्या धर्मोपदेशकानें तो जाहीरनामा हुकुमाप्रमाणें वाचला असेल, आणि जेथें जेथें धर्मोपदेशकांनीं तो वाचला, तेथील उपासनेकरितां आलेल्या लोकांचा समाज देवळांतून उठून निघून गेला, हें वर्तमान ऐकल्यावर तर राजाला अधिकच राग आला. तेव्हां **सरकारा**विरुद्ध अर्ज करण्यांत, त्या सातां बिशप्सांनीं फंदफितूर करण्याला उत्तेजक असा निंदापर लेख लिहिण्याचा गुन्हा केला, हा आरोप त्यांवर ठेवून त्यांची चौकशी करण्याविषयीं त्यानें हुकूम केला, आणि आम्ही जामीन देणार नाहीं पाहिजे असल्यास आम्ही आपले जातमुचलके देऊं, असें त्या बिशप्सांनीं सांगितल्यामुळें, त्यांना **टौअर**मध्यें कैदेंत ठेवण्यासाठीं पाठविलें.

सातां बिशप्सांचा अर्ज.

तेव्हां शेवटीं सर्व राष्ट्रांतील लोकांचा क्षोभ कसा असतो तो

दृष्टीस पडला. त्या बिशप्सांना वरकिर्णीत किंवा पडावांत घालून टेम्स नदींतून टौअरमध्यें नेत असतां त्या नदीच्या कांठीं गच्च जमलेल्या लोकांच्या रामरगड्यांतून "देव त्यांचें कल्याण करो" ह्या आशीर्वादाची एकच आरोळी उठली, आणि सारें इंग्लंड एकदम जागें झालें. त्या बिशप्सांमध्यें ब्रिस्टलचा ट्रेलॉनी नांवाचा एक बिशप होता, आणि पश्चिमेकडील दूरदूरच्या प्रदेशीं देखील, शेतकरी लोक, "आणि ट्रेलॉनीला ठार मारण्याचा हुकूम "होईलच तर तीस हजार कॉर्निश (कार्नवालांतले) मुलगे (लोक) "त्याचें कारण विचारतील," ह्या अर्थाचें एका गीताचें पालवपद गाऊं लागले.

जेव्हां चौकशीचा दिवस आला, तेव्हां मोठे मोठे नांवलौकिकाचे वकील त्या बिशप्सांचा पक्ष स्वीकारून त्यांच्या बचावाचें काम चालविण्यासाठीं पुढें घुसले, कोडताभोंवतीं कित्येक मैलांपर्यंत लोकांची गर्दी जमली, आणि जूरीच्या मनांत आलें असतें तरीदेखील त्या बिशप्सांना दोषी ठरविण्याला तिचा धीर झाला नसता. जेव्हां ते अपराधी नाहींत, असा जूरीचा निवाडा लोकांस कळला, तेव्हां देवळांवरच्या घांटांचा गजर होऊं लागला, देवळांत लोकांची गर्दी झाली, मोठमोठाले आनंदप्रदर्शक अग्नि पेटविले, आणि रस्तोरस्तीं जमलेल्या लोकांचे थवे आनंदानें आरोळ्या ठोकूं लागले एवढेंच नव्हे, परंतु, स्फुंदूंही लागले. जेम्स त्या वेळीं हौन्स्लो एथें होता, तेथील लष्करच्या छावणींत एक मोठी आरोळी उठली. त्या आरोळीचा अर्थ काय म्हणून त्यानें विचारिलें तेव्हां, लार्ड फेव्हर्शम ह्यानें उत्तर दिलें, "कांहीं नाहीं महाराज, ते बिशप्स निरपराध ठरले म्हणून शिपा-

बिशप्सांची चौकशी होते, तारीख २९ व ३० जून १६८८.

"यांना फक्त आनंद झाला इतकेंच." तेव्हां राजा म्हणाला, "ह्याला तुम्ही कांहीं नाहीं म्हणतां काय? तर आतां त्या बिशप्सांची धडगत नाहीं." ह्यापुढें चार महिन्यांनीं, आपलीच पुढें धडगत नाहीं, असें शेवटीं त्याच्या अनुभवास आलें.

ते बिशप्स जूनच्या ३० व्या तारिखेस निरपराध ठरले, आणि त्याच दिवशीं **आड्मिरल** (अरमाराचा अध्यक्ष) **हर्बर्ट** हा सामान्य खलाशाचा वेष घेऊन **वुइलियमा**ला मुजरतचें पाचारणपत्र घेऊन गेला. त्या पत्रावर कित्येक बड्या लोकांनीं सह्या केल्या होत्या. **अर्ल डान्बी** ह्यानें **टोरीझ** लोकांकरितां हमी घेऊन सही केली. **डेव्हनशायरचा ड्यूक** ह्यानें **व्हुइग्स** लोकांकरितां हमी घेऊन सही केली. **बिशप कॉम्प्टन** ह्यानें सर्व धर्माधिकाऱ्यांकरितां हमी घेऊन सही केली. **लार्ड रस्सेल** ह्यानें अरमाराकडील लोकांकरितां हमी घेऊन सही केली. **लार्ड श्रूस्बरि, लार्ड लम्ले,** आणि **हेन्री सिड्नी,** ह्या तिघांनीं सर्व सामान्य लोकांकरितां हमी घेऊन सह्या केल्या. तें पाचारणपत्र **वुइलियमा**ला पावतांच आपणाला पाठबळ पक्कें आहे अशी त्याला खातरी वाटली, आणि (लूइ त्या वेळीं जर्मनीशीं झगड्यांत गुंतलेला असल्यामुळें) त्या **वुइलियमा**नें सेप्टेंबरच्या ३० व्या तारिखेस एक जाहीरनामा प्रसिद्ध केला, त्याचा साऱ्या **इंग्लंड**भर लवकरच प्रसार झाला. त्यांत, **मेरी**चा पति ह्या नात्यानें, स्वतंत्र आणि कायदेशीर **पार्लमेंट** स्थापण्यासाठीं फौज घेऊन मी येत आहें, असें त्यानें जाहीर केलें होतें.

प्रिन्स आफ् आरेन्ज वुइलियम ह्याला पाचारणपत्र जातें, तारीख ३० जून १६८८.

शेवटीं **जेम्सा**ची पांचांवर धारण बसली. त्यानें कामांवरून काढलेले **लार्ड-लेफ्टेनन्ट्स** ह्यांना पुनः त्यांच्या त्यांच्या जाग्यांबर

नेमलें, घालवून दिलेले फेलोझ ह्यांना त्यांच्या त्यांच्या कालेजांत पुनः नेमलें; ज्या शहरांच्या सनदा काढून घेतल्या होत्या त्यांना त्यांच्या सनदा परत दिल्या, आणि **फादर पीटर** ह्याला **कौन्सिलांतून** काढलें. परंतु हें सारें, वरातीमागून घोड्याप्रमाणें, समय जाऊन नंतर झालें. १६८८ त नोव्हेंबर महिन्याच्या ५ व्या तारिखेस **वुइलियम** १३००० फौजेनिशीं समुद्रावरून येऊन **टार्बे** एथें जमिनीवर उतरला; आणि जरी

वुइलियम समुद्रावरून येऊन जमिनीवर उतरतो, ता. ५ नोव्हेंबर १६८८.

मान्मथाच्या बंडाचे भयंकर परिणाम आठवून लोकांनीं पहिल्यानें ओढून धरलें, तरी थोड्या दिवसांत बडे लोक आणि गृहस्थ लोक त्याच्या जरीपटक्या भोंवतीं थव्यांच्या थव्यांनीं जमले. ही बातमी **जेम्साला** कळली तेव्हां तिनें तो एकाद्या मोठ्या भीतींत पडला अशी गोष्ट झाली नाहीं. त्याचा सुमार होता कीं, स्वारी झालीच तर ती उत्तरेकडील प्रांतांत होईल; परंतु ती पश्चिमेकडे झाली म्हणून, उत्तरेकडे चाल करून गेलेल्या पलटणी माघाऱ्या बोलावून आणून त्यानें त्यांना पश्चिमेकडे जाण्याविषयीं हुकूम केला. **वुइलियमाचें** बाकी राहिलेल्या मुलखाशीं दळणवळण अगदीं तोडून टाकून, त्याच्या फौजेचा एका धडकेबरोबर चुराडा करून टाकण्याजोगी मोठी फौज रणांगणीं आणूं अशी **जेम्साला** उमेद होती. तो नोव्हेंबरच्या १९ व्या तारिखेस **साल्झबरी** एथें आपल्या फौजेला जाऊन मिळाला, परंतु, दोनशें वर्षांपूर्वी **तिसऱ्या रिचर्डाची** जी अवस्था झाली होती, तीसारखी त्याची अवस्था झाली. तो पाहूं लागला तों, त्यानें आपले म्हणून कल्पिलेले जे दोस्त होते, ते बहुतेक सर्व एकदम त्याचा निरोप न घेतां त्याला सोडून गेले. **लार्ड चर्चिल** आणि दुसरे पुष्कळ लष्करी अमल-

दार, आपआपल्या हुकमतींतील लोकांसहवर्तमान जाऊन **वुइ-लियमाच्या** फौजेला मिळाले, आणि शहरांचे **गव्हर्नर्स** (सुभेदार) ह्यांनीं, आम्ही **प्राटेस्टंट** पक्षाकडील आहों, असें जाहीर केलें.

अशी स्थिति झाली तेव्हां, **जेम्साची** मुलगी **आन** ही, आपला पति **डेन्मार्कचा जार्ज** ह्याच्या सहवर्तमान, **नाटिंग्हमशायरांत डान्बी** एथें पळून गेली, आणि तो हतभाग्य राजा, सर्वांनीं सोडलेला असा होऊन, **लंडनास** माघारा आला. त्यानें आपली बायको व तिचा लहान मुलगा, ह्यांला **फ्रान्स** देशीं पाठवून दिलें, आणि तो स्वतः त्यांना मिळण्याला निघत होता तों, कांहीं कोळ्यांनीं त्याला पकडून माघारें आणलें. परंतु **वुइलियम** फार शाहणा होता म्हणून त्याला फार बंदोबस्तानें ठेवण्याच्या प्रयासांत तो पडला नाहीं. त्याला **राचेस्टर** एथें, त्यावर फारच हयगयीनें नांवाच्या पाहरा ठेवून, ठेवलें होतें. तेथून **जेम्स**, १६८८ त डिसेंबरच्या २३ व्या तारिखेस, कोणीही अटकाव न करतां निसटून **फ्रान्स** देशीं पळून गेला. **राचेस्टर** सोडून जाण्यापूर्वी नवीन **पार्लमेंटाकरितां** सभासदांच्या निवडणुकी करण्याविषयीं जे लेखी हुकूम किंवा आज्ञापत्रें तयार केलेलीं होतीं तीं सर्व त्यानें नासून टाकलीं, आणि राज्याचा **मोठा मोर्तब टेम्स** नदींत टाकला. आपल्या मागें सर्व ब्रह्मघोळ व्हावा अशी त्याची इच्छा होती, आणि **फ्रेंच** फौज बरोबर घेऊन माघारा येऊन आपलें राज्य पुनः जिंकून घेईन अशी त्याला उमेद होती. **चौदाव्या लूईनें** मोठ्या गौरवानें त्याचें आगतस्वागत केलें, आणि तो व त्याची राणी ह्यांना राहण्याकरितां राजमंदिरांपैकीं एक मंदिर तयार करविलें.

जेम्स पळून जातो, तारीख २३ डिसेंबर १६८८.

ह्याप्रकारें रक्ताचा एक थेंबही न गळतां राज्यक्रांति झाली.

न्यायाधीश जेफ्रिझ ह्याचा शेवट.

लंडनांतील बंडाळ लोकांनीं जरी क्याथलिक्सांचीं देवळें लुटलीं, तरी त्यांनीं, आबालवृद्ध ज्याचा द्वेष करीत असा जो **चान्सेलर जेफ्रिझ**, त्याखेरीज इतर कोणालाही उपद्रव दिला नाहीं. तो **जेफ्रिझ वापिंग** एथें एका भटारखान्यांत लपून राहिला होता, आणि त्याला **लार्ड मेयर** (लंडनचा कोतवाल) ह्यानें **टौअरांत** सुरक्षितपणे कोंडून ठेवण्याविषयीं परवानगी दिली तेव्हां, त्यानें तो मोठा उपकार मानला. तेथें तो पुढल्या सालीं वारला.

जेम्स सेन्ट जेम्स नांवाच्या राजमंदिराचा चिरकाल त्याग करून गेल्यावर, फक्त थोड्या तासांनी **वुइलियम** तेथें पोहोंचला. **इंग्लिश, स्काच**, आणि **डच**, शिपायांचे पाहरे लंडनच्या वेगळाल्या भागांत ठेवले, त्यामुळें त्या शहरांत चहुंकडे बऱ्याच प्रकारें पुनः स्वस्थता झाली. **हौस आफ् पीयर्स** (लार्ड्सांची सभा) मात्र काईम होती, ती सभा भरली; परंतु **हौस आफ् कामन्स** (कामन्सांची सभा) त्या वेळीं नव्हती म्हणून, **दुसऱ्या चार्लसाच्या** कारकीर्दीत **कामन्सांच्या सभेंत** बसत होते असे जे कोणी सभासद सांपडले ते, **लंडनचा लार्ड मेयर, आल्डरमेन** (लंडन एथील गांवखात्याकडील सनदी अधिकारी), आणि लंडनांतील **कॉमनकौन्सिल** (स्थानिक राज्यकारभार करणारें मंडळ) ह्यांतील एक कमिटी (निवडक मंडळी), इतक्या लोकांची मिळून **कामन्सांच्या सभेच्या**

मागला राजा जाऊन नवीन राजा होई तोंपर्यंतचा मधला अराजकाचा काळ, तारीख २३ डिसेंबर १६८८ पासून तारीख १३ फेब्रुअरी १६८९ पर्यंत.

स्थानीं एक सभा जमविली. नंतर त्या दोन्ही सभांनीं मिळून वुइलियमाला, तेवढ्या त्या अराजक कालापुरता, आपण राज्यकारभार चालवावा, आणि कामन्सांच्या सभेकरितां सभासद निवडण्याचा अधिकार असलेल्या साऱ्या इंग्लंडांतील लोकांना एका कान्व्हेन्शनाकरितां (सामयिक किंवा सांकेतिक सभेकरितां) सभासद निवडून पाठविण्याविषयीं वटपत्रें पाठवावीं, अशी विनंति केली. असें करण्याचें कारण, पार्लमेंटाला पाचारण करणें म्हटलें म्हणजे फक्त राजाच करूं शकत असे. असो, ही सामयिक सभा जेव्हां १६८९ त जान्युअरीच्या २२ व्या तारिखेस भरली तेव्हां, पुष्कळ वाटाघाट होऊन वुइलियम आणि मेरी हीं उभयतां इंग्लंडचीं राजा व राणी झालीं असा डांगोरा पिटवावा, आणि एकट्या वुइलियमानें राज्यकारभार करावा, असा ठराव झाला. असा ठराव होण्याचें कारण, मेरी इंग्लंडची राणी होऊन आपण तिचा केवळ प्रतिनिधि होऊन राहणें ही गोष्ट वुइलियमानें नाकारली, आणि मेरीची तर आपला सर्व अधिकार किंवा सत्ता आपल्या पतीच्या स्वाधीन करावी अशी इच्छा होती.

परंतु हा ठराव करण्याच्या पूर्वी, लार्ड्स आणि कामन्स ह्या उभय सभांनीं, पुढें कांहीं तंटे राहूं नयेत म्हणून, राजाच्या सत्तेच्या किंवा अधिकाराच्या मर्यादा ठरवून टाकण्याचा निश्चय केला. ह्यास्तव त्यांनीं "डेक्लरेशन आफ् राइट्स" (हक्कांचा खुलासा) नांवाचें एक ज्ञापनपत्र तयार केलें, तोच पुढें कांहीं महिन्यांनीं एक स्टाटूट, म्हणजे कायदा, झाला. ह्या ज्ञापनपत्रामध्यें आरंभीं, जेम्सानें कायदे नष्ट करण्या-

बिल्ल आफ् राइट्स (हक्कांच्या कायद्याचा मसुदा), १६८९.

विषयीं यत्न केला म्हणून त्याला दोष देऊन, त्यांनीं ज्या गोष्टी प्रकट केल्या, त्या येणेंप्रमाणें. (१) **एक्लिझिआस्टिकल कमिशन कोर्ट** (धर्मप्रकरणीं न्यायाचें कोडत) नांवाचें कोडत हें कायद्याविरुद्ध कोडत होय; (२) कायदे तकूब करणें किंवा ते एका बाजूस ठेवणें, द्रव्य उत्पन्न करणें, किंवा जाथू किंवा काईम फौज ठेवणें, ह्या गोष्टी **पार्लमेंटाच्या** संमतीवांचून राजा करूं शकत नाहीं; (३) प्रजाजनांनीं राजाला अर्ज करण्याला प्रतिबंध नसावा; (४) **पार्लमेंटाच्या** सभासदांच्या सर्व निवडणुकी अनिर्बंध किंवा आपखुशीच्या असाव्या; (५) **पार्लमेंटांत** भाषणाचें पूर्ण स्वातंत्र्य असावें; (६) प्रजेच्या दुःखांचा परिहार करण्यासाठीं आणि कायदे सुदृढ करण्यासाठीं **पार्लमेंट** वारंवार भरलें पाहिजे; (७) जूर्‍यांकरतां लोक निवडणें ते प्रामाणिकपणानें निवडले पाहिजेत; आणि घोर राजद्रोहाची चौकशी असेल तेव्हां जुरीदार लोक मिरासदार असले पाहिजेत; (८) अमर्याद दंड, आणि क्रूर आणि शिरस्त्याबाहेरच्या शिक्षा, करतां कामा नये; (९) शेवटीं कोणीही **पेपिस्ट,** म्हणजे **पोपाचा** अनुयायी, किंवा **रोमन क्याथलिक, इंग्लंडच्या** गादीवर पुढें पुनः कधींही बसवूं नये. ते उभय सभांचे सभासद त्या ज्ञापनपत्रांत म्हणाले, हे **इंग्लिश** लोकांचे निःसंदेह हक आणि स्वातंत्र्यांचीं कलमें आहेत, आणि हे करार किंवा अटी, ह्यांनीं **वुइलियम** आणि **मेरी** ह्या दोघांना आज म्हणजे १६८९ त फेब्रुअरीच्या १३ व्या तारिखेस, **इंग्लंडचा राजा** आणि **राणी** केलीं आहेत. **मेरी** मरण पावेल तर एकट्या **वुइलियमानें** राज्य करीत राहवें, आणि त्या दोघांच्या पश्चात् **आन** आणि तिचीं मुलें हीं गादीचीं वारस व्हावींत असा ठराव केला.

तिसरा वुइलियम, १६८९–१७०२.

वुइलियम आणि **मेरी** ह्या उभयतांना १६८९ त एप्रिलच्या ११ व्या तारखेस राज्याभिषेक झाला, आणि **आरेन्जचा वुइलियम** हा पार्लमेंटच्या स्वसंतोषाच्या करणीनें **इंग्लंडचा** राज्यकर्ता **राजा** झाला. परंतु आपल्याला गादीकरितां लढावें लागेल हें तो जाणून होता. **चौदावा लूइ** हा **जेम्साचा** फक्त दोस्त होता एवढेंच नाहीं, परंतु **वुइलियमाला** परदेशीं **फ्रान्सच्या** विरुद्ध लढण्याची सवडच राहूं नये ह्या हेतूनें, **इंग्लंडांतच** त्याला उपद्रव देण्याविषयींही तो फार उद्युक्त होता. म्हणून त्या **लूईनें जेम्साला आयर्लंडांत** जाण्याकरितां द्रव्य आणि लष्करी अमलदार उसने दिले. **आयर्लंडांतील टिर्कॉनेल** नांवाचा **क्याथलिक**-पंथी **लार्ड-लेफ्टेनन्ट** हा, **जेम्साला, इंग्लंड** पुनः जिंकून घेण्याच्या कामीं, २०००० फौजेनिशीं कुमक करण्यासाठीं तयार होता. तेव्हां **जेम्स** समुद्रावरून जाऊन मार्चच्या १२ व्या तारिखेस **किन्सेल** एथें दाखल झाला, आणि मार्चच्या २४ व्या तारिखेस, म्हणजे **लंडनांत वुइलियमाला** राज्याभिषेक होण्याच्या देखील पूर्वी, **डब्लिन** शहरांत **जेम्साचा** अभिनंदनपर आरोळ्यांनीं आदरसत्कार होत होता.

जेम्साचा आयर्लंडांत आदरसत्कार होतो.

इंग्लंडांत तरी, **वुइलियमाला** आबालवृद्ध मानीत होते असें नाहीं. **रेस्टोरेशन,** म्हणजे राजसत्ताक राज्याची पुनः स्थापना, झाल्या दिवसापासून, धर्मोपदेशक, "डिव्हाइन राइट"नें, म्हणजे ईश्वरदत्त हक्कानें, कोणीही राजा राज्य करतो, आणि सर्व प्रजाजनांनीं त्याच्या आज्ञांचें "पास्सिव्ह ओबिडियन्स," म्हणजे सहनवृत्तीनें पालन, केलें पाहिजे, असा लोकांना बोध करीत

आले होते. आतां आपल्या मागल्या राजावर लोक फितवा करून बिथरले होते, म्हणून **पार्लमेंटानें** दुसरा राजा निवडून **नेमला.** ह्यास्तव, जेव्हां **पार्लमेंटाचे** सर्व सभासद आणि सर्व सरकारी कामदार ह्यांना, **वुइलियमाशीं** आम्ही प्रजाधर्मानें वागूं, अशी शपथ घेण्याविषयीं हुकूम झाला, तेव्हां **कांटर्बरीचा आर्चबिशप,** आणि त्या पूर्वी सांगितलेल्या **सातां बिशप्सांपैकीं** पांच **बिशप्स,** आणि पुष्कळ धर्मोपदेशक व इतर लोक, ह्यांनीं, आम्ही ती शपथ घेत नाहीं, असें साफ सांगितलें. ह्या लोकांना **"नॉन्-जूरर्स"** (प्रजाधर्मानें वागण्याविषयीं शपथ न घेणारे) म्हणूं लागले. त्यांना गई करून वागविलें, परंतु ते आपआपल्या हुद्द्यांवर राहूं शकले नाहींत, कारण उपासनेमध्यें **राजा वुइलियम** ह्याकरितां प्रार्थना वाचावी लागे, ती देखील ते वाचीनात. त्या सर्वांनीं मिळून एक पक्ष केला, आणि त्यांचा अखेरचा **"नॉन्-जूरर"** बिशप १८०५ त मरण पावला तोंपर्यंत शंभर वर्षे, ते आपले बिशप्स निवडून नेमीत असत. हे **नॉन्-जूरर्स, क्याथलिक्स,** आणि **जेम्स** ह्या अर्थी **जाकोबस** ह्या लाटिन शब्दावरून, **जाकोबाइट्स** असें **जेम्साच्या** मित्रांना म्हणूं लागले ते **जेम्साचे** मित्र, हे सारे लोक मिळून **सरकारच्या** विरुद्ध सतत फंदफितूर करीत असत. ते **वुइलियमाला** अधिकार नसतां राज्य बळकावणारा असें मानीत, आणि चालीप्रमाणें राजाचें नांव घेऊन त्याला आरोग्य असो असें म्हणून मद्य प्राशन करण्याचा त्यांना प्रसंग येई, तेव्हां आपण, "धि किंग ओव्हर धि वॉटर" (पाण्यापलीकडे म्हणजे समुद्रापलीकडे असलेला जो जेम्स

नॉन्-जूरर्स, १६८९–१८०५.

जाकोबाइट्स.

राजा) त्याचें आरोग्य इच्छून मद्य प्राशन करतों, असें सुचविण्या-करितां ते आपल्या पुढें एक पाण्यानें भरलेला पेला ठेवीत.

स्काट्लंडांत दुसऱ्याच कारणानें दंगे झाले. तेथल्या **काव्हेनांटर्स** लोकांची आजपर्यंत छळणूक झालेली होती. त्यांनीं, आम्ही **वुइलियमा**चा पक्ष स्वीकारला, म्हणून एकदम जाहीर केलें इतकेंच नव्हे, परंतु त्यांनीं **इंग्लिश धर्मा**चे धर्मोपदेशक होते त्यांची निर्भर्त्सना करून त्यांना हाकवूनही दिलें. तसें करतांना त्यांनीं पुष्कळांवर फार निर्दयपणा केला. जेव्हां तो दंगा मोडून पुनः स्वस्थता झाली, तेव्हां **स्काच पार्लमेंटां**त मुख्य अधिकार **काव्हेनांटर्सां**च्याच हातीं आला, आणि **वुइलियम** आणि **मेरी** हीं उभयतां राजा व राणी झालीं म्हणून १६८९ त एप्रिलच्या ११ व्या तारिखेस, **एडिंबरों**तील **क्रास्ला** (क्रूसा)जवळ डांगोरा पिटला. परंतु, **क्लाव्हरहौस**चा **ग्राहाम** नांवाचा एक **जेम्सा**चा जुना अनुयायी होता, त्याचा **व्हाइकौंट डन्डी** हा किताब होता, तो थोडे स्वार बरोबर घेऊन **हाइलंड्स**मध्यें, म्हणजे **स्काट्लंड**च्या पहाडी प्रदेशांत, तडक गेला आणि तेथील सरदारांना **इन्व्हर्नेस्स** नांवाच्या कौंटींत **लाख आबेर** नांवच्या सरोवराच्या कांठीं बोलावून एकत्र जमवून त्यानें लढण्याची तयारी केली. ह्या गोष्टीविषयीं, **सर वाल्टर स्कॉट** ह्या कवीनें पुढें शंभर वर्षांनीं एक काव्य रचलें, त्यांत वर्णन केलें आहे त्याचा गद्यांत अर्थ येणेंप्रमाणें.

काव्हेनांटर्स लोक इंग्लिश धर्मोपदेशकांची निर्भर्त्सना करून त्यांना हाकवून देतात.

"**कान्व्हेन्शनां**तील (सामयिक सभेंतील)
"लार्ड्सांना **क्लाव्हरहौस** ह्याप्रमाणें
"म्हणाला, त्या राजाचा मुकुट

"खालीं पडण्यापूर्वी अनेक मुकुटांचा
"म्हणजे मुकुटधारी पुरुषांचा
"चुराडा केला पाहिजे, ह्यास्तव जो
"जो काव्हलीयर (शिलेदार) इ-
"मानदारीला आणि मला चाहत
"असेल, त्या प्रत्येकानें यावें आणि
"**बॉनी** (सुंदर) **डन्डीच्या**
"टोप्यांच्या मागून चालावें."

असो, हा झगडा फार दिवस चालला नाहीं. **डन्डीवर ज-नरल** (सेनापति) **ह्यू माके** ह्याला बरोबर फौज देऊन पाठविलें, आणि त्या फौजेवर जरी त्या **हाइलंडर्स** लोकांनीं **किलीक्रान्की** नांवाच्या घांटखिंडींत पूर्ण जय मिळविला, तरी त्या लढाईंत **डन्डी** हा ठार मारला गेला. ह्या लढाईनंतर ते **हाइलंडर्स** लोक मागें हटले. नंतर **लोलंड्स**मध्यें (हेट-प्रांतांत) त्या **हाइलंडर्सां**चा रिघाव होऊं नये म्हणून किल्ले बांधले.

किल्लीक्रान्कीची ल-ढाई, तारीख २७ जू-लई १६८९.

पुढें दोन वर्षांनीं एक फार लाजिरवाणी गोष्ट घडली. **वुइलि-यमानें**, आपणाशीं प्रजाधर्मानें वागूं अशी शपथ घेण्याकरितां, १६९२ त जान्युअरीच्या १ ल्या तारिखेच्या पूर्वी हाजीर झालें पाहिजे असें **हाइलंड्स**, म्हणजे पहाडी प्रदेश, ह्यांतील सर्व सरदारांना बोलावणें केलें. तेव्हां डिसेंबरच्या ३१ व्या तारिखेपर्यंत, **ग्लेन्कोचे माकडॉनल्ड्स** ह्या उपनां-वाच्या सरदारांखेरीज, बाकीचे सर्व सरदार हाजीर झाले. त्या **माकडॉनल्ड्सांच्या इआन माकडॉनल्ड** नांवाचा मुख्य सरदार ह्यानें वराण्याचा

ग्लेन्को एथील क-त्तल, १६९२.

मुदतीच्या अखेरीच्या दिवसापर्यंत येणें लांबणीवर टाकलें, आणि तो शेवटीं बोलाविलें होतें त्या ठिकाणीं न जातां भलत्याच ठिकाणीं गेला. त्या समयीं **स्टेरचा मास्टर** (अधिकारी विशेष), **जान डालिंरपल**, हा **स्काट्लंडा**करितां राजकीय **सेक्रेटरी** (चिटनीस) होता. सरकारचा हुकूम अमान्य केला असतां काय होतें, ह्याविषयीं स्मरण राहण्याकरितां नमूना करून ठेवावा असें त्याच्या मनांत येऊन, त्या सरदाराच्या दांडगाईचें निमित्त करून, दुर्दैवानें **वुइलियमा**कडून, त्यानें **ग्लेंको**च्या घराण्याच्या लोकांना मुळासुद्धां उपटून टाकण्याविषयीं वारंट, म्हणजे आज्ञापत्र, मिळविलें. नंतर त्या **डालिंरपलानें आर्गिल** एथील **काम्प्बेल्स** ह्या उपनांवाच्या घराण्यांतील लोकांची एक पलटण **हाइलंड्स**मध्यें पाठविली. ते **काम्प्बेल्स माक्डॉनल्ड्सांचे** पिढीजाद शत्रु होते. त्या पलटणींतील शिपायांनीं, त्या **माक्डॉनल्ड्सां**मध्यें कांहीं दिवस निमूटपणें राहून, एका दिवशीं सकाळीं पहांटेस उठून त्या **माक्डॉनल्ड्सांचें** बहुतेक सारें घराणें गोळ्या घालून ठार मारलें. ती कत्तल विश्वासघातानें आणि दुष्टपणानें केली, आणि ज्या लोकांनीं ती करण्याचा घाट रचला, त्यांना केलें त्याहून ज्यास्त कडक शासन केलें नाहीं म्हणून **वुइलियमा**ला लोकांनीं फार दोष दिलेला आहे.

आयर्लंडांतील यादवी किंवा आपआपसांतील युद्ध, १६८९.

मधल्या काळांत, **आयर्लंडांत** दोन पक्षांच्या दरम्यान आपआपसांत युद्ध झपाट्यानें चाललें होतें. त्यांपैकीं एका पक्षाकडे मूळचे **आयरिश** लोक आणि सारे **रोमन क्याथलिक्स** होते, आणि दुसऱ्या पक्षाकडे त्या देशांत वसाहती करून राहिलेले **प्राटेस्टंट्स** लोक होते. **जेम्स** हा **आय-**

लँडांत आला तो **इंग्लंड** पुनः जिंकून घेण्याच्या इराद्यानें आला, परंतु आमच्या **क्याथलिक धर्मा**चें संरक्षण करून, आमच्या जमिनी आम्हास परत देण्याकरितां, तो आला अशी **आयरिश** लोकांना आशा उत्पन्न झालेली होती. **टिर्कॉन्नेल** ह्यानें दक्षिणेकडील सर्व **प्राटेस्टंट्सांना** निःशस्त्र करून सुरुवात केलेली होती, आणि आपली कत्तल उडेल ह्या भीतीनें त्या **प्राटेस्टंट्सां**पैकीं शेंकडों समुद्र ओलांडून **इंग्लंडांत** गेले. **आयर्लंड**च्या उत्तरेकडे नवीन वसाहती करून राहिलेले लोक दक्षिणेकडील वसाहती केलेल्या लोकांहून संख्येनें फारच ज्यास्ती होते. ते, **लाख अर्ने**वर (अर्ने नांवाच्या सरोवरावर) **एन्निस्किल्लेन** नांवाच्या गांवीं, आणि **लाख फॉयल** (फॉयल नांवाचें सरोवर) ह्याच्या शिरोभागीं **लंडन्डेरी** नांवच्या शहरांत, आपला बचाव करण्यासाठीं एकत्र जमले. जेव्हां **१६८९** च्या एप्रिल महिन्यांत **जेम्स लंडन्डेरी** शहरापुढें येऊन पोहोंचला, तेव्हां त्या "**डेरी**मधील **आप्रेन्टिस** (करारानें शागिर्द होऊन राहिलेले) **बॉयझ्** (मुलगे)" ह्यांनीं, पूर्वींच त्या शहरच्या वेशी बंद केलेल्या होत्या, आणि त्या शहरांत ३०,००० **प्राटेस्टंट्स** लोक आश्रय करून राहिले होते.

ही गोष्ट खरी कीं, तेथील **लंडी** नांवाचा **गव्हर्नर** (सुभेदार) ह्याने, शरण येतों म्हणून, **जेम्सा**कडे बोलणें लावलें, परंतु, त्या शहरांत राहणारे लोक आणि शिपाई त्यावर इतके क्रुद्ध झाले कीं, त्याला आपला प्राण बचावण्यासाठीं पळून जावें लागलें; आणि **वाकर** नांवाचा एक धर्मोपदेशक, आणि कोणी एक **मेजर** (फौजेंतला एक हुद्देदार) **बेकर** नांवाचा लष्करी अमलदार, ह्या दोघांच्या हुकमतीखालीं तेथील लोकांनीं तें शहर **आरेन्जचा वुइलियम** ह्याच्याकरितां बचावून धरिलें होतें. हीच **आरेन्जमेन** (आरे-

न्जच्या पक्षाचे लोक) ह्या नांवाची उत्पत्ति होय. तें नांव **आयर्लंडच्या** उत्तरेकडील **प्रॉटेस्टंट्स** लोकांना अद्यापि सामान्य वहिवाटींत आहे. पुढें त्या शहराला, एकशेंपांच दिवस इतक्या दीर्घ कालापर्यंत चालू ठेवलेला, आणि दुःखप्रद, असा वेढा घातला.

लंडन्डेरी शहराचा वेढा, तारीख २० एप्रिल १६८९.

एप्रिलच्या २० व्या तारिखेस **आयरिशांच्या** फौजेनें त्या शहरची नाकेबंदी केली, आणि अन्नसामग्री शहरांत पोहोंचूं नये म्हणून **फॉयल** नदीच्या मुखाला आडवा अहद-तहद एक जळाऊ लांकडांचा तट किंवा बांध घातला. **वुइलियमानें** त्या शहराची सोडवणूक करण्यासाठीं जूनच्या १५ व्या तारिखेस, **इंग्लिश** अरमार पाठविलें, परंतु त्या अरमाराचा अधिपति, **कर्नल कर्क** हा, तो बांध फोडून आंत घुसण्याचें जोखीम आंगावर घेईना. त्या शहरांत कोंडलेल्या हतभाग्य लोकांपैकीं शेंकडों गणती लोकांचा उपासमार, रोग, आणि मृत्यु, ह्यांनीं संहार मांडला होता. जरी घोड्याचें मांस देखील मिळेनासें झालें होतें, आणि अन्न वांटलें जाई त्याचा सांठा अगदीं संपत आला होता, तरी त्या शहरचे शूर रहिवासी लोक अजून "नो सरेन्डर," म्हणजे शरण जातां कामा नये, अशी आरोळी ठोकीत होते.

शेवटीं **कर्क** ह्याला त्या शहरच्या लोकांची सोडवणूक प्रयत्न करून केलीच पाहिजे असा खरमरीत हुकूम **इंग्लंडाहून** आला, आणि आपण होऊन त्या शहरची सोडवणूक करण्यास तयार झालेल्या लोकांत, **लंडन्डेरी** एथें जन्म पावलेला **ब्राउनिंग**, आणि **डग्लस** नांवाचा **स्कॉचमन**, हे दोघे शूर दर्यावरदी होते, त्यांनीं आपलीं अन्नसामग्री भरलेलीं जहाजें बांध फोडून आंत नेतों म्हणून पत्कर घेतला. त्याप्रमाणें तीं दोन जहाजें जूलईच्या ३० व्या

तारिखेस, कुशीला कूस लावून, सरळ त्या बांधाकडे हकारून गेलीं. त्यांनीं एक ताण किंवा ओढ दिली ती बरोबर एकदम कडाड होऊन तो बांध फुटला आणि मार्ग खुला झाला. त्याच क्षणीं शत्रूंनीं **ब्राउनिंगाला** गोळी घालून ठार मारलें. परंतु तो व्यर्थ मेला नाहीं. पुढें एका तासानें तीं अन्नसामग्रीनें भरलेलीं दोन्ही जहाजें त्या उपाशीं मरणाऱ्या लोकांना पावलीं, आणि पुढें तीन दिवसांनीं, म्हणजे आगस्टच्या १ ल्या तारिखेस, ती **आयरिशांची** फौज मागें हटली. **लंडन्डेरीचा** वेढा उठला. त्याच दिवशीं **कर्नल वूल्स्ली** ह्यानें **एन्निस्किल्लेन** नजीक **न्यूटन बटूर** नांवच्या ठिकाणीं **आयरिशांच्या** फोजेच्या दुसऱ्या एका भागाची धूळधाण करून त्याला पिटून लावलें, आणि **आयर्लंडचा** उत्तर भाग **जेम्साच्या** लष्करापासून मुक्त झाला.

लंडन्डेरीची वेढ्यापासून सोडवणूक, तारीख १ आगस्ट १६८९.

असें असतां, अजून **डब्लिनमध्यें जेम्स** राजासारखा राज्य करीत होता, आणि जवळ द्रव्य नव्हतें म्हणून, पितळेचीं **शिलिंग्स** आणि **साव्हरन्स** (पौंड) हीं नाणीं त्यानें पाडविलीं, आणि **इंग्लंडची** गादी पुनः माझ्या हातीं आली म्हणजे त्या पितळेच्या नाण्यांबद्दल मी खरीं नाणीं देईन असें त्यानें वचन दिलें. **आयरिश पार्लमेंटानें** त्याच्या नांवानें, जे **आयरिश वुइलियमाचा** पक्ष धरून होते, त्यांच्या विरुद्ध कडक कायदे केले, आणि **आयर्लंडांत** वसाहत करून राहिलेल्या बहुतेक **इंग्लिश** लोकांचा जमीनजुमला वगैरे मालमत्ता, गुन्हेगारीदाखल सरकारांत खालसा केली, म्हणून त्या **पार्लमेंटानें** जाहीरनामा लावला. परंतु त्या

जेम्स डब्लिनांत राज्य करतो.

कायद्यांपासून थोडाच इच्छिलेला परिणाम झाला; कारण, **वुइलियमाचा मार्शल स्कॉम्बर्ग** नांवाचा **जर्मन** सेनापति हा फौज बरोबर घेऊन **आयर्लंडांत** दाखल झालेला होता, आणि हिंवाळ्यांत त्याच्या हातून कांहींच झालें नाहीं तथापि, तो तेथील **प्राटेस्टंट्स** लोकांना मोठा संरक्षक झाला.

१६८९ सालाच्या बाकी राहिलेल्या दिवसांत, **इंग्लंड वुइलियमा**च्या अमलाखालीं स्थिरस्थावर होत होतें. त्यानें वाकब असे प्रधान निवडून नेमले, त्यांमध्यें, त्याचा जुना मित्र **लार्ड डान्बी,** हा एक होता. ह्यानेंच **राजपुत्री मेरी** हिच्याशीं त्याचें लग्न जुळवून दिलें होतें (४६० वें पृष्ठ पहा). आणखी **लार्ड हालिफाक्स** हाही त्या प्रधानांत होता. त्यानें **व्हुइग्झ** आणि **टोरीझ** ह्या दोहों पक्षांचें तोल (वजन) समान राखलें. **पार्लमेंटानें** उपयोगी असे पुष्कळ कायदे केले. त्यांतलाच **"टॉलरेशन आक्ट"** (स्थापित धर्माहून इतर धर्मपंथांना मोकळीक देणारा, निषेध न करणारा, किंवा सर्वधर्मसमदृष्टीविषयीं कायदा) ह्या नांवाचा एक कायदा होता. त्या कायद्यानें **डिस्सेन्टर्स,** म्हणजे स्थापित धर्माला अमान्य, अशा लोकांना आपआपल्या देवळांत उपासना करण्याची परवानगी दिली; परंतु **क्याथलिक्सांना** मात्र तशी परवानगी दिली नाहीं, कारण राष्ट्रांतील लोकांना अद्यापि तद्धर्मी लोकांची फार भीति वाटत होती. **पार्लमेंटानें** राजाला १२०००० पौंडांचा महसूल ठरवून दिला, परंतु आतां पहिल्यानेंच त्या रकमेपैकीं कांहीं भाग **कामन्सांनीं** आपल्या हातीं ठेवला. त्यांनीं त्या महसुलापैकीं ३०००० पौंड **वुइलियम** आणि **मेरी** ह्या उभयतांना मिळून जन्मभर जातनेमणूक म्ह-

टॉलरेशन आक्ट, १६८९.

णून करून दिली, आणि कर व जकाती ह्यांचें ६००००० पौंडांचें उत्पन्न चार वर्षांपर्यंतच दिलें. त्या दिवसापासून हालींच्या काळापर्यंत, **पार्लमेंट** राज्यांतील सरकारी खर्चाकरितां दरसाल द्रव्याची पुरवणूक आपल्या संमतीनें ठरवून देत आलें आहे. त्या कारणानें **पार्लमेंट** वर्षांतून निदान एक वेळ तरी भरविलेंच पाहिजे, ही गोष्ट अवश्य प्राप्त झाली आहे.

दरसाल द्रव्याची पुरवणूक पार्लमेंटाच्या संमतीनें होऊं लागते.

तिसऱ्या एका बिल्लानें (कायद्यानें) **पार्लमेंटाला** फौजेवर सत्ता मिळाली. एका वेळीं असें घडलें कीं, एका **स्काच** शिपायांच्या पलटणीनें दंगा केला, आणि जाथू किंवा कायम फौज ठेवणें हें त्या समयीं कायद्याविरुद्ध होतें, म्हणून त्या शिपायांची त्या गुन्ह्याबद्दल चौकशी केवळ सामान्य लोकांच्या चौकशीप्रमाणें करणें प्राप्त होतें. फौजेंत दंगा हा संकटाचाच समय होय, अशा समयीं फौजेंत जास्ती कडक शिक्षा व बंदोबस्त पाहिजे हें लोकांच्या तेव्हांच लक्ष्यांत आलें. म्हणून **पार्लमेंटानें** "म्यूटिनी बिल्ल" (फौजेच्या दंग्याबाबत कायदा) नांवाचा एक कायदा केला. त्यानें लष्करी अमलदारांना **"कोर्ट मार्शल"** (लष्करी कोडत) नांवाचें कोडत नेमून शिपायांची चौकशी करविण्याचा सहा महिनेपर्यंत अधिकार दिला. सहा महिने गुदरले तेव्हां तें बिल्ल (कायदा) पुनः ताजें केलें. ह्याप्रमाणें तेंच बिल्ल प्रत्येक वर्षी ताजें करण्याची वहिवाट पडली. त्या योगें राजाला कांहीं नियमित संख्याक शिपाई बारा महिने सतत ठेवून हुकमतींत वागविण्याची परवानगी मिळत चालली. १८७९ त तें बिल्ल रद्द करून, त्याच्या जागीं **"आर्मी डिस्सिप्लिन आंड रेग्युलेशन बिल्ल."**

म्यूटिनी बिल्ल, १६८९.

(सैन्याचें सुशिक्षण आणि नियंत्रण ह्यांविषयीं कायदा) ह्या नांवाचा नवा कायदा केला. परंतु हा कायदाही दरसाल ताजा करावा लागतोच. सारांश, जर **पार्लमेंट** न भरलें तर राजाला कायदेशीर रीतीनें पैसा मिळावयाचा नाहीं, किंवा फौज ठेवतां यावयाची नाहीं, अशी अटक झाली, आणि **जेम्सानें** जसा जुलूम केला तसल्या जुलुमापासून राष्ट्राचें संरक्षण झालें.

ह्या समयीं फौज जशीच्या तशी काईम ठेवणें खरोखर फार अगत्याचें होतें, कारण **लूइ** हा **जेम्साला** झटून मदत करीत होता. १६९० सालाच्या आरंभीं त्या **लूईनें** एक मोठी **फ्रेंच** फौज **आयर्लंडां**त पाठविली. तेव्हां, त्या फौजेहून मोठी फौज घेऊन जाऊन **आयर्लंड**च्या भूमीवर खुद्द **जेम्साशीं** लढाई केल्यावांचून गत्यंतर नाहीं, ही गोष्ट **वुइलियमा**च्या लक्ष्यांत येऊन चुकली. म्हणून तो जूनच्या १४ व्या तारिखेस **बेलफास्ट** एथें जाऊन पोहोंचला, आणि जुलईच्या १ ल्या तारिखेस त्या दोघां राजांच्या दरम्यान **बॉइन** नदीच्या कांठीं विख्यात लढाई झाली. **इंग्लिशां**कडील शिपायांनीं, त्यांच्यावर गोळ्यांचा भडमार चालला असतां, त्यांतून पायउतारानें ती **बॉइन** नदी उतरून शत्रूंच्या फळ्या फोडल्या, मात्र त्यांचा सेनापति **स्कॉम्बर्ग** हा लढाईच्या सुरवातीलाच मरून पडला; आणि **वुइलियमा**ला लढाईच्या अवलींतच जखम लागली होती, तरी त्यानें आपल्या फौजेच्या डाव्या बाजूची सरदारकी करून तीकडून हल्ला करवून त्यानें जय मिळविला. उलट पक्षीं, **जेम्स** हा दुरून लढाई पाहत होता, आणि जेव्हां **आयरिशांचा** मोड झालेला त्यानें पाहिला, तेव्हां **डब्लिन** एथें पळून जाऊन, **किन्सेल** एथून

बॉइन नदीवरील लढाई, तारीख १ जुलई १६९०.

जहाजांत बसून तो **फ्रान्स** देशीं निघून गेला. **आयरिशांक**डील एक सरदार त्या समयीं म्हणाला, "तुमचा राजा आम्हांला देऊन "आमचा राजा तुम्ही घ्या, म्हणजे आम्ही तुम्हांशीं पुनः लढूं." इतकी त्या **आयरिशांना** आपल्या भित्र्या राजाविषयीं लाज वाटली.

आणि ते **आयरिश** एका वर्षाहूनही ज्यास्त दिवसपर्यंत लढले; शेवटीं, **फ्रेंच** सरदारांच्या हुकमतीखालीं असलेल्या त्या **आयरिश** फौजेचा १६९१ त जूलईच्या २१ व्या तारिखेस **जिन्केल्ल** नांवाच्या **डच** जातीच्या सेनापतीनें **आग्रिम** एथें पराभव केला. त्या बंडवाल्यांचें शेवटचें खंबीर ठिकाण म्हणून **लिमरिक** ह्या नांवाचा किल्ला राहिला होता, तो, **पाट्रिक सार्स्फेल्ड** नांवाचा एक शूर **आयरिश** धरून राहिला होता. तो किल्ला, आक्टोबरच्या ३ ऱ्या तारिखेस, आंतले लोक **जिन्केल्लाला** शरण येऊन, त्याच्या हस्तगत झाला. पुढें **लिमरिक** एथें तह झाला. त्या तहांत **क्याथलिक्सांना** उपासनेची मोकळीक मिळेल असें वचन दिलें, आणि ज्यांची इच्छा होती त्यांना **सार्स्फेल्ड** बरोबर **फ्रान्स** देशीं जाण्याची परवानगी दिली. तेव्हां सुमारें १४००० **आयरिश** शिपाई **फ्रान्स** देशीं गेले, आणि पुढें शंभर वर्षांपर्यंत **आयर्लंडांत** लढाई झाली नाहीं. परंतु आतां सत्ता **प्राटेस्टंट्सांच्या** हातीं आली. त्यांनीं तिचा वाईट प्रकारानें उपयोग केला. **लिमरिकच्या** तहांतील वचनाचें रक्षण केलें नाहीं, आणि **आन**च्या कारकीर्दीत जे फौजदारी गुन्हेगारांना शिक्षेविषयीं क्रूर कायदे केले, त्यांनीं **आयर्लंडांतील क्याथलिक्सांच्या** अंतःकरणांत **हाडवैर** जागृत ठेवलें.

लिमरिक एथील तह, १६९१.

लिमरिक हें हस्तगत होण्याच्या एक वर्षाहूनही ज्यास्तीच दिवस अगोदर, **वुइलियम इंग्लंडास** माघारा आलेला होता. **फ्रान्स** देशाशीं उद्भवलेलें युद्ध पुढें चालविण्याची तजवीज करण्यासाठीं, तो त्या समयीं **इंग्लंडांत** असावयास पाहिजेच होता. १६९०त **जर्मनी, स्पेन, हालंड, ब्रान्डेन्बर्ग,** आणि **साव्हॉय,** ह्या देशांच्या राजांनीं एकत्र मिळून **लूई**च्या विरुद्ध एक **"ग्रान्ड अल्लायन्स"** (मोठा एकवळा किंवा साहाय्यसंकेती कट) केलेला होता, परंतु ते साहाय्यसंकेती इतके मंद होते, आणि **फ्रेंच** फौज इतकी जबरदस्त होती, कीं, पुष्कळ दिवसपर्यंत त्या झगड्यांत **लूई**चीच सरशी होती.

ग्रान्ड अल्लायन्स, १६९०.

१६९० त जूनच्या ३० व्या तारिखेस (म्हणजे **बॉइन**च्या लढाईच्या दिवसाच्या पूर्वदिवशीं) **फ्रेंचांच्या** अरमारानें, **इंग्लिश चानलांत** (खाडींत) **बीचिहेड** नांवाच्या बंदराबाहेर **डच्चांच्या** आणि **इंग्लिशांच्या** अरमारांवर हल्ला केला; आणि **आड्मिरल** (अरमाराचा अधिपति) **हर्बर्ट** (हा आतां **लार्ड टॉरिंग्टन** हा किताब पावलेला होता) ह्याला **डच्चांचा** मत्सर वाटत असल्यामुळें त्यांना तो साहाय्य करीना, म्हणून, त्या लढाईत **फ्रेंचांनीं** पूर्ण जय मिळविला. त्यांचें अरमार त्या **चानल**मधून खालीं हाकारून जाऊन त्यानें **टिन्मौथ** नांवाचें एक लहान खेडें जाळलें.

बीचिहेडची लढाई, तारीख ३० जून १६९०.

तेव्हां **फ्रेंचांचा आड्मिरल** (अरमाराचा अधिपति) **डि टूर्व्हिल्ल** ह्याला, **इंग्लंडांतील जाकोबाइट्स** (जेम्साच्या पक्षाचे लोक) लोक उठतील, अशी आशा होती. परंतु एका **फ्रेंच** माणसाचें आपल्या किनाऱ्यावर फक्त दर्शन होतांच, **इंग्लिश** लोक **वुइलियमाच्या** भोंवतीं एकदिल होऊन

जमले, आणि **वुइलियम आयर्लंडाहून** परत येतांच, **फ्लांडर्स** देशांत **लूई**शीं युद्ध करण्याला, त्याला द्रव्य आणि माणसें पुरवण्यास ते राजी आणि उत्सुक झाले. १६९२ सालीं लवकरच, **इंग्लंडांत** आपल्या जागीं **राणी मेरी** हिला राज्यकारभार चालविण्यास ठेवून, **वुइलियम** समुद्र ओलांडून **नेदर्लंड्स** देशीं गेला.

तो गेला मात्र, इतक्यांत, **इंग्लंडांतील जाकोबाइट्स** लोकांनीं त्याच्या विरुद्ध फंदफितूर करण्यास आरंभ केला. **इंग्लिश** लोकांना **जेम्सा**चा जुलूम नाहींसा करण्याच्या कामीं **वुइलियम** फार उपयोगी असा वाटला होता, तरी तो त्यांना खरोखर कधींही आवडला नाहीं, कारण तो आंतल्या गांठीचा, करड्या स्वभावाचा, आणि एकलकोंडा होता, आणि जरी त्याची आई **पहिल्या चार्लेसा**ची मुलगी होती, तरी तो पैदास्तीनें **डचमन** (डच माणूस) होता. शिवाय जरी त्यानें **इंग्लंडा**वर अमल चांगल्या प्रकारें केला, तरी त्याचें मन परदेशीय युद्धांत गुंतलेलें असे, आणि **इंग्लिशांना हालंडचें** रक्षण करण्यासाठीं फौजेचा खर्च देणें आवडत नव्हतें. **राणी मेरी** देखील पहिल्यानें लोकांना अप्रियच होती, कारण बापाची गादी बळकाविल्याबद्दल लोक तिला दोष देत होते, परंतु ती इतकी सौम्य, शांत, आणि स्वार्थपराङ्मुख होती कीं, शेवटीं ती फारच लोकप्रिय झाली.

वुइलियम लोकांना अप्रिय होतो.

इतक्यांत **लूईनें वुइलियमावर फ्लांडर्स**मध्यें **मॉन्स** एथें जय मिळविला. तें निमित्त करून **जाकोबाईट्स** लोकांनीं **जेम्साशीं** बोलणें लावण्याकरितां कांहीं **टोरीझ** ह्यांचें मन वळवून त्यांना प्रवृत्त केलें. ह्या **टोरीझ**मध्यें **लार्ड चर्चिल** नांवाचा एक होता. त्याला

आतां अर्ल आफ् मार्लबरो हा किताब मिळालेला होता, आणि लार्ड टॉरिंग्टन ह्याच्या जागीं हाइ आड्मिरल (अरमाराचा सर्वश्रेष्ठ अधिपति) झालेला लार्ड रस्सेल हा त्या मार्लबरोच्या अर्लीला मिळण्याला सिद्ध झालेला होता. परंतु रस्सेल्ल हा आडवा येणार नाहीं अशा उमेदीनें जेव्हां फ्रेंचांचें अरमार इंग्लिश चानलमध्यें (इंग्लिश खाडीमध्यें) आलें, तेव्हां त्या इंग्लिश नाविकाचें पित्त खवळलें. तो म्हणाला, "मी आमच्या समुद्रांत फ्रेंचांना आम्हांवर जय मिळवूं देईन, असें मनांत देखील आणूं नका." आणि त्या ईर्ष्येनें, केप ला होगच्या (ला होग नांवाच्या भूशलाकेच्या) बाहेरल्या आंगास, त्या रस्सेलानें मोठा शर्तमर्दीचा जय मिळवून फ्रेंचांचीं पंधरा जहाजें जाळलीं. व्यंग होऊन निरुपयोगी झालेल्या खलाशी लोकांना राहण्याकरितां, ग्रीनिच एथील राजमंदिर हें घर करण्याचा राणी मेरीनें जो निश्चय केला, तो, जेव्हां त्या ला होगच्या लढाई नंतर गरीब जखमी झालेले खलाशी लोक स्वदेशीं माघारे आले, तेव्हांच केला. तिच्या मृत्यूनंतर वुइलियम राजानें तिचा बेत तडीस नेला, आणि १८६५ सालापर्यंत ग्रीनिच एथील हास्पिटलांत (इस्पितळांत, रोगिशालेंत) खलाशी लोक राहत असत. त्या सालीं त्यांना त्या रोगिशालेंत राहूं देण्यापेक्षां त्यांना पेनशनें (बैठीं वेतनें) देणें बरें असें विचारांत आलें. आतां त्या इमारतींत एक रायल नेव्हल कालेज (राजकीय अरमारसंबंधीं,

जाकोबाइट्स लोकांचे फंदफितूर.

ला होगची लढाई, माहे मे १६९२.

ग्रीनिच एथील हास्पिटल (रोगिशाला).

किंवा नौकानयनशास्त्र शिकविण्याची, पाठशाला) नांवाची पाठशाला आहे.

ह्या प्रकारें फ्रान्साच्या हल्ल्यानीं इंग्लंड वुइलियमाशीं अधिक निकट पाशबद्ध झालें मात्र, दुसरें त्यांपासून कांहीं फल झालें नाहीं. १६९२ पासून १६९७ पर्यंत, सालोसाल तो आरंभलेलें युद्ध चालविण्यासाठीं परदेशीं जात होता, आणि परदेशीं लढाया करण्यानें जेम्साला पुनः गादीवर बसविण्याचा लूईचा इलाज तो वुइलियम बिलकूल चालूं देत नाहीं असें पाहून, पार्लमेंटानें त्याला पैसा पुरवण्याविषयीं महत्प्रयास केले. पैसा पुरवणें सोपें काम नव्हतें, कारण आतां ज्यापक्षीं लोक पार्लमेंटच्या द्वारें आपले आपणांवर कर बसवून घेत होते, त्यापक्षीं पूर्वीच्या राजांनीं जसा उसनवार किंवा कर्ज म्हणून जुलुमानें पैसा उकळला होता, तसा आतां जुलुमानें उसनवार किंवा कर्ज म्हणून पैसा उकळतां येण्याजोगा नव्हता. १६९२ त खजीना रिता झालेला होता, आणि युद्धाकरितां पैक्याची तर जरूर होती; तशांत दुसऱ्या चार्लसानें सोनारांचे कर्ज देणें होतें तें अद्यापि फेडलेलें नव्हतें. ह्या कातरकचाटींत, चार्लस मॉन्टेग्यू नांवाच्या एका चतुर तरुण व्हुइगानें, दरसाल सरकाराकडून व्याज मिळत जावे अशा कराराने श्रीमंत लोकांकडून दहा लक्ष पौंड कर्ज मागावें ही युक्ति सुचवून, तसें करण्याविषयीं पार्लमेंटाचें मन वळविलें. हें कर्ज तेव्हांपासून आतांपर्यंत चालत आलेलें आहे, आणि तें साठ कोटि पौंडांहूनही ज्यास्ती एथपर्यंत वाढलें आहे. राष्ट्रीय कर्ज म्हणून सर्वथा नाहींसें केलें जाईल तोंपर्यंत मूळचा वास्तविक कर्जी दिलेला पैसा कधींही परत दिला जाणार नाहीं, परंतु त्याचें व्याज इतक्या एकसारख्या साळसूदप-

राष्ट्रीय कर्ज, १६९२.

णानें देण्यांत येत आहे कीं, लोक आपला पैसा संतोषानें ह्या प्रकारें गुंतलेला राहूं देतात. असें असतांही, कोणा माणसाला आपलें मुद्दल (म्हणजे मूळची गुंतविलेली सारी रकम) परत पाहिजे असेल तर तो एकाद्या **स्टाक ब्रोकर** कडून, म्हणजे सरकारी खतें, शेर (पातीदाखले), हुंड्यापांड्या वगैरे, विकणारा दलाल, ह्याकडून त्या मुद्दलाचें व्याज मिळण्याचा आपला हक्क दुसऱ्या एकाद्या माणसास विकवितो; तो नवा माणूस, त्या पूर्वीच्या माणसानें १०० पौंड किंवा २०० पौंड जे काय पहिल्यानें गुंतविले असतील ते त्याचे त्याला देऊन, पुढें तें व्याज आपण घेऊं लागतो.

वुइलियमाच्या कारकीर्दीत तें **राष्ट्रीय कर्ज** फारच नवीन होतें त्यामुळें, **सरकारा**ला तें फारसें वाढवितां आलें नाहीं. १६९४ त एका **पाटर्सन** नांवाच्या **स्काचमना**नें (स्काट्लंडांतील गृहस्थानें) सुचविलेली दुसरी एक कल्पना त्या **मॉन्टेग्यू**नें सिद्धीस नेली. ती कल्पना ही. दुसरें साडेदहा लक्ष पौंड कर्ज घ्यावें, आणि जे कोणी तें देतील त्या सर्वांना मिळून एक सनद देऊन त्यांची एक **न्याशन**ल **ब्यांक** (राष्ट्रीय पेढी) नांवाची कंपनी करवावी, आणि त्या कंपनीला (मंडळीला) **"धि गव्हर्नर आंड कंपनी आफ् धि ब्यांक आफ् इंग्लंड"** (इंग्लंडच्या पेढीची कंपनी आणि नियंता) असें नांव द्यावें, आणि त्या ब्यांकेनें **सरकार**च्या पैशासंबंधी सारें काम करावें, आणि त्यांच्या पैशावर तिनें व्याज मिळवावें. ह्या कल्पनेप्रमाणें जी ब्यांक स्थापित झाली, ती यशस्वी झाली. सर्व **सरकारी** पैशाची आयतनिर्गत तिजमधून होते. ती खोटीचें सोनें आणि रुपें, किंवा सोन्याच्या आणि रुप्याच्या लगडी, त्यांचें नाणें

ब्यांक आफ् इंग्लंड, १६९४.

पाडीत तोंपर्यंत, ठेवते. ती **राष्ट्रीय कर्जाचें** व्याज देते, आणि **पार्लमेंटाला** जरूर लागेल तेव्हां पैका उसनवार देते. त्या **इंग्लंडच्या ब्यांकेंत** आतां ११०० कारकून चाकरीस ठेवलेले आहेत, आणि त्या ब्यांकेचा दरसाल फक्त पगार आणि पेनशनें (बैठीं वेतनें) ह्यांबद्दल एकंदर ३००००० पौंड खर्च आहे. तिच्या ब्यांकनोटी (एक प्रकारच्या हातचिठ्ठ्या) सोन्याप्रमाणें बिनधोक समजून सगळ्या पृथ्वीवर घेतात, आणि "**सेफ आज धि ब्यांक आफ् इंग्लंड**" (इंग्लंडच्या ब्यांकेप्रमाणें शहाजोग) ही म्हण होऊन गेली आहे.

असो, पैसा कर्जी घेण्याविषयीं हे जे महत्वाचे कायदे पसार झाले त्यांवरून इतकें दिसून येतें कीं, **हौस आफ् कामन्सला** (कामन्सांच्या सभेला), **स्टयूअर्टांना** (स्टयूअर्ट वंशीयांना) गादीवरून हाकवून देऊन **पार्लमेंटाच्या** एका कायद्यानें नवीन राजा गादीवर बसविला त्या योगें, **ट्यूडर** वंशीय राजांच्याही पूर्वीच्या काळची प्राचीन सत्ता पुनः मिळूं लागली होती, आणि **वुइलियम** पुरा शाहणा असल्यामुळें, त्या सभेला तो ती सत्ता वहिवाटूं देऊं लागला होता. परंतु आतां **व्हुइग** आणि **टोरी** हे दोन पक्ष फार कांटेकोर प्रकारानें एकमेकांपासून वेगळाले झालेले होते; म्हणून त्या दोहोंपैकीं जो पक्ष अति प्रबळ होई तो, राजाच्या प्रधानांनीं केलेल्या गोष्टी त्याला पसंत वाटल्या नाहींत म्हणजे, फार जाचक होई. ही अडचण उत्पन्न झाली तेव्हां **संडर्लंडच्या अर्लानें** राजाला सुचविलें कीं, बलाढ्य **गव्हर्नमेंट** (प्रधानमंडल) पाहिजे असेल तर, **पार्लमेंटांतील व्हुइग** आणि **टोरी** ह्या दोहोंपक्षांतून ज्या पक्षांत सभासदांचा समुदाय अति मोठा

पार्टि गव्हर्नमेंट म्हणजे एकेका पक्षाचें प्रधानमंडळ किंवा सरकार, उत्पन्न होतें, १६९३.

असेल त्या पक्षामधून प्रधान निवडून नेमावे, एवढा एकच मार्ग दिसतो. ह्याच पद्धतीनें अद्यापि आमच्या देशांतील राज्यकारभार चालत आहे. **पार्लमेंटांच्या** सभासदांपैकीं **मेजॉरिटीला**, म्हणजे अर्धाधिक सभासदांला, आपणांला अनुकूल अशी संमती देण्याला, एका पक्षाच्या प्रधानांच्यानें प्रवृत्त करवत नाहीं असें झालें, म्हणजे ते प्रधान राजीनामा देतात. मग **राणी** दुसऱ्या पक्षापैकीं कांहीं लोकांना त्या प्रधानांच्या जागा पत्करण्यास आज्ञा करते. त्या लोकांनाही, त्यांची पाळी आली म्हणजे, जर पुरें होईल इतक्या सभासदांच्या संख्येचें आपणांला पाठबळ नाहीं असें वाटूं लागलें, तर **पार्लमेंटाचें** विसर्जन होतें, आणि नवीन **पार्लमेंट** निवडणुकी होऊन नेमलें जातें. ह्या प्रकारें प्रधान हे, राजा किंवा राणी हिचे नौकर असून, **पार्लमेंटांत** पुढाईत, मुखरीण, किंवा नायक, आणि लोकांचे निवडक, शेलके, किंवा खातरीचे, असे होतात.

जरी **वुइलियमाच्या पार्लमेंटांपासून** त्याला पुष्कळ त्रास किंवा उपद्रव झाला, तरी त्या **पार्लमेंटांनीं** उपयोगी असे पुष्कळ कायदे केले. एक नवा “ **ट्रायेन्नियल आक्ट** ” (पार्लमेंट त्रैवार्षिक (तिसाली) असावें असा कायदा) ह्या नांवाचा कायदा झाला, त्यानें प्रत्येक तीन वर्षांनीं नवें **पार्लमेंट** निवडून नेमावें असा ठराव झाला. छापलेलीं पुस्तकें आणि लहान लहान निबंध किंवा पुस्तकें हीं राजाच्या परवाना देणाऱ्या अधिकाऱ्यानें पसंत केलींच पाहिजेत असा निर्बंध करणारा एक कायदा होता, तो रद्द पडूं दिला, आणि पुढें, **सरकाराची** किंवा इतर लोकांची नालस्ती न करतां, कोणाही माणसानें इच्छेस येईल तें छापावें अशी मोकळीक मिळाली. ह्या मोकळीकीचा मोठा परिणाम म्हटला म्हणजे हा

ट्रायेन्नियल आक्ट, १६९४.

झाला कीं, **लंडन गॅझेट्** नांवाचें फक्त एकच वर्तमानपत्र कांहीं दिवसांपासून छापत होतें, त्याच्या बदली लवकरच अनेक नवीं नवीं वर्तमानपत्रें उत्पन्न झालीं, आणि **इंग्लंडच्या** सर्व भागांतील लोकांना मोठमोठाल्या शहरांतून ज्या ज्या गोष्टी घडत आणि ज्या ज्या गोष्टींची वाटाघाट चाले त्या गोष्टी कळूं लागल्या.

मुद्रणस्वातंत्र्य, १६९५.

टॉमस क्रॉम्वेल ह्या नांवाच्या पुरुषानें **आठव्या हेन्रीच्या** कारकीर्दींत राजद्रोहाच्या गुन्ह्याविषयीं एक मोठा दुर्लौकिकाचा कायदा करविलेला होता (२९१ वें पृष्ठ पहा), तो कायदा रद्द करणारा असा दुसरा एक महत्वाचा कायदा ह्या कारकीर्दींत झाला. त्यानें, त्या काळापुढें ज्या माणसांवर राजद्रोहाच्या गुन्ह्याचा आरोप होईल त्यांना बचावाकरितां वकील करण्याची, आणि त्यांच्यावरील आरोपांची नकल त्यांना मिळण्याची, परवानगी मिळाली. त्या दिवसापासून पुढें, **व्हेन, स्ट्राफर्ड, रस्सेल,** आणि **सिड्नी,** ह्यांना, त्यांवर ठेवलेल्या आरोपांपासून बचाव करण्याचें साधन न देतां, अपराधी ठरवून पूर्वी शिक्षा केलेल्या होत्या, त्यांप्रमाणें कोणाही माणसाला बचावाचें साधन न देतां दोषी ठरवून शिक्षा करतां येऊं नये असा बंदोबस्त झाला. शिवाय १७०१ त, न्यायाधीशांना काईम वेतनें देण्याविषयीं, व **पार्लमेंटच्या** उभय सभांची तशी इच्छा झाल्यावांचून, किंवा त्यांवर कांहीं अपराधाची साबिती झाल्यावांचून, त्यांना कामावरून दूर न करण्याविषयीं, एक कायदा पसार झाला. पूर्वी एक न्यायाधीश राजाला अनुकूळ अशी कायद्याची ओढाताण करीना म्हणून **जेम्सानें** त्या

राजद्रोहाच्या गुन्ह्यासंबंधानें कायदा, १६९६.

न्यायाधीशांचें स्वातंत्र्य.

न्यायाधीशाला बरतरफ केलेलें होतें; तसें त्या दिवसापासून कोणाही राजाला कोणाही न्यायाधीशाला बरतरफ करतां येऊं नये असा निर्बंध झाला. आतां जोंपर्यंत न्यायाधीश न्यायाला अनुसरून निर्णय करीत जातील, तोंपर्यंत राजा किंवा लोक ह्यांच्या भीतीपासून ते मुक्त आहेत.

आणखी एका मोठ्या महत्वाच्या गोष्टीबद्दल आम्ही मुख्यत्वें **मॉन्टेग्यूचे** ऋणी आहों. तो हा वेळ येईतों **चान्सेलर आफ् धि एक्स्चेकर** (जमाबंदीच्या कचेरींतील पंडितराव) ह्या पदवीला पावलेला होता. ती गोष्ट ही कीं, त्यानें नवें रुप्याचें नाणें पाडविलें. **दुसऱ्या चार्लसाच्या** कारकीर्दीच्या आरंभापर्यंत, रुप्याचे पत्रे हातानें करून त्यांचे कातरीनें कापून तुकडे करून ते हातोड्यानें ठोकून नीटनेटके आकाराचे करून त्यांवर हातोड्यानेंच ठोकून छाप वठवावे, ही रुप्याचें नाणें पाडण्याची रीति होती. ह्यास्तव ठकबाज लोकांना तीं नाणीं वटावण्यापूर्वी, किंवा चालविण्यापूर्वी, पुनः कातरून त्यांपैकीं थोडें रुपें सहज काढून घेतां येई. ह्या प्रकारें तीं नाणीं आकारानें व किंमतीनें लहान लहान होत जात, आणि वारंवार, कोणा माणसाला पन्नास शिलिंग्स मिळून, तो ते पेढीवर घेऊन गेला म्हणजे ते फक्त पन्नास सिक्सपेन्सांच्या किंमतीचे झालेले आहेत असें त्याला कळून येई. **दुसऱ्या चार्लसाच्या** कारकीर्दींत नवीं नाणीं पाडण्यासाठीं घोड्यांनीं चालणारें यंत्र किंवा चरक वापरूं लागले; त्या नाण्यांना शरीराच्या फांसोळ्यासारखे खचरे किंवा खोबणी पाडलेल्या कडा केलेल्या असत, किंवा त्यांच्या कडांभोंवतीं कांहीं शब्द छापीत असत. त्या योगें, कडा कातरल्या तर तेव्हांच कळून येत. ह्या नाण्यांना **"मिल्ड कॉइन्स"** (चरकांत किंवा यंत्रांत

नवीं नाणीं, १६९६.

पाडलेलीं नाणीं) म्हणूं लागले. परंतु जुनीं नाणीं अद्यापि वापरांत होतींच, म्हणून ठकबाज लोक चांगलीं नाणीं आटीत किंवा तशींच्या तशींच फ्रान्स देशीं पाठवीत; कारण कातरलेल्या नाण्यांपेक्षां तीं किंमतीनें ज्यास्त असत त्यामुळें त्यांना फायदा होई. शेवटीं तें प्रकरण इतकें महत्वाचें झालें कीं, **मॉन्टेग्यू**, आणि **लार्ड चान्सेलर समर्स**, ह्या उभयतांनीं, तत्वमीमांसक **लॉक** आणि **सर आइझाक न्यूटन** ह्या दोघांचा विचार घेऊन, न्यू–मिल्लुडमानी, म्हणजे चरकानें किंवा यंत्रानें पाडलेलें नवें नाणें, पुष्कळ पाडून, जुनें नाणें चलनांतून काढून घ्यावें असें ठरविलें. **न्यूटनाला मिन्टचा (टांकसाळीचा) मास्टर** (अधिकारी) केलें. त्यानें नवें नाणें खरें आणि चोख करण्याविषयीं फार सावधगिरी ठेवली, आणि १६९६ त जुनें नाणें परत मागवून त्यामोबदला तें नवें नाणें चालू केलें. तो फेरफार करतांना पहिल्यानें पुष्कळ त्रास आणि पीडा झाली, परंतु अखेरीस प्रत्येक माणसाला माघारी घेतलेल्या नाण्यांबद्दल पूर्ण किंमतीचें नवें नाणें मिळालें. ह्या मोबदल्यानें सरकारचें नुकसान तर झालेंच, परंतु तें खिडक्यांच्या तावदानांवर कर बसवून, भरून काढलें. ह्या तावदानांवरचा कर १८५१ सालापर्यंत नानाप्रकारच्या कारणांनीं चालू ठेवलेला होता, आणि त्या दीडशें वर्षांत बांधलेल्या पुष्कळ घरांना, खिडक्यांवरील कर टाळावा म्हणून, खिडक्या थोड्या आणि त्यांचीं तावदानें फार लहान असलेलीं पाहण्यांत येतात.

मिल्लुड कॉइन्स.

तावदानी खिडक्यांवर कर बसतो, १६९६–१८५१.

वुइलियमाच्या न्यायी आणि शाहणपणाच्या कारकीर्दीत ह्या उपयोगी सुधारणा होत असतां, खुद्द त्यावर पुष्कळ आपत्ति गुदर-

त्या. १६९५ त राणी मेरी ही देवींनीं मरण पावली, तेव्हां तो कांहीं दिवस तत्संबंधी दुःखाच्या दणक्यानें अ-गदीं बेहोष होऊन राहिलेला होता. शिवाय,

राणी मेरी हिचा मृत्यु, १६९४.

जाकोबाईट्स लोक मेरी वारली ही संधि साधून त्या डच राजापासून (वुइलियमाला ते तसें म्हणत असत) प्रयत्न करून सुटका करून घेण्याच्या उद्योगांत होते. चौदाव्या लूईनें, इंग्लंडांतील लोक बंड करून उठतील तर, मोठी फ्रेंच फौज स-मुद्रावरून पाठवूं असें त्या जाकोबाइट्सांना वचन दिलें होतें; आणि वुइलियम शिकारीहून परत येऊं लागला म्हणजे, त्याला, हाम्प्टनकोर्ट ह्या नांवाच्या राजमंदिराला एका अरुंद आळीं-तून वाट होती, त्या आळींत दग्यानें ठार मारण्याची १६९६ च्या अवलीस एक गुप्त मसलत झाली होती. प्रेन्डर-

वुइलियमाला दग्यानें ठार मारण्याची गुप्त म-सलत, १६९६.

गास्ट नांवाचा एक क्याथलिक गृह-स्थ होता, तो अति थोर मनाचा असल्यामुळें दग्यानें प्राणघात करण्याच्या कामीं मुलाजा करण्याजोगा माणूस नव्हता. त्यानें त्या गोष्टीची राजाला वेळींच इशारत केली. तेव्हां ती मसलत करणाऱ्या लोकांना पकडून शिक्षा केल्या, आणि फ्रेंच लो-कांचा इंग्लंडावर स्वारी करण्याचा इरादा होता, ही गोष्ट लो-कांना कळली तेव्हां, नेहमींप्रमाणें, ते पूर्वींहून राजनिष्ठ मात्र झाले. ह्याकाळीं वुइलियम फारच लोकप्रिय झालेला होता, कारण त्यानें नामूरच्या वेढ्यांत (१६९५ त) मोठा जय मिळविलेला होता, आणि फ्रान्साशीं चाललेलें युद्ध तो यशस्कर प्रकारानें शेवटास नेईल असा लोकांना भरवसा वाटूं लागला होता. त्याचा दग्यानें प्राणघात करण्याविषयीं केलेल्या प्रयत्नानें तर तो अधिकच लोक-

प्रिय झाला. लार्ड्स आणि कामन्स ह्यांनीं एक मंडळी जमवून तींत, वुइलियमाला दग्यानें ठार मारलें असतां त्याच्या मृत्यूचा सूड घेऊन, आनला गादीवर बसविण्याविषयीं, आणाभाकाकरून, आपणांला बांधून घेतलें.

पुढील सालीं, म्हणजे १६९७ त सेप्टेंबरच्या ११ व्या तारिखेस, फ्रान्स देशाशीं चाललेलें युद्ध समाप्त झालें, आणि चौदावा लूइ राजा ह्यानें हालंडांतील रिस्वुइक नांवाच्या गांवीं तहनामा करून त्यावर सही केली. त्या तहांत, १६७८ रांतील निमेगेन एथील तहापासून त्यानें जो मुलूख जिंकलेला होता तो, स्ट्रास्बर्ग नांवाच्या किल्ल्याखेरीज, बाकीचा सर्व त्यानें वुइलियमाला सोडून दिला, वुइलियमाला इंग्लंडचा राजा असें कबूल केलें, आणि त्याच्या राज्याला मी पुनः कधींही विघ्न करणार नाहीं असें वचन दिलें. आठ वर्षें युद्ध चालून शेवटीं इंग्लंडाला शांति किंवा स्वस्थता मिळाली ! नंतर मिरवणुकी निघाल्या, आनंदसूचक मोठेमोठे अग्नि पेटविले, निशाणें गुढ्या उभारल्या आणि दीपोत्सव झाले, त्यांवरून लोकांना किती आनंद झाला होता हें दिसून आलें. क्रिस्टॉफर रेन हा लंडनच्या आगीच्या दिवसापासून सेन्ट पाल नांवाचें देऊळ पुनः नवें बांधीत होता, तें १६९७ त दिसेंबरच्या २ ऱ्या तारिखेस तयार होऊन वुइलियम राजा त्या देवळांत थाटमाटानें गेला. त्याच दिवशीं त्याचा पहिल्यानेंच उपयोग होण्याला आरंभ झाला.

रिस्वुइकचा तह, तारीख ११ सेप्टेंबर, १६९७.

परंतु तह होऊन स्वस्थता झाल्यानें मनाला अत्यंत खेदकारक अशी वुइलियमाची निराशा झाली, कारण, पार्लमेंटानें जी पहिली गोष्ट केली ती ही कीं, फौज एकदम कमी करून फक्त १०,०००

ठेवली, आणि अरमाराकडील सैन्य तसेंच कमी करून फक्त ८,००० लोक ठेवले. पुढील सालीं वुइलियमाच्या डच गाडदी लोकांना फांटा देण्याचा, आणि आयर्लंडांत त्यानें जी जमीन डच लोकांना दिलेली होती ती माघारी घेण्याचा, पार्लमेंटानें आग्रह धरला. त्यांतील सभासदांना, कोणताही राजा प्रबळ झाला, आणि तशांत त्याच्या हाताखालीं बलाढ्य सैन्य असेल, तर ती मोठी भीतीची गोष्ट अशी वाटत होती. वुइलियमाला ती त्यांची कृति, आपणाविषयीं अकृतज्ञतेचीशी वाटून, त्याचें अंतःकरण अतिशय दुखवलें, त्यामुळें, मी ह्यापुढें तुमचा राजा म्हणून न राहतां हालंडास माघारा जातों, अशी त्यानें भीति देखील घातली. परंतु शेवटीं आग्रह सोडून देऊन त्यांना तो वश झाला, तथापि, तुम्ही इंग्लंडाला अगदींच रक्षणावांचून ठेवीत आहां, असें त्यांना त्यानें बजावून सांगितलें.

फौज कमी केली.

खरोखर म्हटलें म्हणजे, लूईला जें पाहिजे होतें तें दुसऱ्या मार्गानें मिळण्याची उमेद होती म्हणून त्यानें तह केला, ही गोष्ट पार्लमेंटाला माहीत नव्हती, पण ती वुइलियम जाणून होता. स्पेनचा राजा, दुसरा चार्लस, हा जरी वयानें फक्त पसतीस वर्षांचा होता, तरी तो अशक्त आणि रोगी होता, आणि तो फार दिवस वांचणार नाहीं हें जगप्रसिद्ध होतें. त्याला संतति नव्हती, आणि त्याला आपलें अफाट राज्य कोणाला तरी आपल्या मागें ठेवून जावयाचें होतें. त्या राज्यांत स्पेन, नेपल्स, सिसिलि, मिलन, स्पानिश नेदर्लंड्स, आणि दक्षिण अमेरिकेंतील सुपीक स्पानिश लांड्स (मुलूख), इतके देश समाविष्ट होते. त्याच्या पश्चात् त्याच्या गादीवर बसण्याला उजू हक्क असणारा असा कोणीच न-

स्पेनच्या गादीच्या वारशासंबंधानें लढा.

व्हता. परंतु त्या चार्लसाचे नातेवाईक असे तीन राजपुत्र होते, आणि वेगवेगळ्या कारणांनीं त्या तिघांचेही हक्क सारखे असल्यामुळें, त्यांच्यांमध्यें आवड निवड करण्याजोगी नव्हती. ते तिघे राजपुत्र हे. (१) बव्हेरियाचा इलेक्टर (राजविशेष) ह्याचा सर्वांत वडील पुत्र जोझेफ; (२) बादशाहा लियोपोल्ड ह्याचा पुत्र, आर्चड्यूक चार्लस; आणि (३) चौदाव्या लूईचा नातू, आन्जूचा ड्यूक, फिलिप. आतां आपल्या नातवाला इतकें अवाढव्य ऐश्वर्य मिळणें, हें यूरोपांतील इतर राष्ट्रांना आवडणार नाहीं, ही गोष्ट चौदावा लूई जाणून होता, म्हणून त्या ऐश्वर्याचा निदान कांहीं अंश तरी त्या नातवाला मिळवून देण्याच्या कामीं वुइलियमानें साहाय्य करावें असा वुइलियमापासून करार करून घेण्याची त्या लूईची इच्छा होती. वुइलियम, फक्त नेदर्लंड्समध्यें लूईचा शिरकाव न व्हावा असें करतां येईल तर, तो करार करण्यास राजी होता. परंतु हितावह असे करार करून घेण्याला आपल्या पाठीशीं बलाढ्य फौज त्याला पाहिजे होती, आणि पार्लमेंटानें ती फौज कमी केल्यामुळें तो फार खिजला ह्याचें कारण हेंच. तथापि फौज कमी झाली असतांही त्यानें आपणाकडून होईल तितका त्या कामीं प्रयत्न केला. पुढें स्पेन देशाच्या दुसऱ्या चार्लसानें एकामागून एक असे दोन तह केले. त्यांपैकीं पहिल्या तहानें, त्या दुसऱ्या चार्लसानें आपल्या पश्चात् आपलें एकंदर राज्य त्या बव्हेरियाच्या तरुण राजपुत्राला दिलें. त्या राजपुत्राविषयीं कोणालाही मत्सर वाटत नव्हता. परंतु तो १६६९ त फेब्रुअरीच्या ६ व्या तारिखेस, दुर्दैवानें वारला. तेव्हां त्या दुसऱ्या चार्लसानें दुसरा तह केला. त्या तहानें, स्पेन आणि

स्पेनच्या राज्याच्या वांटणीच्या संबंधानें पहिला आणि दुसरा असे दोन तह होतात.

नेदर्लंड्स हीं आर्चड्यूक चार्लस ह्याला दिलीं, आणि बाकी सारें राज्य आन्जूच्या ड्यूकाला दिलें. लूईला हें आवडलें नाहीं, परंतु त्यापासूनच होईल तितकें हित साधून घेण्याला तो राजी होता. हा दुसरा तह गुप्त होता, आणि तो करतांना स्पेनच्या दरबारच्या प्रधानांचा सल्ला किंवा विचार घेतला नव्हता. जेव्हां त्यांना आपला मुलूख आपल्या परवानगीवांचून वांटला जात आहे हें कळलें, तेव्हां ते फार रागावले, आणि मुख्यत्वेंकरून ते वुइलियमावर रागावले, आणि दुसरा तह झाल्यावर सहा महिन्यांनीं दुसरा चार्लस वारला त्यापूर्वीं, आपलें सर्वच राज्य आन्जूच्या ड्यूकाला दिलें आहे असें एक मृत्युपत्र करण्याला त्या चार्लसाला त्यांनीं मन वळवून प्रवृत्त केलें. आतां लूइ आपल्याशीं झालेल्या तहाला चिकटून राहणार, किंवा त्या मृत्युपत्राला धरून राहणार, हा प्रश्न उत्पन्न झाला. मृत्युपत्रानें उत्पन्न झालेला मोह पराकाष्ठेचा अनिवार्य होता. वुइलियमाच्या फौजेला फांटा दिला होता हें लूईला कळलें होतें, म्हणून त्यानें यूरोपांतील सर्व राष्ट्रांशीं केलेले सर्व तह मोडले, आणि मृत्युपत्रानें आपल्या नातवाला प्राप्त झालेलें स्पेन देशचें सर्व राज्य त्यानें स्वीकारलें. नंतर तो आन्जूचा ड्यूक पांचवा फिलिप ह्या नांवानें स्पेन देशाचा राजा झाला.

आन्जूचा ड्यूक हा स्पेनचा राजा होतो.

प्रथम दर्शनीं, ह्या प्रकरणाचा इंग्लंडशीं फारच थोडा संबंध आहे असें दिसतें, आणि इंग्लंडच्या पार्लमेंटालाही तसेंच वाटलें. वुइलियमानें त्या प्रकरणांत पडून ते तह केले, ह्या गोष्टीबद्दलच पार्लमेंटाला त्रास वाटला. परकीय देशांच्या संबंधानें युद्धास जाणें पार्लमेंटांतील लोकांना नको होतें ग्लास्टरचा ड्यूक ह्या

नांवाचें जें आनचें शेवटचें जिवंत मूल होतें तें नुकतेंच वारलें होतें, तेव्हां आनच्या पश्चात् कोणीं राज्य करावें ह्या गोष्टीचा ठराव करण्याविषयीं त्यांना विशेष काळजी होती. म्हणून त्यांनीं "आक्ट आफ् सेट्लमेन्ट" (राजनियोजन किंवा गादी कोणास मिळावी ह्याविषयीं ठरावाचा कायदा) ह्या नांवाचा कायदा केला.

आक्ट आफ् सेट्लमेन्ट, १७०१.

त्यांत, इंग्लंडची गादी आनच्या मृत्यूनंतर हानोव्हरची इलेक्ट्रेस्स, सोफैया, आणि तिची संतति, ह्यांना मिळावी असा त्यांनीं निर्णय केला. ती सोफैया पहिल्या जेम्साची नात होती, आणि इंग्लंडच्या राजवंशांत उत्पन्न होऊन प्राटेस्टंट धर्मी अशी तेवढी ती एकच होती (२२ व्या प्रकरणाच्या आरंभींची वंशावळ पहा). ह्याच कायद्याच्या आधारानें आमची हालींची राणी गादीची मालकीण झालेली आहे.

परंतु पार्लमेंटाच्या लवकरच प्रत्ययास आलें कीं, फार दूरच्या संकटाकरितां तरतूद करीत असतां, अति संनिध असलेल्या संकटाकडे आपलें अलक्ष्य झालें. मागल्या युद्धाचा सारा उद्देश, स्पानिश नेदर्लंड्स (स्पेनच्या ताब्यांत असलेलें नेदर्लंड्स) मध्यें फ्रेंचांचा शिरकाव होऊं नये हा होता, आणि आतां तर, बुइलियम हा फिलिपाला स्पेनच्या राज्याच्या

लुइ हा नेदर्लंड्समधील किल्ले आपल्या हस्तगत करतो.

अंगभूत असलेल्या नेदर्लंड्सचा राजा असें मान्य करी तोंपर्यंत, लूईनें आपला नातू पांचवा फिलिप ह्याच्या नांवानें नेदर्लंड्समधील किल्ल्यांतून रखवालीकरितां फ्रेंच फौजेच्या तुकड्या ठेवल्या, आणि तेथील पूर्वींच्या रखवाली करणाऱ्या डच फौजेच्या तुकड्यांना कैदकरून देखील ठेवलें. इतकें झालें तरी देखील पार्लमेंटाच्या

मनांत लढाई करावी असें येईना. पार्लमेंटानें इतकें मात्र केलें कीं, नेदर्लंड्समधून लूईला घालवून देण्याकरितां, इंग्लंड, हालंड, आणि लियोपोल्ड बादशाहा, ह्या तिघांच्या दरम्यान "ट्रिपल अल्लायन्स" (तिघांचा सख्यसंकेती दोस्तीचा कट) नांवाचा दोस्तीचा कट करण्याविषयीं वुइलियमाला परवानगी दिली. शेवटीं १७०१ च्या सेप्टेंबर महिन्यांत एका दिवशीं, दुसरा जेम्स राजा फ्रान्स देशीं मृत्यु पावून, चौदाव्या लूईनें त्याच्या पुत्राला इंग्लंडचा तिसरा जेम्स ह्या नांवानें राजा असें मान्य केलें, असें पार्लमेंटाला वर्तमान कळलें. तेव्हां लूई इतका बलाढ्य होणें हें किती भयावह आहे, हें सर्व राष्ट्रांतील लोकांच्या एकदम लक्ष्यांत आलें. इंग्लंडचा राजा कोण झाला पाहिजे, हा त्या लूईनें आपणांला हुकूम करावा, ही गोष्ट त्या लोकांना सहन होईना, म्हणून त्यांनीं युद्ध केलेंच पाहिजे अशी एकच ओरड मांडली. तेव्हां वुइलियमानें त्या टोरीपक्षाच्या पार्लमेंटाचें विसर्जन केलें, आणि दुसऱ्या पार्लमेंटाची निवडणूक करविली. त्या नव्या पार्लमेंटानें, इंग्लंडच्या कारभारासंबंधानें निर्णय करण्याविषयीं आग्रह धरणाऱ्या त्या फ्रेंच राजाविरुद्ध युद्ध करण्यासाठीं, द्रव्य देण्याविषयीं आणि नवी फौज ठेवण्याविषयीं एकदम संमति दिली.

ट्रिपल अल्लायन्स.

लूई हा प्रिटेन्डर (तोतया) झाला राजा म्हणून मान्य करतो, माहे सेप्टेंबर १७०१.

परंतु वुइलियमाची प्रकृति फार दिवसांपासून थकत चालली होती, त्यामुळें तो अतिशय बीमार होता म्हणून त्या नवीन फौजेचें जातीनें आधिपत्य करणें त्याच्या हातून झालें नाहीं. लार्ड चर्चिल हा त्यावेळीं अर्ल आफ् मार्लबरो हा किताब पावलेला होता, तो युद्धकलेमध्यें परम निपुण होता, ही गोष्ट वुइलियमाला माहीत

होती म्हणून त्यानें त्याला मुख्य सेनापति नेमलें. युद्धाला आरंभ करणार अशी जाहिरात लावण्यापूर्वीच वुइलियमाच्या कारकीर्दीची समाप्ति झाली. १७०२ त फेब्रुअरीच्या २० व्या तारिखेस, तो आपल्या घोड्यावरून पडला आणि त्याचें जत्रु किंवा सरी नांवाचें मानेजवळचें हाड मोडलें; आणि मार्चच्या ८ व्या तारिखेस, ज्यानें इंग्लंडच्या हितासाठीं इतके प्रयास केले, आणि जो, त्या प्रयासांच्या मोबदला, तेथील लोकांपासून इतकी अल्प कृतज्ञता पावला, तो गंभीर आणि मौनी पुरुष चिरकालिक विश्रांतीला गेला.

वुइलियमाचा मृत्यु, तारीख २० फेब्रुअरी, १७०२.

प्रकरण २१.

अखेरीची स्ट्यूअर्टवंशीय.

राणी आन, १७०२–१७१४.

वुइलियम वारतांच आन राणी झाली म्हणून सर्वत्र जाहीर केलें. तिचा तरुण क्याथलिकपंथी सावत्र भाऊ जेम्स स्ट्यूअर्ट हा, गादी मिळविण्याविषयीं प्रयत्न करण्यांत कांहीं फलाची आशा उरली नाहीं, ही गोष्ट जाणून होता. तो फ्रेंच दरबारीं राहिला, आणि त्याला तेथें तिसरा जेम्स राजा, किंवा "धि चिव्हलीयर डि सेन्ट आर्जे," म्हणत; परंतु इंग्लंडांत तो "धि

आन राणी झाली म्हणून डांगोरा पिटला.

प्रिटेन्डर " (तोतया, ढोंगी) ह्या नांवानें प्रसिद्ध होता. स्कांट्लंडांत त्याचे पुरस्कर्ते पुष्कळ होते, परंतु त्यांच्यानें कांहीं हालचाल करवत नव्हती.

आन राणीला इंग्लिश लोक " धि गूड क्वीन आन " (साध्वी राणी आन) असें म्हणत. ती त्यांना फार आवडती होती. त्यांना पुनः एकवेळ इंग्लिश वंशापैकीं राजसत्तानिधान मिळालें म्हणून फार संतोष झाला. ती धिम्या बुद्धीची, आणि दुराग्रही बायको होती, परंतु ती मायाळू आणि सत्वस्थ होती. एलिझाबेथ राणीप्रमाणें ती आपल्या प्रजाजनांवर प्रेम करी, आणि त्यांचें बरें करावें ही तिची इच्छा होती. तिचीं मुलें एकामागून एक गमावलीं तेव्हां देवाची मर्जीच तशी असें मानून ती संतुष्ट राहिलेली पाहून लोक तिला फार मान देऊं लागले. ती मार्लबरोच्या सल्ल्यानें फार वागे, कारण त्याची बायको तिची बाळपणापासून मैत्रीण होती, आणि त्या दोघीजणी एकीमेकीला बहुतकरून दररोज पत्र लिहीत. आन लेडी मार्लबरोला (मार्लबरो बाईला) "मिस्ट्रेस्स फ्रीमन" असें म्हणे, आणि लेडी मार्लबरो आन राणीला "मिस्ट्रेस्स मॉर्ले" असें म्हणे. आनचा पति, डेन्मार्कचा प्रिन्स जार्ज, (राजपुत्र जार्ज) हा मंदबुद्धि असून, सुशील पुरुष होता, तो राजकारस्थानांत बिलकूल हात घालीत नसे. आनच्या कारकीर्दीत जे कलह झाले, ते, ती राणी आणि तिची प्रजा, ह्यांच्या दरम्यान झाले नाहींत, परंतु ते, व्हिग्स आणि टोरीझ ह्यांच्या दरम्यान झाले.

आन राणीचे गुणदोष.

व्हिग्सांना फ्रान्स देशाशीं युद्ध करावयास पाहिजे होतें, आणि

टोरीझांना फक्त इंग्लंडच्या किनाऱ्यांचें रक्षण करावयास पाहिजे होतें, यूरोप खंडांत जाऊन लढाई करणें नको होतें. मार्लबरो हा नेमस्त टोरी होता खरा, परंतु सेनापति ह्या नात्यानें तो युद्धाविषयीं फार उत्सुक होता. तसाच लार्ड गोडॉल्फिन हाही युद्धाविषयीं उत्सुक होता. तो गोडॉल्फिन, लार्ड हाइ ट्रेझरर (सर्वश्रेष्ठ खजिनदार) होता. प्रधानमंडलांत ह्या दोघां पुरुषांचें पुढील आठ वर्षें मुख्य वजन होतें.

मार्लबरो आणि गोडॉल्फिन ह्यांचें प्रधानमंडल.

राज्याभिषेक झाल्या नंतर फ्रान्साशीं युद्ध करणार म्हणून फार त्वरेनें राणीनें जाहीर केलें, आणि मार्लबरोनें समुद्र ओलांडून नेदर्लॅड्समध्यें जाऊन लीएज नांवाचें शहर घेतलें. लूईच्या तरफेला बव्हेरियाचा राजा मात्र होता. परंतु त्याच्या विरुद्ध पक्षाकडे, जे राजे व लोक होते ते येणेंप्रमाणें. (१) डच लोक, ह्यांना त्याला स्पानिश नेदर्लॅड्स (स्पेनच्या ताब्यांतील नेदर्लॅड्स) मधून हाकवून द्यावयास पाहिजे होतें; (२) इंग्लिश लोक, ह्यांना, त्यानें 'प्रिटेन्डर'ला घालवून द्यावयाला पाहिजे होतें; (३) जर्मनीचा बादशाहा, लियोपोल्ड, ह्याला आर्चड्यूक चार्लस ह्याकरितां स्पेनचें सारें राज्य पाहिजे होतें; (४) प्रशियाचा राजा; (५) पोर्टुगलचा राजा; (६) साव्हॉयचा ड्यूक; आणि (७) दुसरे कित्येक छोटेखानी राजे. तें युद्ध एकाच समयीं नेदर्लॅड्स, स्पेन, इटली, आणि जर्मनी, इतक्या देशांत चालू झालें होतें. मुख्यत्वेंकरून ज्या तिघां पुरुषांच्या सल्ल्यानें त्या प्रचंड कटांतील

ग्रांड अलायन्स, म्हणजे साहाय्यसंकेती दोस्तांचा प्रचंड कट, होऊन फ्रान्स देशाशीं युद्ध जुंपतें.

लोक वागत होते ते हे. (१) व्हाइनसेयूस, हा हालंडच्या लोकसत्ताक राज्याचा ग्रांड पेन्शनरि (मुख्य प्रधान किंवा प्रमुख मुतसद्दी) होता; (२) साव्हॉयचा प्रिन्स (राजपुत्र) यूजीन, हा जर्मनीच्या बादशाहाकडील सेनाधिपति होता; आणि (३) मार्लबरो, हा सर्वत्रच नायक किंवा चालक होता.

मार्लबरोनें ह्या प्रसंगीं जें काम केलें तें सांगितलें असतां खरें देखील बहुतकरून वाटणार नाहीं. तो फ्लांडर्स आणि स्पेन ह्या देशांतील फौजांनी कसकसे हल्ले, लढाया, व्यूह, करावे, व एकंदर वागणूक करावी, ह्याविषयीं अराखडा घालून देत होता; तो त्या वेगवेगळ्या साहाय्यसंकेती दोस्त राजांच्या दरबारांतील प्रधानांशीं सतत बोलणीं चालणीं करीत होता, आणि तो वेळोवेळीं समुद्रावरून इंग्लंडांत येऊन तेथील राजकारस्थानांत मिसळून युद्धाविषयीं आवेश जागृत ठेवीत होता. त्याच्या आंगीं जबरदस्त दुर्गुण किंवा दोष होते. तो द्रव्यलोभी होता, आणि त्याला आब्रूची खरी चाड

मार्लबरोचे गुणदोष.

नव्हती. त्यानें आपला पहिला मित्र, दुसरा जेम्स, ह्याला राज्यक्रांति झाली तेव्हां सोडून दिलें; आणि जेव्हां तिसरा वुइलियम त्याचा राजा (धनी) झाला, तेव्हां त्याच्यापासून माघारी परतून त्यानें त्याच जेम्साला मिळून फंदफितूर केले. तथापि तो काबील मुतसद्दी किंवा राजकारणी पुरुष असून, वेलिंग्टनच्या पूर्वी तो इंग्लंडांत अत्यंत प्रतापी किंवा नामांकित सेनाधिपति होऊन गेला. तो शांत, राजदौत्यकुशल, आणि रणांत दयालु असून, संकटाविषयीं त्याला बिलकूल फिकीर नसे. शिवाय त्यासमयीं बहुतकरून सर्व यूरोपभर लढत असणाऱ्या फौजांतून प्रत्येकीनें काय अवश्य केलें पाहिजे, हें त्याच्या तत्काल लक्ष्यांत येई. इतकें असूनही, पहिलीं दोन वर्षें-

लूईला शहांत ठेवण्यापेक्षां ज्यास्त त्याच्या हातून कांहींच झालें नाहीं, कारण साहाय्यसंकेती दोस्त राजे फार भित्रे असून, त्या सर्वांनीं एकवटून युद्ध चालविलें नाहीं.

ह्या दोन वर्षांमध्यें इंग्लंडांत म्हणण्यासारख्या फारच थोड्या गोष्टी घडल्या. डिस्सेन्टर्स (स्थापित धर्माला अमान्य) लोक सारे व्हुइग्स होते, त्यांना पार्लमेंटांतून बाहेर ठेवावें अशा इराद्यानें त्यांवर टोरीझ लोकांनीं मोठा एलगार किंवा हल्ला केला. ते डिस्सेन्टर्स लोक सरकारी हुद्दे मिळविण्यापुरतेमात्र टेस्ट आक्टाला अनुसरून सरकारी धर्माच्या देवळांत जाऊन प्रभुभोजन नांवाचा संस्कार करून घेत, आणि ते हुद्दे मिळाल्यानंतर आपल्या पंथांच्या देवळांत नेहमींप्रमाणें जाऊं लागत. ह्या गोष्टीची मनाई करण्यासाठीं एक "ऑकेझनल कॉन्फॉर्मिटी बिल्ल" (कायद्यानें स्थापलेल्या धर्माचें प्रासंगिक अनुवर्तन ह्याच्या विरुद्ध कायद्याचा मसुदा) नांवाचा कायद्याचा मसुदा पार्लमेंटापुढें आणला. तो मसुदा कामन्सांनीं पसार केला, परंतु १७११ सालापर्यंत तो मसुदा लार्ड्सांच्या सभेपुढें जितक्या वेळां नेला तितक्या वेळां त्यांनीं तो पसार न करतां माघारा टाकला. शेवटीं त्या सालीं लार्ड्सांनीं आपला हट्ट सोडून देऊन तो मसुदा पसार केला. तेव्हांपासून पुढें शंभरांहून ज्यास्ती वर्षें, कोणाही डिस्सेन्टर्सांना सरकारी कामावर राहूं देण्याला पार्लमेंटांतून प्रतिवर्षी तात्पुरतें कृपेचें आज्ञापत्र द्यावें लागे. टोरीझ लोकांना खुश मर्जीत ठेवावें अशी मार्लबरोची इच्छा होती म्हणून, नवीन धर्माधिकारी नेमला म्हणजे त्याच्या वृत्तीचें पहिल्या सालचें उत्पन्न व सर्व धर्माधिका-

ऑकेझनल कॉन्फॉर्मिटी बिल्ल, १७०२–१७११.

त्यांच्या दरसालच्या उत्पन्नाचा दहावा हिस्सा **पोपानें** गमावल्या दिवसापासून राजाला मिळत असे, तें पहिल्या सालचें उत्पन्न आणि तो दहावा हिस्सा धर्मसंबंधी खात्याला सोडून देण्याला त्या **मार्लबरोनें** १७०४ त **आन राणीचें** मन वळवून तिला प्रवृत्त केलें. ह्या उत्पन्नाच्या सांचलेल्या द्रव्याच्या एकंदर रकमेला **"कुईन आन्स् बौन्टी"** (आन राणीचें महादान) असें म्हणतात. त्या सांचलेल्या रकमेचा गरीब धर्माधिकारी लोकांचें उत्पन्न वाढविण्याकडे अजून विनियोग करतात.

राणी आन हिची बौन्टी, म्हणजे महादान, १७०४.

दरम्यानच्या वेळांत, साहाय्यसंकेती दोस्त राजांच्या मंदाईनें **मार्लबरो** कंटाळत चालला होता. **लूइ** राजानें मोठी फौज एकत्र जमवून ती **डान्यूब** नदीवर **बव्हेरियन्स** लोकांच्या फौजेला मिळण्याकरतां पाठविली होती. तसें करण्यांत, **प्रिन्स** (राजपुत्र) **यूजीन** ह्याच्या हुकमतीखालीं असलेल्या **आस्ट्रियन** फौजेशीं **व्हिएन्ना** शहरानजीक मोठी लढाई करण्याचें साहस करावें असा त्याचा उद्देश होता. **मार्लबरोच्या** तें अरिष्ट तत्काल ध्यानांत आलें; त्यानें कोणालाही आपला बेत सांगितला नाहीं, परंतु तो कूच करून सरळ **डान्यूब** नदीवर गेला, **प्रिन्स यूजीन** ह्याला **ब्लेनहीम** नांवाच्या एका लहानशा खेड्यानजीक मिळाला, आणि तेथें त्यानें १७०४ त आगस्टच्या १३ व्या तारिखेस एक विख्यात लढाई मारली. तींत, त्या वेळापर्यंत **फ्रेंचांची** फौज अजिंक्य अशी मानली जात असे, तींतील माणसांपैकीं दोन तृतीयांश माणसें ठार मारलीं गेलीं, जखमी झालीं, किंवा कैद केलीं गेलीं.

ब्लेनहीमची लढाई, ता० १३ आगस्ट १७०४.

आन राणी वुइन्डझर एथील राजमंदिरांतील किताबखान्याच्या भिंतीच्या बाहेर काढलेल्या खिडकींत बसलेली होती, तेथें त्या कीर्तिप्रद जयाची बातमी तिला पोहोंचली. त्यापूर्वी थोडे दिवस अगोदर आड्मिरल (अरमाराचा अध्यक्ष) रूक ह्यानें जिब्राल्टर नांवाचा फार मजबूत असलेला किल्ला घेतला अशी खबर तिला कळलेली होती, आणि युद्धासंबंधी विजयश्रीचा लोट इंग्लंडाकडे वळला होता, ह्या गोष्टीविषयीं संशय राहिला नव्हता. मार्लबरोला ड्यूक ही पदवी दिलेली होती, तो आतां इंग्लिश लोकांना देवतुल्य पूज्य झाला, आणि फ्रान्साला यमतुल्य भयप्रद झाला. पार्लमेंटानें वूडस्टाकजवळ मोठी जमीन त्याला इनाम दिली, तींत त्यानें "ब्लेनहीम हौस" नांवाची टोलेजंग हवेली बांधली; आणि जेव्हां १७०५ त पार्लमेंटाकरितां नवीन निवडणुका झाल्या तेव्हां, गोडॉल्फिन आणि मार्लबरो ह्यांच्या तरफेचा पार्लमेंटांत एक मोठा बलाढ्य हुइगलोकांचा पक्ष बनला, कारण यूरोपांत चालविलेल्या त्या युद्धाला लोक अनुकूल होते.

जिब्राल्टर हस्तगत होतें, तारीख ३ आगस्ट १७०४.

तदनंतर, मार्लबरो फ्लांडर्स देशीं माघारा गेला, आणि त्यानें १७०६ च्या मे महिन्यांत रामिलीझ एथें दुसरा एक मोठा जय मिळविला, आणि फ्लांडर्स आणि फ्रान्स ह्या दोहों देशांच्या दरम्यानचे नऊ खंबीर किल्ले हस्तगत केले. आस्ट्रियाच्या बादशाहानें मार्लबरोला स्पानिश नेदर्लंड्सचा गव्हर्नर (सुभेदार) नेमतों म्हणून देखील बोलणें लावलें, परंतु इंग्लिश व डच लोक हे उभयतां त्या गोष्टीला इतके प्रतिकूल होते कीं, मार्ले-

रामिलीझची लढाई, माहे मे १७०६.

बरोला तो अधिकार नको म्हणावा लागला. ह्याच वेळीं, पीटर्ब-रोचा अर्ल हा स्पेनदेशांतील इंग्लिश फौजेचें आधिपत्य करीत होता, त्यानें बार्सिलोना हें शहर घेतलें, आणि पांचव्या फिलिपाला स्पेन देशांतून फ्रान्स देशीं माघारें पिटून लावून, त्यानें आर्चड्यूक चार्लस हा राजा झाला असा मद्रिड एथें डांगोरा पिटविला. ह्या प्रकारें चहूंकडे पराभव पावून, लूइ आतां सल्ला करण्याची इच्छा करूं लागला. फिलिपाकडे नेपल्स, सिसिलि, आणि मिलन, हीं राहूं दिलीं तर, स्पेन आणि नेदर्लंड्स हीं आर्चड्यूक चार्लस ह्याला सोडून देतों, असें लूईनें बोलणें लावलें. ह्यासमयीं सल्ला करणें योग्य होतें ह्यांत संशय नाहीं. परंतु इंग्लंडांत तें युद्ध लोकप्रिय झालें होतें, आणि आतां व्हुइग्सांचा पक्ष पार्लमेंटांत प्रबल होता, त्या पक्षांतील लोकांना, तें युद्ध संपविलें तर आपलें प्राबल्य गमावेल, अशी भीति वाटत होती. ह्यास्तव त्यांनीं सल्ल्याला दिक्कती काढल्या, आणि आपल्या स्वार्थी हेतूंकरितां, त्यांनीं फ्रान्स देशाला जिवावर उदार होण्याला लावलें, आणि पुढील सात वर्षांपर्यंत, निरुपयोगी युद्धांत त्यांनीं द्रव्य आणि माणसें व्यर्थ खर्चीं घातलीं.

लूइ तहाचें बोलणें लावतो, १७०६.

सुदैवानें तें ओझें सहन करण्यापुरतें इंग्लंड आतां आबाद झालेलें होतें. युद्ध सुरू असतां, आणि शत्रूंच्या जहाजांपासून समुद्रावर धोका असतां, व्यापार इतका भरभराटीस आला होता कीं, प्रधानांना अधिकाधिक द्रव्य उसनें मिळण्याला बिलकूल अडचण राहिली नव्हती, आणि राष्ट्रीय कर्ज पांच कोट चाळीस लक्ष पौंडांइतकें वाढलें. हें कर्ज ह्यासमयीं सरकाराला फारच

राष्ट्रीय कर्जाचा उपयोग किंवा फायदा.

उपयोगी झालें, कारण, सरकारापासून व्याज घेणारे लोक इतके पुष्कळ झाले कीं, यादवी (आपआपसांतील युद्ध) झाली असतां, आपलेंच नुकसान होईल अशा भीतीनें, यादवी न होऊं देण्याविषयीं ते फारच काळजी वागवूं लागले. ह्या गोष्टीचा अगदीं ढळढळीत प्रत्यय, जेव्हां १७०८ त धि प्रिटेन्डर (तोतया) ह्यानें ४००० फ्रेंच फौज बरोबर घेऊन समुद्रावरून स्काट्लंडांत जाऊन उतरण्याविषयीं प्रयत्न केला, तेव्हां आला. तो त्या स्वारीला निघणार तोंच त्याला गोवर आला, आणि त्याला सोडून फ्रेंच जहाजें निघालीं तीं आड्मिरल बिंग ह्यानें माघारीं पिटून लावलीं. परंतु त्या स्वारीच्या दहशतीनें राष्ट्रीय कर्जाचें "मुद्दल," ह्याचा बाजारभाव शेंकडा १४ किंवा १५ टक्के उतरला, म्हणजे कोणीं माणसानें सरकाराला १०० पौंड कर्जी दिलेले असले आणि त्याला त्या कर्जावरील आपला हक्कसंबंध विकावयाचा असला तर त्याबद्दल दुसऱ्या माणसाकडून त्याला ८५ पौंड मिळाले असते; कारण कीं, जर यादवी (आपआपसांतील युद्ध) झाली तर व्याज पूर्वीप्रमाणें मिळतच जाईल असा निश्चय नव्हता. इंग्लंडांत दंगेधोपे आणि बंडें ह्यांच्या विरुद्ध जीं अति बलवत्तर परित्राणें (रक्षकें) आहेत त्यांपैकीं, तें राष्ट्रीय कर्ज आतां देखील एक बलवत्तर परित्राण आहे. आपलें कर्ज फेडील असें खंबीर किंवा सुस्थिर सरकार असण्यांत इतक्या पुष्कळ लोकांचें हित असतें कीं, नीति आणि स्वस्थता, ह्यांच्याच पक्षाकडे सर्वदा प्रजेपैकीं बहुतांचा ओढा असतो.

प्रिटेन्डरानें स्वारी करण्याविषयीं केलेला प्रयत्न, १७०८.

धि ब्यांक आफ् इंग्लंड (इंग्लंडची राष्ट्रीय पेढी) हीही सरकार आणि व्यापार ह्या उभयतांना दुसरी एक मदतगार

होती. पूर्वीच्या सोनारांच्या पेढ्यांहून ही पेढी इतकी शहाजोग आणि सलामत होती कीं, तिच्याशीं व्यवहार करणाऱ्या व्यापाऱ्यांना पूर्वीहून फार सुलभपणानें पतपात मिळून, ते हुंड्यापांड्यांनीं (म्हणजे प्रत्यक्ष नाणें देण्याच्या बदली, तें देण्याचें वचन देऊन), कामें करीत, आणि ती पेढी अमर्याद व्यापार करी, आणि जरूर पडे तेव्हां **सरकाराला** मदत करण्यास समर्थ असे. ह्या पेढीचा जगडवाळ व्यापार, आणि नवीन पाडलेलें नाणें, ह्या दोहोंच्या योगें सर्व देश आबाद होऊन शहरें त्वरेनें वाढूं लागलीं. **वेस्टइंडिझ** ह्या नांवाच्या बेटांशीं व्यापार करून **ब्रिस्टल** पुनः मोठें वाढलें; **मांचेस्टर** व **नारिच, लीड्झ** व **शेफ्फील्ड,** हीं महत्त्वास पावलीं; आणि **लंडन** एथील मारी आणि आग ह्यांनंतर, तेथले पुष्कळ व्यापारी ज्या **लिव्हर्पूल** नांवाच्या गांवीं जाऊन राहिले होते, तें **लिव्हर्पूल** आतां शहरांमध्यें मोठें मानाचें स्थान पावूं लागलें. ह्या साऱ्या भरभराटीपासून एक दुर्दैवाची गोष्ट उद्भवली, ती ही. मिरासदार लोकांची सुंदर जात, म्हणजे ज्यांच्या वडिलांच्या व पूर्वजांच्या पिढीजाद मिराशी किंवा वतनी जमिनी असून, त्यांवर खपून आपला निर्वाह करीत अशा लोकांची जात, नाहींशी होऊं लागली. ओस किंवा पडसर जमीन आवारें घालून इतकी पुष्कळ कुडूं लागले कीं, शेतकीचा धंदा पूर्वीपेक्षां कमी फायद्याचा झाला, आणि श्रीमान व्यापारी लोकांना काळजी उत्पन्न होऊन ते इतक्या जमिनी विकत घेऊन आपआपल्या जातीच्या वतनदाऱ्या करूं लागले कीं,

सावकारी पतीची खंबिरी.

शहरांची आणि व्यापाऱ्यांची स्थिति.

मिरासदार किंवा वतनदार शेतकरी लोकांचा समुदाय कमी होऊं लागतो.

मिरासदार लोकांना आपल्या जमिनी विकून जो पैसा येई तो उदीमधंद्यांत घालणें फार फायद्याचें वाटूं लागलें. ह्या प्रकारानें, साक्सनांच्या काळापासून देशाला पाठीच्या कण्यासारखे अत्यंत आवश्यक व उपयोगी झालेले होते असे जे स्वतंत्र, धट्टेकट्टे, आणि साधेभोळे, मिरासदार शेतकरी लोक, ते इंग्लंडांतून नाहींसे झाले.

एकीकडे असा प्रकार होऊन, दुसरीकडे, १७०७ त इंग्लंड आणि स्काट्लंड हीं दोन्हीं राज्यें शेवटीं एकत्र होऊन दोहोंचें मिळून एक राज्य झालें. त्या काळापर्यंत, त्या दोहों देशांच्या दरम्यान कोणताही माल आला किंवा गेला तर त्यावर जबर जकाती दोहों देशांतही घेत, आणि स्काट्लंड हा गरीब देश होता त्या कारणानें त्याला पुष्कळ जिन्नस इंग्लंडांतून आणावे लागत म्हणून, त्या जकातींचें तेथील लोकांवर भारीच ओझें पडे. त्यामुळें स्काच लोक तडफडूं लागले, आणि डारियन नांवाच्या अखातावर एक स्काच लोकांनीं वसाहत केलेली होती ती इंग्लिशांच्या व्यापारसंबंधी कायद्यांमुळें मोडली, त्यामुळें तर इंग्लिश लोकांवर ते स्काच मुख्यत्वेंकरून क्रुद्ध झालेले होते. ह्या कारणांस्तव, जेव्हां आन राणी वारेल तेव्हां प्राटेस्टंट राजपुत्रांपैकीं कोणीही एकादा जो इंग्लंडचा राजा नसेल त्याला स्काट्लंडचा पृथक् राजा करावें, असा १७०३ त स्काच पार्लमेंटांत एक कायदा पसार केला. ही गोष्ट घडतीच तर फारच वाईट झाली असती, कारण एकाच बेटांत दोन वेगळाले राजे पुनः झाले असते तर युद्ध खचीत झाल्यावांचून राहिलें नसतें. म्हणून इंग्लिश लोकांनीं त्या जकातीसंबंधी आग्रह सोडला, आणि जर स्काट्लंड

स्काट्लंड इंग्लंडाशीं संयुक्त करण्याचा कायदा स्काट्लंडांत पसार झाला, जान्युअरी १७०७; तोच कायदा इंग्लंडांत पसार झाला, मार्च १७०७.

आपल्या पृथक् पार्लमेंटाचा त्याग करील, आणि क्रॉम्वेलाच्या कारकीर्दीत इंग्लिश पार्लमेंटाला जसे आपले सभासद किंवा प्रतिनिधि पाठवीत होते त्याप्रमाणें त्या पार्लमेंटाला प्रतिनिधि पाठवीत जाईल, तर इंग्लंडच्या हद्दीवरून स्काट्लंडांत जकात न घेतां माल जाऊं येऊं देऊं, असें इंग्लिशांनीं कबूल केलें. तेव्हां पहिल्यानें स्काच लोक ह्या गोष्टीला नाराजी होते, परंतु १७०७ त, त्या दोहों देशांच्या तरफेचें मिळून एक नेमलेलें कमिशन (अखत्यार दिलेलें अधिकारीमंडल) एकत्र जमलें, आणि स्काटांनीं आपला प्रेस्बिटीरियन धर्म, आणि आपले स्काच कायदे, पाळावे, परंतु त्यांनीं आपल्या पार्लमेंटाचा त्याग करावा, आणि त्याच्या मोबदला, इंग्लंडांतील हौस आफ् कामन्सला पंचेचाळीस सभासद (प्रतिनिधि) निवडून पाठवीत जावे, आणि हौस आफ् लार्ड्सला सोळा लार्ड्स पाठवीत जावे, असा त्या कमिशनानें एकमतानें ठराव केला. ह्या ठरावाला अनुसरून दोन्ही देशांतील पार्लमेंटांत एक "आक्ट आफ् यूनियन" (दोन्ही राज्यांच्या संयोगाविषयीं कायदा) नांवाचा कायदा पसार झाला. त्या कायद्यानें त्या उभयदेशांचें मिळून "ग्रेटब्रिटन" ह्या नांवानें एक संयुक्त राज्य झालें, आणि प्राचीनकाळीं जेव्हां नार्थ-हंबर-लंडचा फर्थ आफ् फोर्थपर्यंत विस्तार होता, तेव्हां जसे, तसे आतां पुन: साक्सनभाषा बोलणारे लोक सर्व एक झाले. सेन्ट जार्ज (हा इंग्लंडांतील साधु) आणि सेन्ट आन्ड्रू (हा स्काट्लंडांतील साधु), ह्या दोघांचे क्रूस एकत्र मिसळून एका निशाणावर रंगवून तें "यूनियन जाक" (एकीचें सूचक निशाण) ह्या नांवानें त्या संयुक्त राज्याचें निशाण केलें; आणि आमच्या हालींच्या काळांत स्काच-

ग्रेटब्रिटनचें राज्य.

मेन आणि इंग्लिशमेन हे, हितसंबंध, एक-लोकता, आणि परस्परांविषयीं सुवृत्ति, ह्या गोष्टींविषयीं एकामेकाचीं भावंडें किंवा बंधुजन झालेले आहेत. शिवाय, त्या उभय देशांचे हात सर हद्दीवरून एकत्र जुळले, म्हणजे त्या दोहों देशांचा संयोग होऊन सख्य झालें, त्या दिवसापासून ते दोन्ही देश मोठ्या भरभराटीस आले आहेत.

ह्या तसबिरीपासून, इंग्लंडचें दुसरें भावंड जें आयर्लंड त्याच्या तसबिरीकडे वळलें म्हणजे फार खेद होतो. पूर्वी पाहण्यांत आलेंच आहे कीं (५०७ वें पृष्ठ पहा), लिमरिकच्या तहाप्रमाणें वागणूक झाली नाहीं, आणि त्या देशांतील क्याथलिक्स लोक आधींच त्यांचा पराजय झाला होता त्यामुळें हिम्मत खचून उदास झालेले होते, त्यांना, परदेशांतील क्याथलिक्सांनीं ज्याप्रमाणें ह्यूगेनोस ह्यांना सदा क्रूरपणानें वागविलेलें होतें, त्याप्रमाणें, इंग्लंडानें आणि आयर्लंडांतील प्राटेस्टंट्सांनीं सतत पुढलीं पन्नास वर्षें क्रूरपणानें वागविलें. नानापरींचे शिक्षेविषयीं फौजदारीकायदे करून तेथील धर्माधिकाऱ्यांची छळणूक केली, क्याथलिक्सांना जमिनीच्या उपभोगाची मनाई केली, तेथील लोकांच्या मुलांना प्राटेस्टंट्स होण्याकरितां द्रव्य देऊन लालूच उत्पन्न केली, किंवा त्यांच्या शिक्षणाविषयीं असलेलीं साधनें काढून घेतलीं. हे, व तसेच उदीमधंदे आणि हस्तकौशल्यानें जिन्नस तयार करण्याचे कारखाने ह्यांच्या विरुद्ध केलेले इतर कायदे, ह्यांनीं आयर्लंडांतील लोकांना अगदीं निराशेला पोहोंचविलें, आणि आम्ही आतां देखील त्या लोकांच्या ज्या दगलबाजीच्या आणि पुंडाईच्या संबंधापासून पीडा भोगीत आहों त्या संबंधें त्या लोकांना शिकविल्या.

आयर्लंडांतील अपराध्यांस शिक्षेविषयींचे कायदे.

ह्या सर्व वेळांमध्यें यूरोपांतील युद्ध कंटाळवाण्या प्रकारें रडत-खडत चाललें होतें. मालेबरोनें औडेनार्डे, लील, आणि मा-ल्प्लाके, ह्या तीन ठिकाणीं आणखी तीन महत्वाचे जय मिळविले. परंतु स्पेन दे-शांत फ्रेंचांची पुनः सरशी झाली, आणि पांचवा फिलिप पुनः मद्रिड एथें माघारा गेला. तथापि फ्रान्स देश इतका मट्टयास आला होता कीं, १७०९ त लूईनें पुनः सल्लयाचें बोलणें लावलें, आणि आस्ट्रियाचा बादशाहा आणि इंग्लंडांतील प्रधान ह्यांनीं तें बोलणें पुनः नाकारलें. परंतु त्या प्रधानांनीं ती चूक केली, आणि मालेबरोनें, माझ्या जन्मभर सर्व फौजेचा मला काप्टन जनरल (मुख्य सेनाधिपति) नेमावें असें मागणें केलें, ही तर त्यानें तीहूनही मोठी चूक केली. क्रॉम्वेलाच्या काळापासून, कोणीही प्रतापी माणूस असून त्याच्या पाठीशीं फौजेचें बळ असणें, ह्या गोष्टीची इंग्लिशांना जितकी दहशत वाटत होती, तितकी दुसऱ्या कोणत्याही गोष्टीची त्यांना दहशत वाटत नव्हती, आणि त्यांना त्या युद्धाचा आणि त्या व्हुइग्सांचा कंटाळा येत चालला होता.

औडेनार्डे, १७०८; लील, १७०८; माल्प्लाके, १७०९.

ह्याच वेळीं, टोरी पक्षांतील, डॉक्टर साचेव्हरेल्ल नांवाचा एक गडबड्या धर्मोपदेशक होता, त्यानें एका समयीं "डिव्हाइन राइट" (देवदत्त हक्क) आणि राजाला प्रतिकार करणें हें महत् पाप, ह्या दोन विषयांवर उपदेश केला. तेव्हां तिसरा वुइलियम आणि आन ह्यांच्या हक्कांवर त्या साचेव्हरेल्लानें जाणूनबुजून तो हल्लाच केला, असें व्हुइग्सांना वाटलें. म्हणून प्रधानांनीं हौस आफ् लार्ड्स ह्यांच्या पुढें त्या डॉक्टर साचेव्हरेल्लवर दोषारोप करून खटला केला. तेव्हां लार्ड्स ह्यांनीं त्याला अपराधी तर ठरविलेंच, परंतु राष्ट्रांतील लोक

फारच त्याच्या बाजूचे असल्यामुळें फक्त त्यानें तीन वर्षेपर्यंत बिलकूल धर्मोपदेश करूं नये, आणि त्याचा जो उपदेश छापलेला होता तो जाळून टाकावा, ही लार्ड्स ह्यांनीं त्याला शिक्षा केली. हें सारें मूर्खपणाचें कृत्य होतें. परंतु लोकांची लहर त्यासमयीं त्या व्हुइग पक्षाच्या प्रधानांशीं कलह करण्याकडे लागलेली होती. त्यांनीं त्या डॉक्टर साचेव्हरेलाचा पक्ष स्वीकारला, आणि त्याला अटकेंतून सोडलें तेव्हां "धि चर्च (धर्म) आणि साचेव्हरेल" अशा मोठ्या आरोळ्या ठोकीत ते त्याच्या मागून चालले, त्यांनीं मोठमोठे आनंदसूचक अग्नि पेटविले, देवळांवरील घंटा वाजविल्या, आणि रस्तोरस्तीं दीपोत्सव केले.

डॉक्टर साचेव्हरेल ह्याची चौकशी होते.

आन राणीला लोकांचा कन्हवाळा वाटला. तिचें अंतःकरण नेहमीं टोरी पक्षाकडे असे, आणि मार्लबरोची डचेस्स (मार्लबरोची पत्नी) हिच्याशीं तिचा नुकताच कलह होऊन, राबर्ट हार्ले नांवाचा एक मोठा काबील मुतसद्दी पुरुष होता त्याची मिस्ट्रेस माशम नांवाची एक नातलग होती तिला तिनें आपली मैत्रीण केलेलें होतें. तो हार्ले सर्व प्रधानांना आणि मार्लबरोला प्रतिकूल होता. तो हार्ले, आणि सेन्ट जान नांवांचा एक तजेलदार वक्ता, ह्या दोघांनीं आतां पार्लमेंटांत मार्लबरोवर हल्ला करण्यास, आणि तें युद्ध बंद करावें अशी ओरड करण्यास, आरंभ केला; आणि डीन स्वुइफ्ट नांवाचा एक विख्यात राजनीतिविषयक निबंध लिहिणारा होता, तो वर्तमानपत्रांत त्या युद्धाप्रकरणीं प्रखर निबंध लिहून त्यांना मदत करूं लागला. त्या स्वुइफ्टनें एका निबंधांत

मार्लबरो आणि व्हुइग्स लोक ह्यांवर पार्लमेंटांत हल्ला होतो, १७१०.

लिहिलें, "कायही उधळपट्टी, युद्धाच्या खर्चाबद्दल म्हणून दिलेली रकम साठलक्ष, आणि पांच कोट कर्ज; ते साहाय्यसंकेती मोठे मोठे दोस्त हेच आमचे मुख्य नाशकर्ते होत." लोकांनीं मार्लबरोचें देव्हारें केलेलें होतें, ते लोक देखील त्यावर उलटले, आणि तो आपल्या जातीच्या हिताकरितां तें युद्ध चालवीत आहे असा त्यावर उघड दोषारोप करूं लागले. शेवटीं १७१० त आन राणीनें आपल्या प्रधानमंडलाला फांटा दिला, आणि हार्लेला ऑक्सफर्डचा अर्ल हा किताब, आणि सेन्ट जान ह्याला व्हायकौंट बॉलिंग्ब्रोक हा किताब देऊन, त्या दोघांना तिनें आपले मुख्य प्रधान केलें. पार्लमेंटाचें विसर्जन केलें, आणि नवीन निवडणुका होऊन हौस आफ् कामन्स भरलें त्यांत टोरीपक्षाचेच सभासद खूप होते. पुढें कांहीं महिन्यांनीं, मार्लबरोला सेनाधिपतीच्या अधिकारावरून दूर केलें, आणि तो सेनाधिपतीचा अधिकार, ऑर्मंडचा ड्यूक ह्या नांवाचा एक खंबीर टोरी होता, त्याला दिला. मार्लबरोवर सरकारी पैसा गैरकारणीं लावला असा दोषारोप देखील केला; त्याच्या बायकोला दरबारांतून घालवून दिलें, आणि त्यानें स्वतः इंग्लंडचा त्याग केला. आपल्या महद्यशावर अति भरवसा ठेवून राहिल्यामुळें कोणाही पुरुषाला अकृतज्ञतेनें लोक कसा वागवितात, ह्याचें तो मार्लबरो एक उदाहरण होय.

ऑक्सफर्ड आणि बॉलिंग्ब्रोक ह्यांचे प्रधानमंडल, १७१०-१७१४

ते टोरीझ (टोरीप्रधान) आतां तह करण्याच्या इराद्यानें फ्रान्साशीं एकदम बोलणें करूं लागले, आणि १७१३ त यूट्रेक्टचा तहनामा होऊन त्यावर सह्या झाल्या. इंग्लंडाला साता-वर्षांपूर्वी तह करून जितका फायदा झाला असता, तितका ह्या

तहानें फायदा झाला नाहीं. त्या तहांत ठरलेल्या गोष्टी येणेंप्रमाणें. फ्रेंच लोकांना नेदर्लँड्समधून आणि जर्मनींतून हाकवून दिलें हें खरें, परंतु स्पेन आणि फ्रान्स ह्या दोहों राज्यांच्या गाद्या किंवा तीं राज्यें कधींही एक व्हावयाचीं नाहींत असें वचनानें बांधून घेऊन, फिलिपाकडे स्पेन आणि अमेरिकेंतील स्पानिश लोकांच्या ताब्यांतील मुलूख राहूं दिला. आस्ट्रियाला मिलन, नेपल्स, आणि स्पानिश नेदर्लँड्स हीं मिळालीं. डचांना आपल्या देशाचा बचाव करण्याला किल्ल्यांची एक मजबूत ओळच्याओळ मिळाली. इंग्लंडानें आपल्याकडे जिब्राल्टर आणि मिनॉर्का हीं ठेवलीं, आणि त्याला हडसन्स बे आंड स्ट्रेट्स (हडसनचें अखात आणि सामुद्रधुनी), न्यूफौन्डलंड, आणि अकेडिया, म्हणजे ज्या द्वीपकल्पाला आतां नोव्हा स्कोशिया असें म्हणतात तें द्वीपकल्प, हीं दिलीं. त्या द्वीपकल्पाबद्दल इंग्लिश आणि फ्रेंच मासे मारणारे कोळी एक शतकपर्यंत परस्परांशीं भांडत होते. लूईनें, आन राणी आणि तिच्या पश्चात् हानोव्हरच्या घराण्यांतील पुरुष किंवा स्त्रिया तिच्या गादीवर बसतील त्या सर्वांना यथान्याय राजे किंवा राण्या अशा मी मान्य करीन, आणि प्रिटेन्डर (तोतया) ह्याचा पुनः कधींही पुरस्कार करणार नाहीं, असें ईश्वरस्मरणपूर्वक वचन दिलें. प्रिटेन्डर तदनंतर लॉरेनमध्यें निरंतर राहावयास गेला. आणखी स्पानिश लोकांच्या अमेरिकेंतील वसाहतींशीं शिद्दी गुलामांचा व्यापार करण्याचा, आणि दक्षिणसमुद्रांत दरसाल एक व्यापारीजहाज पाठविण्याचा, तीस वर्षेंपर्यंत मक्ता (फक्त एकट्या इंग्लंडालाच हक्क इतर कोणालाही नाहीं असा हक्क) इंग्लंडाला दिला. परंतु इंग्लंडांतले प्रधान

यूट्रेक्टचा तह, १७१३.

तो तह करतांना खडतर किंवा जिकिरीच्या प्रकरणांची होईल ति-तकी टाळाटाळ करण्याविषयीं इतके दक्ष होते कीं, त्यांनीं **इंग्लि-शांच्या** यशाला निरंतरचा एक डाग लावून ठेवला. **स्पेनच्या** वाय-व्येस **काटालन्स** नांवाचे लोक होते, ते त्या युद्धांत त्या साह्य-संकेती दोस्त राजांचा पक्ष धरून राहिलेले होते, आणि तुमचें स्वातंत्र्य सुरक्षित ठेवलें जाईल, असें त्यांना त्या दोस्त राजांकडून अभयवचन मिळालेलें होतें. परंतु **आस्ट्रियाच्या** बादशाहानें त्यांचा पुरस्कार करण्याविषयीं बिलकूल फिकीर केली नाहीं, आणि **इंग्लंडानें**ही, नाखुशीनेंच खरें, त्यांना **स्पेनच्या** सर्वस्वी कबजांत सोडून दिलें. त्या लोकांनीं फार दिवस झगडा केला, परंतु शेवटीं १७१५ च्या जुलईत त्यांना **स्पेन** देशाला शरण जाणें भाग आलें.

आन राणीची कारकीर्द आतां संपत आली होती, ती दुखणेकरी होती हें प्रसिद्ध झालेलें होतें, आणि आबालवृद्ध तिच्या पश्चात् कोण गादीवर बसणार ह्या गोष्टीचा विचार करूं लागले होते. **हानोव्हर**ची वृद्ध **प्रिन्सेस्स सोफैया** (राणी सोफैया) ही मरण पावली होती, आणि तिचा पुत्र, **हानोव्हरचा इलेक्टर** (जर्मनीचा बादशाहा निवडून नेमण्याचा अधिकार असलेला असा मांडलिक राजा), **जार्ज**, हाच तो **पार्लमेंटानें आक्ट आफ् सक्सेशन** (आन राणीच्या पश्चात् गादीवर कोणीं ब-सावें हें ठरविणारा कायदा) नांवाच्या कायद्यांत नेमलेला **प्राटेस्टं-टपंथी** वारस, होता. तो **जर्मन** असून, त्याला **इंग्लिश** भा-षेचा एक शब्द देखील बोलतां येत नव्हता; म्हणून, **प्रिटेन्डरला** राजा करण्याविषयीं यत्न केला असतां तो सिद्धीस जाईल अशी **जाकोबाइट्स** लोक गुप्त रीतीनें उमेद बाळगून होते, आणि **ऑक्सफर्ड** व **बॉलिंग्ब्रोक** ह्या दोघां **टोरी** प्रधानांनीं देखील

त्या प्रिटेन्डराशीं कारस्थान करण्याला आरंभ केला होता, कारण, जार्ज राजा व्हुइग्सांना अनुकूल होईल हें ते जाणून होते. परंतु त्या दोघां प्रधानांची तयारी होण्यापूर्वीच, त्यांच्या मनोरथांचा शेवट झाला. एका दिवशीं कौन्सिलाच्या दिवाणखान्यांत बॉलिंग्ब्रोक आणि ऑक्सफर्ड ह्यांच्या दरम्यान मोठा आवेशाचा तंटा झाला, त्यानें राणीचें मन फारच विटून ऑक्सफर्डाला फांटा मिळाला. तदनंतर बहुतकरून लागलाच तिला वायूच्या झटक्यानें अंगविभ्रंश झाला, आणि पुढें दोन दिवसांनीं, म्हणजे १७१४ त आगष्टच्या १ ल्या तारिखेस, ती मरण पावली. तेव्हां आर्गिल आणि समर्सेट ह्या दोघां व्हुइग ड्यूकांनीं कौन्सिलाचा अध्यक्ष, श्रूस्बरीचा ड्यूक (हा जरी टोरी होता तरी प्रिटेन्डरचा मित्र नव्हता), ह्यांच्याशीं तत्काल मसलत केली. लंडनांत आणि पोर्ट्स्मौथ एथें सैन्य ठेवलें, आणि

आन राणीचा मृत्यु, १७१४.

जाकोबाइट्स लोकांकडून कांहीं अडथळा किंवा हरकत होण्याच्या पूर्वी, जार्ज लूइस, हानोव्हरचा इलेक्टर, आणि पहिल्या जेम्साचा पणतू, हा राजा झाला असें जाहीरनामे लावून सर्वत्र विदित केलें.

पहिला जार्ज हा राजा झाला असें जाहीरनामे लावून विदित केलें.

ज्या कालावधींत स्टयूअर्ट वंशीयांनीं अनिर्बंध मुखत्यार राजे होण्याविषयीं प्रयत्न केले, आणि पार्लमेंट आणि राष्ट्रांतील लोक ह्यांनीं त्यांना प्रतिरोध केला, तो धामधुमीचा कालावधि आपण आतां मागें टाकला. हा झगडा १६०३ पासून वुइलियम आणि मेरी ह्यांच्या कारकीर्दीपर्यंत, म्हणजे सुमारें १०० वर्षे, चालला होता. त्या झगड्यांत परिणामीं पार्लमेंट पूर्वीपेक्षां बलवत्तर

झालें, आणि पहिल्या जार्जाच्या कारकीर्दीत पार्लमेंटाला नवीन सामर्थ्य प्राप्त झालें हें पुढें पाहण्यांत येईल. त्या नवीन राजाला इंग्लिश भाषेंत चाललेले वादविवाद कळेनात म्हणून, पूर्वींचे राजे व राण्या बसत त्यांसारखा, तो पुढें कॉबिनेट कौन्सिलांत (प्रधानांच्या खलबत करणाऱ्या मंडलांत) बसेनासा झाला. तेव्हां प्रधानांपैकीं जो प्रमुख असे तो "प्राइम मिनिस्टर" (मुख्य प्रधान) ह्या किताबानें त्याच्या स्थानीं त्या कौन्सिलांत बसूं लागला, आणि त्या दिवसापासून मुख्य प्रधान हे राजाच्या किंवा राणीच्या हुकुमाखालीं वास्तविक राज्यावर अमल करणारे झालेले आहेत. परंतु लोक, राजावांचून निर्वाह होतो किंवा नाहीं, ह्या गोष्टीचा पुनः प्रत्यय पाहण्याच्या यत्नांत पडण्याविषयीं राजी नसून, ते, मुस्तकीम वंशपरंपरेचा राजा किंवा राणी असलीच पाहिजे, हा आग्रह अजून सदाकदा बळकट धरून होते. त्यांना हा पक्का बोध झाला होता कीं, ज्या "कान्स्टिट्यूशनल गव्हर्नमेंट"मध्यें, म्हणजे सुव्यवस्थित राज्यपद्धतीमध्यें, राजा किंवा राणी आपले प्रधान निवडते, आणि कोणा एका पुरुषाला आपल्या हातीं सर्व सत्ता घेऊं देत नाहीं, ती राज्यपद्धति अत्यंत निर्धोक आणि सर्वोत्तम होय.

सुव्यवस्थित राज्यपद्धतीचा उदय.

ह्यावर सांगितलेल्या शंभर वर्षांमध्यें राष्ट्रांतील लोकांचीं संपत्ति आणि विद्या ह्यांच्यासंबंधानें निमूटपणें संवृद्धि होत होती. देश अधिकाधिक श्रीमंत होत चालला तसतशी पूर्वींहून अधिकाधिक लोकांना आपआपल्या मनांना विद्यासंस्कारकरून घेण्याला फुरसत मिळूं लागली. ह्या कालावधींतील इंग्लंडांतल्या प्रधानांनीं विद्वान पुरुषांना पेनशनें (बैठीं वेतनें) आणि सरकारी

हुद्दे दिले; आणि **मिल्टन, न्यूटन, लॉक, आडिसन, स्वुइफ्ट, स्टील,** आणि इतर पुष्कळ विद्वान लोक, ह्यांना सरकारच्या पदरीं असाम्या होत्या. हें युग विद्याग्रंथकलापाच्या संवृद्धीचें होतें. **"न्यूझ-लेट्टर्स,"** म्हणजे अखबार-चिठ्या, ह्यांचीच पुढें वृद्धि होऊन न्यूस-पेपर्स, किंवा जर्नल्स, म्हणजे वर्तमानपत्रें किंवा दिनवृत्तपत्रें, बनलीं, हीं यादवी किंवा आपआपसांतील युद्ध ह्याच्या काळांत पहिल्यानें सुरू झालेलीं होतीं, आणि त्यांची संख्या, पूर्वी पाहण्यांत आलेंच आहे त्याप्रमाणें, १६९५ त मुद्रणस्वातंत्र्य मिळाल्यानंतर वाढली होती. **डीन स्वुइफ्ट** हा **एक्झामिनर** नांवाच्या वर्तमानपत्रांत राज्यनीतीविषयक निबंध लिही, आणि १७०४ त त्यानें आपली **टेल आफ् आ टब** (एका लांकडी टिपाची गोष्ट) नांवाची दुराचरणोपहासक गोष्ट छापून प्रसिद्ध केली. **स्टील** ह्यानें दोन पेनी किंमतीच्या निबंधमाला छापून प्रसिद्ध करण्याचा उद्योग मांडला. त्यापैकीं **टाट्लर** (बडबड्या) ह्या नांवाची माला १७०९ त, आणि **स्पेक्टेटर** (प्रेक्षक) ह्या नांवाची १७११ त, सुरू केली. **स्पेक्टेटर** नांवाच्या निबंधमालेंत **आडिसन**प्रभृति लोकांनी संसारांतील रोजच्या प्रचारांतल्या गोष्टींविषयीं उज्ज्वल निबंध, आणि **सर राजर डि काव्हर्ले** ह्याच्या स्फुट चरित्रासारखीं मनोरम स्फुट चरित्रें, लिहिलीं. ह्यांहून विशेष गंभीर किंवा महत्त्वाच्या ग्रंथसमूहांत गणना करण्यास योग्य असे ग्रंथ म्हटले म्हणजे, दोन आहेत; (१) १६९० त छापून प्रसिद्ध झालेला **एस्सेझ आन धि ह्यूमन अन्डर्स्टांडिंग** (मनुष्याच्या ज्ञानशक्तीविषयीं निबंध) ह्या नांवाचा **लॉकचा**

सतराव्या शतकांतील विद्याग्रंथकलाप.

प्रख्यात निबंधात्मक ग्रंथ, आणि (२) त्याचा **टॉलरेशन** (परमत-सहिष्णुता किंवा धर्मप्रकरणांत सहिष्णुता) ह्या नांवाचा ग्रंथ. इतिहास-पर ग्रंथांत नांव घेण्याजोगे ग्रंथ दोन आहेत; (१) **बिशप बर्नेट** ह्यानें १७१५ त **हिस्टरी आफ् हिज ओन टाइम** (आपल्या काळाचा इतिहास) नांवाचा ग्रंथ लिहिला तो, आणि (२) **पेपिझ** ह्यानें आपली आनंदकारक **डायरी** (रोजच्या वर्तमानाची वही) लिहिली ती. ह्यावेळीं कल्पित कथा किंवा कादंबऱ्या ह्याही लोकप्रिय झालेल्या होत्या; उदाहरणार्थ, **पिलग्रिम्स प्रॉग्रेस** (यात्रेकरूचा वृत्तांत), **डिफोचें 'राबिन्सन क्रूसोचें चरित्र'** (हें १७१९ त छापून प्रसिद्ध झालें), **स्वुइफ्टचें 'गलीव्हर्स ट्राव्हल्स,'** म्हणजे गलिव्हरच्या प्रवासाचें वर्णन (हें १७२६ त छापून प्रसिद्ध झालें), आणि **आर्बथ्नाट**चा **'हिस्टरी आफ् जान बुल्ल,'** म्हणजे जान बुल्लचा इतिहास (ह्या ग्रंथांत इंग्लिश लोकांना जान बुल्ल हें निंदेचें किंवा टेंगमताचें नांव प्रथम मिळालें). ह्या काळच्या कवींमध्यें, नामांकित म्हटले म्हणजे, **कौले, मिल्टन, ड्राइडेन,** आणि **पोप,** आणि दुराचरणोपहासपर काव्यकार **साम्युएल बट्टर,** हे होत. **साम्युएल बट्टर** हा **हुडिब्रास** नांवाच्या ग्रंथाचा कर्ता होय. ह्या व पुढल्या शतकांत ग्रंथरचनापद्धतींत एका प्रकारचा फेरफार हळू हळू झाला. पहिल्यानें ग्रंथकार क्लिष्ट किंवा दुर्बोध आणि अलंकारप्रचुर धरतीनें किंवा वाणीनें लिहीत. शेवटीं साध्या, सुबोध, अटस, संक्षिप्त, आणि नीटनेटक्या, वाक्यांनीं ग्रंथकार लिहूं लागले.* सुंदरशब्दयुक्त फकिका किंवा गाथा लिहिण्यापेक्षां, वाचणारांना चांगले कळतील असे लेख लिहिण्याविषयीं ग्रंथकार विशेष काळजी घेऊं लागले. ह्याचें कारण, लोक अ-

धिकाधिक सुशिक्षित किंवा विद्यासंपन्न होऊं लागले, आणि ग्रंथकारांना केवळ विद्वान लोकांच्याच तुष्टीकडे लक्ष्य ठेवावें लागत नव्हतें. त्यांना सर्व सामान्य जनांकरितां लिहावें लागूं लागलें. पुस्तकें, वर्तमानपत्रें, आणि सर्व प्रकारचें ज्ञान, ह्यांच्या ह्या प्रसारानें एक मोठा आणि चांगला परिणाम झाला, तो हा कीं, एक सहिष्णुतेची वृत्ति उत्पन्न होऊन उत्तरोत्तर वाढत चालली; तिच्या योगानें, धर्मप्रकरणांत किंवा इतर कोणत्याही बाबतींत आपल्या मताहून दुसऱ्यांचें मत वेगळें असण्याचा संभव आहे हें लोकांना कळूं लागलें, आणि धर्मसंबंधी छळणुकीच्या आणि जुलमाच्या प्राचीन काळांकडे इंग्लंड कधींही पुनः माघारें जाईल ही गोष्ट अगदीं अशक्य होऊन गेली.

भाग ७.

इंग्लंडच्या राज्याची वृद्धि

हानोव्हरच्या घराण्यांतील राजे

(ह्या घराण्याचे दुसरे नांव ब्रन्स्वुइक लूनेबर्ग. घराण्याचे उपनांव ग्वेल्फ.)

पहिला जेम्स.

राजपुत्री
एलिझाबेथ, हिचा पति, पांचवा फ्रेडरिक, इलेक्टर पालाटाइन.

सोफैया. हिचा पति, एर्नेस्ट, हानोव्हरचा इलेक्टर, हा, ग्वेल्फ उपनांवाच्या, हानोव्हर किंवा ब्रन्स्वुइक ह्याच्या ड्यूकांचा, वंशज होता.

पहिला जार्ज (हानोव्हरचा इलेक्टर).

ज. १६६०, मृ. १७२७.
का. १७१४–१७२७,
बा. झेलची सोफैया.

दुसरा जार्ज (हानोव्हरचा इलेक्टर),

ज. १६८३, मृ. १७६०,
का. १७२७–१७६०,

प्रिन्स आफ् वेल्स, त्याची बायको
नाक्सगोथाची आगस्टा.
मृ. १७५१.

तिसरा जार्ज (हा १८१४ त हानोव्हरचा राजा झाला.)
ज. १७३८, मृ. १८२०,
का. १७६०–१८२०,
बा. मेक्लेंबर्ग–स्ट्रेलिट्झची शार्लोट्ट.

- **चौथा जार्ज**,
  ज. १७६२, मृ. १८३०,
  का. १८२०–१८३०,
  बा. ब्रन्सुइकची कारोलाइन.
  - प्रिन्सेस्स शार्लोट्ट,
    ज. १७९६, मृ. १८१७.
- फ्रेडरिक,
  यार्कचा ड्यूक,
  ज. १७६३, मृ. १८२७,
  त्याला वारस नव्हता.
- **चौथा वुइलियम**,
  ज. १७६५, मृ. १८३७,
  का. १८३०–१८३७,
  बा. साक्समाइनिंगेनची आडिलेड.
  वारस नव्हता.
- एड्वर्ड,
  केंटचा ड्यूक,
  ज. १७६७,
  मृ. १८२०.
  - **व्हिक्टोरिया**,
    ज. १८१९,
    गादीवर बसली, १८३७,
    प. साक्स-कोबर्ग–गोथाचा आल्बर्ट.
    - व्हिक्टोरिया, जर्मनीच्या बादशाही राज्याच्या होणाऱ्या मालकाची पत्नी.
    - आल्बर्ट एड्वर्ड, प्रिन्स आफ् वेल्स.
    - आलिस, हेस्सेची ग्रांडडचेस्स, मृ. १८७८.
    - आल्फ्रेड, एडिंबरोचा ड्यूक.
    - हेलीना, प्रिन्सेस्स क्रिस्चियन.
    - लूइज, लार्नची मार्चीयनेस्स.
    - आर्थर, कॉन्नॉटचा ड्यूक.
    - लियोपोल्ड, आल्बनीचा ड्यूक, मृ. १८८४.
    - बिआट्रिस, बाट्टेन्बर्गची प्रिन्सेस्स.
- अर्नेस्ट आगस्टस,
  कंबर्लंडचा ड्यूक, आणि
  हानोव्हरचा राजा.
  ज. १७७१, मृ. १८५१.

प्रकरण २२.

घरीं स्वस्थता आणि बाहेर विजय ह्यांनीं इंग्लंड बलाढ्य होतें.

पहिला जार्ज. १७१४–१७२७. **दुसरा जार्ज.** १७२७–१७६०.

आन राणीच्या मृत्यूनंतर साता आठवड्यांनीं **पहिला जार्ज** आपल्या एकुलत्या एका पुत्रासहवर्तमान समुद्रावरून येऊन **ग्रीनिच** एथें जमिनीवर उतरला. तो परदेशीय होता तरी त्याचा सत्कार चांगला झाला, कारण त्या **इंग्लिश** शाईला विसांवा किंवा स्वस्थपणा आणि चिरस्थायी राज्यव्यवस्था किंवा सरकार पाहिजे होतें. जर मागें पाहिलें, तर लक्ष्यांत येईल कीं, **दुसरा जेम्स फ्रान्स** देशीं पळून गेल्यापासून जीं पंचवीस वर्षें लोटलीं होतीं, त्यांमध्यें दोन मोठीं युद्धें झालेलीं होतीं. (१) १६८९ पासून १६९७ पर्यंत, त्या युद्धाच्या कारणानें **तिसरा वुइलियम** ह्याला सतत परदेशीं राहावें लागलें होतें, आणि त्या युद्धाची समाप्ति **रिस्वुइक**च्या तहानें झाली (५१९ वें पृष्ठ पहा); आणि (२) १७०२ पासून १७१३ पर्यंत, त्या युद्धांत **मार्लबरो**नें आपले जय मिळविले, आणि त्या युद्धाचा शेवट, **आन राणी** वारली त्याच्या फक्त एकवर्ष अगोदर, **यूट्रेक्ट**च्या तहानें झाला. **इंग्लंड** त्या दोहों युद्धांत, कांहीं वांटे **हालंड**चा बचाव करण्यासाठीं, परंतु मुख्यत्वें **जेम्स** आणि त्याचा मुलगा ह्यांना **फ्रान्स**च्या राजाला **इंग्लंड**च्या गादीवर पुन: बसवून द्यावें ह्यासाठीं, सामील झालेलें होतें; आणि त्या युद्धांबद्दल फक्त रोकड खर्च इतका अतिशय झाला होता कीं, १६९२ त

हानोव्हरचें घराणें.

सुरू झालेलें **राष्ट्रीय कर्ज**, बेवीस वर्षांत जवळ जवळ तीन कोटि ऐशीं लक्ष पौंडांइतकें वाढलें होतें. म्हणून लोकांना आतां, **पार्लमेंट** आणि प्रधान ह्यांना देशाचा राज्यकारभार निवांत करूं देणारा, आणि **प्रिटेन्डराला** परत येण्याला सवड मिळण्याजोगा झगडा चिथवून न उत्पन्न करणारा, असा राजा पाहिजे होता.

पहिल्या जार्जाचे गुण दोष.

पहिला जार्ज हा अगदीं त्यांना पाहिजे होता तसा पुरुष होता. तो वयानें चौपन्न वर्षांचा असून, अडाणी आणि मंद होता, आणि **इंग्लंडचा** राजा होऊन राहण्यापेक्षां **हानोव्हरांत** आपल्या घरीं स्वस्थ राहावें हें तो विशेष चाहत होता. परंतु तो स्वभावानें सात्विक किंवा साळाभोळा असून त्याचे हेतु किंवा उद्देश चांगले होते. त्यानें **इंग्लंडच्या** कायद्यांला अनुसरून अमल करण्याचा होईल तितका प्रयत्न केला, आणि त्यानें राज्यकारभारांत होईल तितकी थोडी ढवळाढवळ केली. **व्हुइग्स** ह्यांनीं

आक्सफर्ड, बालिंग्ब्रोक, आणि आर्मंड, ह्यांवर दोषारोप होतो.

त्याला गादीवर बसविलें म्हणून साहजिकच त्याचा कल त्यांच्याकडे होता, आणि तो **इंग्लंडास** पुरता पोहोंचण्याच्या देखील पूर्वी त्यानें त्या **टोरी** प्रधानांना फांटा दिला. नवें **पार्लमेंट** बहुतेक सारें व्हुइगपक्षाचें होतें; आणि **आक्सफर्ड**, **बालिंग्ब्रोक**, आणि **ऑर्मंड**, ह्यांवर **जाकोबाइट्**सांशीं फंदफितूर केला असा दोषारोप केला. तेव्हां **आर्मंड** आणि **बालिंग्ब्रोक** हे दोघे **फ्रान्स** देशीं पळून गेले; **आक्सफर्ड** **इंग्लंडांतच** राहिला, आणि त्याला दोन वर्षे **टौअरांत** कैदेंत ठेवलें.

लोक फार दिवसपर्यंत अस्वस्थचित्त झालेले होते, कारण त्यांपैकीं पुष्कळ अजून **स्टयूअर्टांचा** पक्ष धरून होते. इतक्यांत **मिड्लंड** कौ-

न्टींमध्यें (समुद्रकांठ सोडून असलेल्या देशमध्यांतील परगण्यांत) असे दहशत पडण्याजोगे दंगे उसळले कीं, १७१५ त **रायट आक्ट** (दंग्यांविषयीं कायदा) ह्या नांवाचा कायदा पसार केला. त्या कायद्यांत असा ठराव केलेला होता कीं, जेथें कोठें लोकांची अतिशय गर्दी जमेल तेथें तो कायदा प्रसिद्धपणें वाचून दाखविला जाईल, नंतर जर ती गर्दी निमूटपणें मोडली नाहीं तर तेथील अधिकाऱ्यांनीं जबरदस्ती करून ती मोडावी, आणि तसें करतांना जर कोणाला दुखापत होईल तर त्या संबंधानें त्या अधिकाऱ्यांना दोष देतां येणार नाहीं.

रायट आक्ट म्हणजे दंग्यांविषयीं कायदा.

स्काट्लंडांत आणि **इंग्लंडच्या** उत्तरेकडील प्रांतांत जो दंगा किंवा बंड झालें तें वर सांगितलेल्या दंग्यांहून मोठें होतें. **हाइलंडर्स**, म्हणजे **स्काट्लंडांतील** पहाडी प्रदेशांतील लोक, **मारचा अर्ल** ह्याच्या हुकमतीखालीं बंड करून उठले, आणि **इंग्लंडांतील जाकोबाइट्स** लोक **डर्वेन्टवाटरचा अर्ल**, आणि **नार्थंबर्लंडचा पार्लमेंटांतील** प्रतिनिधि, **मिस्टर फार्स्टर**, ह्या दोघांच्या हुकमतीखालीं उठले. त्या बंडवाल्यांचें पारपत्य करण्यासाठीं त्यांवर **आर्गिलचा ड्यूक** ह्या नांवाच्या सरदाराला पाठविलें. त्यानें, ज्या दिवशीं (म्हणजे नोव्हेंबरच्या १३ व्या तारिखेस) **इंग्लिश जाकोबाइट्स** लोक **लांकाशायरांत प्रेस्टन** नांवाच्या गांवीं शरण आले, त्याच दिवशीं **स्टर्लिंगनजीक शेरिफ्फम्यूर** एथें **स्काटांचा** पराभव केला. दोन महिन्यांत त्या बंडाची समाप्ति झाली. **प्रिटेन्डर** हा तदनंतर एका महिन्यानें समुद्रावरून जाऊन **स्काट्लंडांत** जमिनीवर उतरला; परंतु त्याला त्या **मारच्या**

जाकोबाइट्स ह्यांचें बंड, १७१५.

अर्लीसहवर्तमान फ्रान्स देशीं माघारें जाणें प्राप्त झालें. फार्स्टर हा निसटून पळून गेला, आणि तरुण लार्ड डर्वेन्टवाटर ह्याला देहांतशासन केलें. हे दंगे आणि बंड ह्यांनीं राष्ट्रांतील सर्व लोक सरकार खंबीर असलें पाहिजे अशी इच्छा करूं लागले; आणि १७१६ त एक नवीन आक्ट (कायदा) पसार झाला. त्यांत राजाला एकच पार्लमेंट सात वर्षें काईम ठेवण्याची परवानगी दिली. तोच कायदा आजवर अमलांत आहे.

सप्तवार्षिक पार्लमेंटें चालू होतात, १७१६.

मधल्या काळांत फ्रान्स देशांतील चौदावा लूइ राजा १७१५ त मृत्यु पावला, त्यानें एकाहात्तर वर्षें राज्य केलें होतें, आणि तो इंग्लंडचा परम शत्रु होता. त्याच्या पश्चात् त्याचा पणतू पंधरावा लूइ ह्या नांवानें राजा झाला, तेव्हां तो फक्त दहा वर्षांचा लहान मुलगा होता. त्यामुळें पुढल्या वीस वर्षांमध्यें फ्रान्साकडून आमच्या देशाला उपद्रव होणें अगदीं बंद झालें; ह्याचें मुख्यत्वें कारण, फ्रान्स देशचा राजप्रतिनिधि, ऑर्लीन्सचा ड्यूक, ह्यानें इंग्लंड आणि हालंड ह्या दोहोंशीं मिळून साहाय्यसंकेती तह करून कट केला होता. त्या तहांत त्यानें वचन दिलें होतें कीं, पंधरावा लूइ कदाचित् वारला आणि स्पेनचा पांचवा फिलिप हा आपल्या वचनाचा भंग करून फ्रान्स व स्पेन ह्या दोन्ही देशांच्या गाद्यांवर माझा हक्क आहे म्हणून दावा सांगूं लागला तर हालंड व इंग्लंड ह्या उभय देशांनीं ऑर्लीन्सच्या वंशाला फ्रान्सची गादी काईमची मिळवून देण्याच्या कामीं मदत केली पाहिजे, अशा अटीनें मीं हानोव्हरच्या घराण्याला पाठबळ देईन. पुढें १७१८ त

ट्रिपल अलायन्स, म्हणजे तीन राज्यांनीं केलेला साहाय्यसंकेती कट, १७१७.

फिलिपानें सिसिलीवर हल्ला करण्याचें भय घातलें तेव्हां, इंग्लंड आणि फ्रान्स ह्या उभयतांनीं मिळून स्पेनाविरुद्ध युद्ध करणार म्हणून खरोखर जाहीर केलें. सर जार्ज बिंग ह्यानें पस्सारो नांवाच्या केपाजवळ (भूशलाकेजवळ) स्पानिश आरमाराचा पराभव केला, आणि स्पानियर्ड्सांनीं १७१९ त स्कात्लंडवर स्वारी करण्याचा प्रयत्न केला, परंतु तो झगडा फारच थोडा वेळ टिकला, आणि फिलिपानें आपला हेका सोडला.

केप पस्सारोची लढाई, १७१८.

आतां घरीं व बाहेर स्वस्थता झाल्यामुळें इंग्लिशांनीं व्यापाराकडे आपलें लक्ष्य वळविलें. युद्धांच्या काळांत देखील व्यापाराचा फैलाव होत होता; आणि इंग्लिश व्यापारी, टर्की, इटली, स्पेन, पोर्टुगल, हालंड, जर्मनी, रशिया, नार्वे, धि बाल्टिक, अमेरिका, आफ्रिका, आणि ईस्ट इंडिझ, ह्या देशांशीं व्यापार करीत. १७१४ त झालेल्या यूट्रेक्टच्या तहानें, समुद्रावरील लढाया बंद झाल्या, त्या योगें व्यापार पूर्वीहून सुरक्षित झाला, आणि ज्यांनीं धामधुमीच्या काळांत पैसा सांठवून ठेवला होता, त्यांना आतां तो व्यापारांत घालण्याची इच्छा उत्पन्न झाली. पुष्कळ कंपन्या (व्यापारी मंडळ्या) उत्पन्न झाल्या, त्या, शिल्पक्रियेनें नानाप्रकारचे पदार्थ तयार करणें, कोळसे धातु वगैरेच्या खाणी खणून त्यांपासून ते ते पदार्थ काढणें, तारवें बांधणें, आणि व्यापार, ह्या धंद्यांत भारी नफा मिळवूं लागल्या. ह्या कंपन्यांमध्यें, सर्वांत लोकप्रिय अशी साउथ सी कंपनी (दक्षिण समुद्रांत व्यापार करणारी मंडळी) नांवाची एक कंपनी होती, ती

इंग्लिशांच्या व्यापाराचा फैलाव.

साउथ सी नांवाची कंपनी, १७११-१७२१.

साउथ अमेरिकेशीं (दक्षिण अमेरिकेशीं) व्यापार करण्याच्या उद्देशानें १७११ त उभारली. आणि ती असल्या अवाढव्य गोष्टी करण्याच्या उमेदींत होती कीं, १७१९ त त्या कंपनीच्या डिरेक्टरांनीं (व्यवस्थापकांनीं), प्रधानमंडल आमच्या कंपनीला मोबदला कांहीं विशेष हक्क देईल तर **सरकाराला** ज्यांचें ज्यांचें कर्ज देणें असेल त्या लोकांना आमच्या कंपनीचे शेर (भाग, वांटे किंवा हिस्से) देऊन आम्ही सर्व **राष्ट्रीय कर्ज** फेडून टाकतों, असें सरकारांत बोलणें लावलें. परंतु दुर्दैवानें **इंग्लंडची ब्यांक** हिनेंही **राष्ट्रीय कर्ज** आम्ही हळु हळु नाहींसें करतों असें बोलणें लावलें, आणि त्या दोन्ही कंपन्या, एकीमेकीविरुद्ध चढाओढीस पेटून ज्यास्ती ज्यास्तीच सरकाराचा फायदा दाखवून मागण्या करूं लागल्या. शेवटीं १७२० च्या एप्रिलांत, **साउथ सी कंपनीनें** सरकाराला पंचाहात्तर लक्ष पौंड उसने देऊं केले होते ती गोष्ट स्वीकारणारा असा एक **आक्ट** प्रधानमंडलानें **पार्लमेंटांत** पसार करविला.

व्यापारांत वाकब पुरुष, ही एवढी प्रचंड रक्कम देण्याजोगा त्या कंपनीला मोठा फायदा होणें अशक्य आहे, हें जाणून होते, आणि

रावर्ट वालपोलाची तकरार, १७२०.

राबर्ट वाल्पोल नांवाचा एक **नार्फक** शायरांत राहणारा निकोप बुद्धीचा **स्क्वायर** (ही एक पदवी आहे) होता, त्यानें त्या **आक्टाच्या** मसुद्याविरुद्ध **पार्लमेंटांत** निग्रहानें पुष्कळ तकरार केली, परंतु ती व्यर्थ गेली ! सारें **इंग्लंड** पिसें होऊन **साउथ सी कंपनीचें** शेर (पाती–वांटे) मागूं लागलें. खेड्यापाड्यांत राहणारे गृहस्थ ह्यांनीं आपआपल्या वतनवाड्या विकून, जो पैसा आला त्यानें उलाघालीचा व्यापार, म्हणजे त्या कंपनीचे शेर विकत घेऊन

ते तेजीनें विकण्याचा धंदा, मांडला. पाद्री, विधवा, पेढ्यावाले सावकार, डाक्टर्स (वैद्य), वकील, हे सर्व त्या कंपनीचे शेर विकत घेण्यासाठीं उड्या घालूं लागले. असें होतां होतां शेवटीं, १०० पौंडांचा शेर १००० पौंडांना विकूं लागला. ह्या कंपनीशिवाय, उलाघालीचें वेड चालू होतें त्याचा फायदा साधण्याच्या हेतूनें दुसऱ्या बुडबुडेवजा कंपन्या उत्पन्न झाल्या, आणि **स्टाक एक्स्चेन्ज** (सरकारी कर्जरोखे शेर वगैरे विकणाऱ्या दलालांचा फड) नांवाची शेरांच्या दलालांच्या बैठकीची हवेली एकाद्या मोठ्या जुगाराच्या अड्ड्यासारखी होऊन गेली. शेवटीं **साउथ सी कंपनी**च्या डिरेक्टर्सनीं नवीन नवीन झालेल्या छोटेखानी कंपन्या आपला बाजार बिघडून टाकीत आहेत असें पाहून, त्यांपैकीं कांहीं कंपन्यांचा विचका करून फजिती केली. परंतु तसें करण्यांत त्यांनीं आपला नाश करून घेतला. जेव्हां एकदा लोकांचा भरवसा डळमळला, आणि ते पूर्वीपेक्षां विशेष बारकाईनें तपास करूं लागले, तेव्हां अमर्याद नफा देऊं म्हणून जें वचन दिलें होतें, तो नफा कधींच देतां येणार नाहीं, हें त्यांना स्पष्ट कळून आलें. इतक्यांत शंभर पौंडांच्या शेराची जी १००० पौंड किंमत झालेली होती ती झराझर उतरून १३५ पौंडांवर आली, आणि शेवटीं त्याच शेराची किंमत अगदीं शून्यापर्यंत खालीं उतरली. तो **साउथ सी कंपनी** नांवाचा बुडबुडा एकदाचा फुटला, त्या कंपनीचें दिवाळें निघालें, आणि तिच्या पायीं शेंकडो लोक सफाई बुडाले. प्रधानांपैकीं **लार्ड स्टान्होप** नांवाचा एक प्रधान होता तो तर त्या धडकीनें मरण पावला. दुसरा एक **लार्ड संडर्लेंड** नांवाचा प्रधान होता, त्यानें राजीनामा दिला, आणि तें सारें खरकटें

साउथ सी बबल (साउथ सी कंपनी नांवाचा बुडबुडा) फुटतो, १७२१ चा मार्च.

निस्तरण्यासाठीं, जो वाल्पोल त्या साउथ सी कंपनीच्या बिल्लाला (कायद्याच्या मसुद्याला) आडवा आलेला होता, त्याला प्रधान नेमलें पाहिजे, अशी साऱ्या राष्ट्रांतील लोकांनीं मोठी ओरड मांडली.

राजानें शाहणपणानें लोकांच्या इच्छेप्रमाणें केलें. १७२१ च्या मार्च महिन्यांत एक नवीन प्रधानमंडल नेमलें, त्यांत वाल्पोलाला मुख्य प्रधान केलें, आणि इंग्लंडच्या ब्यांकेच्या साहाय्यानें त्या वाल्पोलानें दहशत पडली होती ती दूर केली, आणि बुडालेल्या पैशापैकीं कांहीं पैसा परतही दिला. पुढील वीस वर्षें वाल्पोल हा इंग्लंडांत अग्रेसर होऊन राहिला होता. "प्राइम मिनिस्टर" (म्हणजे मुख्य प्रधान) असें ज्याला म्हणूं लागले असा तोच पहिला पुरुष होता, आणि त्या वेळेपर्यंत काबिनेट (मंत्रिमंडल) ह्यांच्या सभेंतल्या ज्या स्थानीं राजा किंवा राणी बसत आली (५४४ वें पृष्ठ पहा) त्या स्थानीं तो बसूं लागला. वाल्पोल हा धसक्या, असभ्य, खेडेगांवचा गृहस्थ होता, आणि त्याच्या आंगीं विद्या किंवा अपूर्व कल्पनाशक्ति फारच थोडी होती. त्यानें मोठ्या सुधारणा अशा म्हणण्याजोग्या बिलकूल केल्या नाहींत. तशांत सभासदांना लांच रुषवत देऊन त्यानें पार्लमेंटांत आपलें प्राबल्य राखलें असा त्याला फार दोष देतात. परंतु, दुसऱ्या पक्षीं पाहिलें तर, तो निर्मल-बुद्धीचा, आणि कृतिकर्ता किंवा व्यवहारकर्ता, माणूस असून त्याला निकोप सामान्य ज्ञान पुष्कळ होतें. क्याथलिक्स आणि डिस्सेन्टर्स (स्थापित धर्माला अमान्य) ह्या लोकांविरुद्ध केलेल्या कायद्यांनीं ते फार चिडलेले होते ह्या कारणानें, आणि खे-

वाल्पोल हा इंग्लंडचा प्राइम मिनिस्टर, म्हणजे मुख्य प्रधान, होतो, १७२१-१७४२.